# स्मृतिचित्रें

## भाग ४

## अनुक्रमणिका


| अ.क्र | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | नवा मनु | ४६३ ते ४७० |
| २. | मुंबई | ४७१ ते ४७५ |
| ३. | दुःखार्णवांतील आनंदाच्या उर्मि | ४७६ ते ४८३ |
| ४. | विनाशकाले विपरीतबुद्धि | ४८४ ते ४९३ |
| ५. | मृत्युच्छायेच्या खिंडींतून | ४९४ ते ४९८ |
| ६. | पाहुणे | ४९९ ते ५०४ |
| ७. | आजाराचे चौकोन | ५०५ ते ५११ |
| ८. | मुलीची हौस | ५१२ ते ५१७ |

# स्मृतिचित्रें
## भाग ४

## अनुक्रमणिका


| अ.क्र | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ९. | स्वातंत्र्य | ५१८ ते ५२२ |
| १०. | कराचीस प्रयाण | ५२३ ते ५२७ |
| ११. | कंराचीतील वास्तव्य | ५२८ ते ५३४ |
| १२. | मधला काळ | ५३५ ते ५४५ |
| १३. | आई आणि आजी | ५४६ ते ५५७ |
| १४. | सत्कार समारंभ | ५५८ ते ५६९ |
| १५. | शेवट | ५७० ते ५७९ |
| १६. | विसांवा | ५८० ते ५८७ |

— १ —

# नवा मनु

टिळकांच्या अस्थि पेटींत जातांच माझें अस्तित्व जाणवूं लागलें. टिळकांच्या धर्मांतराच्या वेळीं जिनें मला सहाय्य केलें व पुढें मला सुखांत सोडून जी अज्ञातवासी झाली ती आतां माझें समाधान करण्यास पुढें येऊन उभी राहिली. त्यांच्या दुसऱ्याच दिवसापासून मला पुष्कळशीं समाधानाचीं पत्रें येऊं लागलीं. त्या पत्रांवर माझ्या नांवामागें चिकटून बसलेलें नेहमींचें अक्षर जाऊन त्या जागीं दुसऱ्याच अक्षराची योजना झालेली पाहून मन व्यग्र होऊन जाई. श्रीमती नांव जरी मोठें सन्मानाचें असलें तरी मला तें मोठें अशुभ वाटे. माझी अज्ञातवासी सखी त्या अक्षरांना पाहून पुन्हां मजकडे माझें समाधान करण्यास आली. त्यावेळीं मीं ही कविता लिहिली:-

श्रीमती नांव मज आलें । सौभाग्य लयाला गेलें ॥ध्रु.॥
या माझ्या दुर्दैवानें । हा कसा साधिला दावा
हा ओघ काव्यगंगेचा । निमिषांत कोरडा व्हावा
तें जीवन मम जीवाचें । मी मत्स्यी त्यांतिल देवा
जीवनाविणें ही बाई
देहाची झाली लाही
जीवांत जीवही नाहीं
दिन माझे संपत आले । सौभाग्य लयाला गेलें ॥ध्रु.॥
मी रडतें धाई धाई । मजसवें दिशा ह्या दाही
त्या शांत करूं मज आल्या । सद्‌गदीत झाल्या हृदयीं
उमटे न शब्द तो कांहीं । परि म्हणति उगी तूं राही
''हा टिळक तिलक राष्ट्राचा
तो नव्हता तुज अबलेचा''
बोलतां पूर अश्रूंचा

अश्रूंनीं त्यांस न्हाणीलें । सौभाग्य लयाला गेलें ।।ध्रु. ।।
काव्य-वृक्ष हा फुललेला । कितिकांनीं हालविलेला
तरि बहर कमीं नच झाला । अधिकाधिक देइ फळाला
मी वेंचित ताजीं सुमनें । तीं गुंफित आनंदानें
तों कसलें वादळ सुटलें
ग्रीष्माचें काळिज फुटलें
मी तरूतळींची उठलें
हा ! हाय ! काय हें झालें । सौभाग्य लयाला गेलें ।।ध्रु. ।।
'वनवासि फुल जन्माचें । रानांत फोडितें टाहो
वनमाळी गाउनि गेला । तो फिरुनी गाइल का हो
भेटेंल पुन्हां परतोनी । तो काय मला सांगा हो
तो प्रेमळ मित्रचि माझा
कवि उद्यानांतील राजा
सांभाळ करुनियां माझा
जगतीं मज उंचावीलें। सौभाग्य लयाला गेलें ।।ध्रु. ।।
''देवाच्या दरबाराचे'' । इहलोकीं क्षीण उपाय
दरबार दिव्य लोकींचा । तो पसंत झाला काय ?
जी इच्छा मनिंची होती । ती विलया गेली हाय
जगिं दरबाराच्यासाठीं
संकटें मत्सरापोटीं
जन्मतांचि धांवुनि येती
निज होतें त्या लोटीलें। सौभाग्य लयाला गेलें ।।ध्रु. ।।
ते अश्रु काय प्रेमाचे । बापाचे काय कवीचे
हें कळलें नाहीं लोकां । ते अश्रू खरे कोणाचे
वात्सल्य खरें बापाचें । कविहृदयीं येउन सांचे
प्रेमाचे फोडुनि पाट
वत्सलता काढी वाट

अश्रूंची उसळे लाट

रसिकांतें सावध केलें। सौभाग्य लयाला गेलें ।।ध्रु. ।।*

दुपारीं दोनाच्या सुमाराला आम्ही पांचहिजण मूढाप्रमाणें विचारमग्न होऊन बसलों होतों. दत्तू, रूथ, बेबी, चिकी आणि मी. दत्तूला अजून चांगलें बरें वाटत नव्हते. जें तें आपापल्यापरी शुभाशुभाच्या भोंवऱ्यांत गिरक्या खात व एकीकडे आढ्याचे वासे मोजीत आपापल्या जागीं स्वस्थ बसलेलें होतें, दत्तूचें दुखणें, सुनेचे भरत आलेले दिवस, बेबीचें अपुरें राहिलेलें शिक्षण, चिकीचा आजाराशीं चाललेला लपंडाव ह्यांनीं आतां आमच्या शरीराची धांवपळ तेवढी थांबलेली होती पण मनांला मात्र वेग आलेला होता. एवढी माणसांनीं गजबजलेली व धनधान्यांनीं भरगच्च भरलेली मुंबई पण ती आम्हांला शून्यवत वाटूं लागली. दशदिशा आम्हांला खुल्या मैदानाप्रमाणें सताड मोकळ्या वाटत होत्या. आमचें म्हणण्यासारखें येथें एकहि कोणी नव्हतें.

दत्तू निजला होता. त्याची बायको त्याच्याशीं कांहीं बोलत होती. मी, बेबी व चिकी भिंतीला टेंकून बसलों होतों. तोंच एक व्यक्ती अचानक येऊन धाडकन आमच्यापुढें पडली. त्यांचा श्वासोच्छवास जोरानें चालला होता. तोंडाला कोरड पडली होती. अंगांतून घामाच्या धारा वाहात होत्या. डोळे गच्च मिटून घेतलेले होते. हें काय वाढून आलें कोणाला कळेना.

सखारामभाऊजी टिळकांना भेटण्यासाठीं पुण्याहून निघाले होते. टिळक फार आजारी असल्याची त्यांना खबर नव्हती. पण त्यांना एकदम वाटलें, कीं आपण भावाला भेटून यावें. त्याप्रमाणें ते पुण्याहून निघाले. परंतु कर्जत आल्यावर त्यांना आपल्या बहिणीकडे वेणगांवास जाऊन यावें असें वाटून ते मध्येंच वेणगांवास गेले. अलीकडे भाऊजी आजारीच असत. त्यांत त्यांना आपल्या भावाच्या काळजीनें पछाडलें होतें. ते जरी वेणगांवास होते तरी त्यांचें सारें लक्ष आपल्या नानाकडे होतें. त्यांना त्यांचें मन वेणगांवास स्थिर राहूं देईना. मन मनाला साक्ष देतें. बहीण म्हणे बाबा तुम्ही फार अशक्त झालां आहां. कांहीं दिवस येथें राहून जा. पण ते कांहीं कोणाचेंच ऐकेनात. हो नाहीं करतां करतां टिळकांच्या तिसऱ्या दिवशीं चहा घेऊन ते वेणगांवाहून कर्जतला येऊन गाडीची वाट पहात बसले. तोंच त्यांच्या हातांत वर्तमानपत्र आलें. त्यांत आपल्या भावाची बातमी वाचून त्यांची स्थिति भयंकर झाली. टिळकांवर त्यांचें अतिशय प्रेम होतें.

* या कवितेत वनवासी फुल. कवीचे उद्यान, बापाचे अश्रु (नवे) या टिळकांच्या कवितांचा व देवाचा दरबार या संस्थेचा संदर्भ आहे.

आमच्या घराचा पत्ता त्यांना माहीत नव्हता. मुंबईत तपास करतां करतां दुपारीं तिनाच्या सुमारास ते आमच्याकडे येऊन पडले. कर्जतपासून वेणगांव दोन तीन मैल, पोटांत कपभर चहावांचून कांहीं नाहीं, प्रकृति क्षीण झालेली, उन्हाळा, मुंबईस आल्यानंतर उन्हांत फिरावें लागलेलें, -भाऊजींची ही दशा पाहून आम्ही सर्वच गांगरून गेलों. आम्हांला काय करावें तें सुचेना. त्या वेळेस त्यांच्या मनाला जो धक्का बसला त्याचा परिणाम शेवटपर्यंत राहिला.

मुंबईस आमचे आप्त कोणी नव्हते खरे पण मित्र होते. ते येऊन आमचे समाधान करीत. डॉ.भास्करराव गोवंडे व त्यांच्या पत्नी रमाबाई ह्यांनीं येऊन आम्हांला सगळ्यांनाच आपल्या घरीं चार दिवसांसाठीं नेलें. दत्तूला अजूनहि बरें वाटत नव्हतेंच. नाशकाहून नानासाहेबांचें पत्र आलें कीं तुम्ही सर्वजण नाशकास या. आम्ही नाशकास जाण्याचें ठरविलें. माझी सून मुंबईसच एकटी राहिली व आम्ही तिघे नाशकास गेलों. चिकीला डॉ.गोवंड्यांकडे ठेवलें.

निघतांना भास्कररावांनीं मला जो उपदेश केला तो मी कधीं विसरणार नाहीं. ते म्हणाले, ''हे बघा आतां तुम्ही बाजार करण्यास निघाला आहां. तुम्हांला बरीच धक्काबुक्की सोसावी लागेल. आपल्याला कोणता माल खरेदी करायचा तिकडे अधिक लक्ष्य द्यायला पाहिजे. जर का तुम्ही धक्काबुक्कीकडे लक्ष्य देत बसाल तर तुमचा बाजार संपला असें समजा. हे माझे शब्द ध्यानांत ठेवा'' त्यांच्या बोलण्याचा अनुभव मी घेत आहें.

नाशकास माझे नातेवाईंक पुष्कळ. त्या सर्वांच्या भेटीगांठी झाल्या. शरणपुरांत एक दहा रुपयांचें घर भाड्यानें घेतलें. बहिणीच्या मुलानें व सुनेनें बाकी सर्व व्यवस्था लावून दिली. विष्णूने[१] व सौ.काशीनें मला त्यावेळीं कांहींच उणें पडूं दिलें नाहीं. जरी आम्हीं त्यांच्या घरापासून मैल दोन मैल दूर रहात होतों तरी त्यांनीं आमची सारी व्यवस्था ठेविली होती. माझे दोघे भाऊ व त्यांचीं मुलें जलालपूरास होतीं. ते मला मधून मधून येऊन भेटत. पण नानासाहेब किंवा विष्णु ह्यांच्यापैकी कोणी ना कोणी तरी रोज भेटून जात.

आम्ही शरणपुरास आल्यानंतर दत्तूला बराच कल पडला. येथें आल्यावर मला दोन पत्रें आलीं. एक केडगांवाहून पंडिता रमाबाईंचें व दुसरें मुंबईहून डॉ.एमिलीबाई बिसेलचें. पंडिताबाईनीं केडगांवीं आम्हांला एक महिनाभर रहाण्यास बोलावलें होतें व डॉ.बिसेल ह्यांनीं मुंबईस तुमची कामाची सोय करीत आहों तरी पहिलीपर्यंत मुंबईस या असें लिहिलें होतें.

मीं आजपर्यंत नोकरी कधींच केली नव्हती. मला काम कोणतें मिळणार तेंच आम्हांला कळेना. कीर्तनावांचून दुसरें कोणतें असणार ? कारण मी बोलून चालून अशिक्षित बाई तरी आम्हीं त्याबद्दल विचारच केला नाहीं. आमचा दु:खाचा पूर अजून ओसरला नव्हता.

१. विष्णु नारायण पेंडसे

आमची पैशाची पुंजी संपुष्टांत आलेली होती. पण बोट गच्च बांधून मग सोडावें व त्या बोटाला कांहीं समजूं नये तसें आमचें झालें होतें. आमचीं मनें दुःखानें गोठलीं होती. मुंबईच्या मिशन हायस्कूलमध्यें दत्तूला काम होतें. त्याला पाऊणशें रुपये पगार होता. त्यांत मुंबईसारख्या ठिकाणीं आमचें कसें चालणार ? मिशनरींमध्यें टिळकांच्या विरुद्ध एका 'मंबाजी' खेरीज कोणीच नव्हतें. मिशनरींनीं आमची जुजबी व्यवस्था करण्याचें मनावर घेतलें. आम्हींहि कोणतें काम काय काम ह्याचा विचार केला नाहीं. दत्तू बरें वाटूं लागतांच मुंबईस आपल्या कामावर जाऊन रुजू झाला. बेबी व मीं केडगांवास पंडिता रमाबाईकडे गेलों. बाईंनीं आमचें फार सहाय्य केलें. तेथें गेल्यावर जिकडे तिकडे मुलींच्या तोंडीं टिळकांचीं गाणीं ऐकूं येत. तीं ऐकून मनाचा अधिकच भडका उडे. पुष्कळ स्त्रियांचा सहवास घडला. त्यांचा परमेश्वरावरील विश्वास, ख्रिस्ताचें सान्निध्य व कृपा हीं जिकडे तिकडे दिसून आलीं. चारच दिवस पण आम्ही निराळ्या जगांत आहों असा भास झाला. वृद्ध, तरुण, अनाथ, अपंग, लहान, मोठे ह्या सर्वांचा सांभाळ ईश्वर करीत आहे व अडल्या नडल्याला त्याचा हात कसा सांवरून धरीत आहे हें दृश्य तेथें आम्हांला पाहण्यास मिळालें. त्यामुळें आपणच तेवढें अनाथ नाहीं ही भावना जागृत झाली.

बाईंची इच्छा होती कीं आम्हीं तेथेंच रहावें. पण बेबीचें अपुरें शिक्षण व दत्तू मुंबईस तेव्हां मला तेथेंच रहाणें रुचेना. दत्तूनें एल्.एल्.बी.चा अभ्यास करण्याचें आतां नक्कीं ठरविलें होतें. शिवाय आमंत्रण आलें असून आगांतुकी कशाला ? तेव्हां आम्हीं केडगांवला नकार दिला.

चार दिवस झाले. केडगांवास आम्हांला सातारहून एका बाईंचें पत्र आलें. तिनें आम्हांला आपल्याकडे चार दिवस राहण्यास बोलावलें होतें. मला पुढचें भाकीत कळलें. ह्या आमंत्रणाच्या मुळाशीं कोण आहे व काय आहे तें कळलें. मीं पंडिताबाईंना सांगितलें, ''मी आतां जातें. मला साताऱ्याला गेलेंच पाहिजे. हें पत्र म्हणजे अप्रत्यक्ष नोटीसच आहे. आपण माझ्यासाठीं प्रार्थना करा.''

निघतांना पंडिताबाईंनीं आम्हांला चार लुगडीं व ज्याकिटासाठीं बरीचशी फ्लॅनेल दिली. शिवाय तीस रुपयेहि दिले. माझी दानबुद्धी मोठी ! मीं त्या तीस रुपयांतले पांच रुपये बाईंच्या कामासाठीं त्यांना दिलें ! म्हणजे गंगेचें पाणी घेऊन गंगेंतच उदक सोडलें.

मी जरी केडगांवांत होतें तरी डोळ्यापुढें मला सातारा दिसत होता. आपल्यापुढें कोणतें ताट वाढून ठेवलें आहे तें मला कळलें होतें. मी बाईंना म्हणालें मला कांहीं शिधा द्या. मजजवळ माणूस नाहीं व सातारचा बाजार दूर आहे. बाईंनीं मला लागणारें सर्व सामानहि बांधून दिलें व माझी बोळवण केली.

माझी प्रकृति एखाद्या मुलाप्रमाणें झाली होती. झोंप तर झोंपच येत राही. नाहींतर मुळींच नाहीं. तसेंच सर्व कांहीं खाणें पिणेंहि मुलांसारखेंच झालें होतें. लहान मुलाला आई लागते तशी आतां बेबी माझी आई झाली होती. तिला माझें सर्व कांहीं पहावें लागे.

मृगानें धरणीमातेच्या अंगावर झेंप टाकली होती. चहूंकडे अंधाराचें प्राबल्य माजलेलें होतें. सृष्टींत प्रकाश नव्हता. मनांत प्रकाश नव्हता. नभोमंडळांत इतक्या तारका पण मेघांनीं आपल्या अवाढव्य सामर्थ्यानें एकहि तारका दृग्गोचर होऊं न देण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला होता. गाडीची खडखड, मेघांची गडगड व उरांतील धडधड हीं कोणाच्यानें थांबवितां येणार होती? अशा परिस्थितींत रात्रीं एक दिडाच्या सुमारास आम्ही साताऱ्याच्या स्टेशनवर गाडींतून उतरलों. आजपर्यंत स्टेशन ते सातारा आम्हीं नेहमीं मोटारनें प्रवास केलेला होता. पण आतां आपलें अंथरूण पाहूनच आम्हांला पाय पसरायाचे होते. आम्हीं एक रेकलाच ठरविला. आधींच रात्र अंधेरी, त्यांत ढगांचें साम्राज्य, व ही अधिक भयाण करण्यासाठीं विजांचे व काजव्यांचें चमचमणें. आमच्याहि डोळ्यांपुढें काजवे चमकत होते. रेकल्यांत आम्ही दु:खसंकटाचें बोचकें सुखासमाधानानें सांवरून बसलों होतों. मधून मधून पावसाचे सपके बसत. पण वाऱ्यापावसाला आतां पाठ द्यायची म्हणून आम्ही आपली छत्री उघडून तेवढ्यांतल्या तेवढ्यांत आपलें रक्षण करण्याचा प्रयत्न करीत होतों.

अशा स्थितींत आम्ही बंगल्याच्या फाटकाशीं येऊन थांबलों. पूर्वस्मृति झाली. टिळकांची प्रतिज्ञा आठवली. मनांत आलें, कीं ज्यांनीं साताऱ्याच्या वेशींत पाणी पिणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून ती खरी केली त्यांचीच बायको मुलगी दीड दमडीच्या सामानाकरतां आतां येथें तुकडे मोडणार !

सातारा सोडतांना आम्हीं दुसऱ्याजवळ घराची किल्ली देऊन ठेवली होती. पण एवढ्या रात्रीं कशाला एखाद्याची झोपमोड करावी म्हणून आम्हीं मागल्या व्हऱ्यांड्याच्या कोंपऱ्यांत डोळ्याचें काम हातानें करून कोरडी जागा शोधून काढली. आमचीं लुगडीं अंगाच्याच उबेनें वाळलीं होतीं व आतां तींच आमच्या गारठलेल्या शरिरांना ऊब आणीत होतीं. येथेंहि आमच्या छत्रीनें आम्हांला मोठा आधार दिला. झोंप कशी येणार ? डोळ्यांत बोट घातलें तरी कांहीं दिसणें शक्य नव्हतें तरी आम्हांला नुसत्या कल्पनेंनें भिंतीच्या आंतील घराचासुद्धां कोपरान् कोपरा दिसत होता. आम्हांला त्या अंधारांत मागील छोटा इतिहासहि स्पष्ट दिसूं लागला. भजन, कीर्तन, प्रार्थना, लेखन, चहा, बैठकी-एक का हजार गोष्टी त्या अल्पावधींत आमच्या डोळ्यापुढून सरकूं लागल्या. आम्ही एकमेकींना धीर देत होतों. बाकी धीर देण्याचें माझ्यांत सामर्थ्य नव्हतें. केवळ सोन्याच्या ताटाला कुडाचा आधार अशी मी तिला होतें, व बुडत्याला काडीचा आधार अशी ती मला होती.

पहाटें उजाडतांच आम्हीं आल्याचें लोकांना कळलें. आमच्या वाडींतील माणसें आम्हांला भेटायला आलीं. एका मास्तरांनीं आम्हाला अल्पाहार आणून दिला. आम्ही आल्याची खबर आमच्या 'लँड लॉर्डला' कळलीं. 'लँड लॉर्ड' ताबडतोब भेटायला आल्या. त्या तीन वाक्यें बोलल्या. माझें फार समाधान झालें.

पहिलें: मिस्टर टिळकांसाठीं मला फार वाईट वाटतें.

दुसरें: तुम्हीं बंगला केव्हां मोकळा करणार ?

तिसरें: जातें ! मला आतां फार काम आहे.

ह्या तीन वाक्यांपैकीं पहिल्या व शेवटल्या वाक्यांच्या उत्तराची त्या अर्थात् अपेक्षा करीत नव्हत्याच. मधल्या वाक्याचें उत्तर मीं ताबडतोब देऊन टाकलें-

''तो रिकामाच आहे.''

दहा वाजतां निरोप आला.

''सामान आवरलें का ?''

''नाहीं. आपणांजवळ एखादें खोकें असेल तर कृपा करून पाठवा.''

एक खोका आला. तो इतका बेताचा होता कीं त्याच्यांत अर्धा डझन कप बशा मावल्या असत्या. मी तर निजूनच होतें. सारें कांहीं बेबीच करीत होती. पंडिताबाईंनीं दिलेला शिधा उपयोगी पडला. कांहीं तरी करून जठराग्नीला आहुती दिली. दुपारी तीन वाजतां मडमसाहेब पुन्हां आल्या.

''अजून कांहींच नाहीं आवरलें ! मला बंगल्याची फार जरूर आहे. हें कधीं आवरून होणार?''

''आपल्याला इतकी जरूर असली तर हमाल आणून सामान सडकेवर ठेवा. राहील तें माझें, जाईल त्याची मला पर्वा नाहीं. सामान मिळवितां येईल. पण टिळकांना कांहीं माघारीं आणतां येणार नाहीं.''

मडमसाहेब गेल्या.

सत्तेपुढें शहाणपण काय कामाचें ? कामदारांना आमच्याकडे येण्याची बंदी असावी असें वाटतें. माझी पथारी घातलेलीच होती. काय करील तें बेबीच करणारी. मी विचारायाला पाठविलें ''कांहीं दिवस सामान ठेवण्यासाठीं एखादी खोली मिळेल का?'' उत्तर आलें.

''आमचीच फार अडचण आहे. फार वाईट वाटतें.''

रावबहादूर जोशी [१] आमच्या शेजारींच रहात असत. त्यांना ही सर्व तऱ्हा कळल्यावर त्यांनीं आपल्या कुटुंबाला मजकडे पाठविलें. त्यांनीं आपलीं माणसें लावून घर खालीं केलें. माझे जातभाई-ख्रिस्ती लोक बिचारे हळहळत होते. पण ते तरी काय करणार ? त्यांच्यापुढें त्यांचें पोट होतें. टिळक असतांना करतां येई तशी दांडगाई करणें आतां त्यांना शक्य नव्हतें. त्यांच्या वेळेस इकडचें काम गेलें की टिळक पटकन् दुसरीकडे काम लावून देतील अशी खात्री होती. ज्या बाईनें मला विसांव्यासाठीं केडगांवाहून मुद्दाम बोलावलें होतें ती मी आलेली कळूनहि माझ्या समाचाराला आली नाहीं! ती कोणाचीच ताबेदार नव्हती. पण बिचारीला माझें दु:ख पाहवणार नाहीं असें वाटलें असेल. बेबीनें दत्तूला पत्र पाठविलें कीं आम्ही घर मोकळें करण्यास साताऱ्यास आलों आहों.

दोन दिवसांनीं बेंजीमामा [२] आला. तो येण्याच्या आधींच कांहीं हिंदू व ख्रिस्ती मंडळीनें आम्हांला साह्य करण्याचें मनावर घेतलें होतें. सामान पॅक झालें. आतां सामान पाठविण्याचा भाड्याचा प्रश्न राहिला. मीं एका कंट्राक्टरला बोलावून सांगितलें कीं मजजवळ पैसे नाहींत. तुमचा विश्वास असेल तर हें सारें तुमच्या खर्चानें मुंबईस पाठवून द्या व सर्व हिशेब करून दत्तूला धाडा. तो पैसे देईल. कांहीं भारी सामान रावबहादुरांकडे ठेविलें. भारी म्हणजे भारी किमतीचें नव्हे तर जात्या पाट्या सारखें वजनदार.

टिळक गेले होते तरी ते आमच्यांतच आहेत असें वाटे. मला वाटतें स्वर्गलोकीं जाण्याच्या आधीं कांहीं काळ आत्मा आपल्या प्रिय मंडळीच्या संन्निध रहात असावा. आम्ही सातारा सोडतांना डॉ.केळकर [३], रावबहादूर जोशी वगैरे मंडळीला व आमच्या बहुतेक ख्रिस्ती भावांबहिणींना अतिशय वाईट वाटलें.

१. रा.ब.मोरे चिंतामण जोशी
२. बेंजामिन गंगाराम कुकस, रूथबाईचे आतेभाऊ. ३. डॉ. दत्तात्रय विनायक केळकर.

—२ —

# मुंबई

वयाच्या अकराव्या वर्षापासून म्हणजे अगदीं बालपणापासून माझें आयुष्य एकसारखें टिळकांच्या बरोबर व बरोबरीनें चाललें होतें. मध्यें पांच वर्षें आम्ही विभक्त होतों पण त्या पांच वर्षांत टिळक एकहि क्षण माझ्यापुढून हाललें नाहींत, कीं मी त्यांच्यापुढून हाललें नाहीं. मीं जी आहे ती केवळ टिळकांमुळें. टिळकांनीं आपलीं ध्येयें ठरवावीं मीं डोळे झांकून ती आचरणांत आणावीं, त्यांनीं कविता रचाव्या मीं त्या गाव्या, त्यांनीं भीक मागावी व मीं त्यांची झोळी धरून चालावें. आमच्यामध्यें जे खटके उडत ते जेव्हां जेव्हां मला त्यांच्या प्रगतीचा वेग सहन होत नसे तेव्हां तेव्हां. डेक्कन क्वीनच्या मागें एखादा खटारा बांधला व ती आपल्या पूर्ण वेगांत निघाली म्हणजे त्या खटाऱ्याची जी आदळ आपट होईल ती माझी होत असे. त्यांचा वेग मला मानवेल इतपत असला व मला त्यांचीं ध्येयें पटवून घेण्यास अवसर मिळाला, कीं मग मात्र आमचें गाडें सुरळीत चालें. इंजिनाच्या अंगीं असलेली स्वयंशक्ति ती टिळकांच्या अंगीं होती तर त्या एंजिनानें दिलेला वेग तो माझ्या अंगीं असे. एकदा रुळावर माझी गाडी लागली कीं मग मात्र ती कोणाला थांबवितां यायची नाहीं.

पण आतां माझा सूत्रधार गेला. आतां नवीनच जग माझ्याभोंवतीं उत्पन्न झालें. नवीनच आयुष्याला सुरुवात झाली.

मुंबईस मला भजन कीर्तनाचें काम नव्हतें. श्रीमतीला साजेल असें काम माझ्यापुढें वाढून ठेवलें होतें. बहुतकरून हें काम करणाऱ्या श्रीमतीच असतात. काम मेट्रनचें होतें. दरमहा पंचेचाळीस रुपये पगार व राहण्यास ऐसपैस जागा. दत्तूलाहि तेथें राहतां येणार. मग माझ्या आनंदाला काय विचारतां? टिळक गेले तरी मुलगा, सून व मुलगी जवळ राहणार म्हणून मला फार समाधान वाटलें.

मिशनरींना सर्वांनीं नांवें ठेवावीं व त्यांच्या चांगल्या कृत्यांचाहि विपर्यास करावा हें ठरलेलें असतें. पण माझा अनुभव फार निराळा आहे. तें ख्रिस्ताच्या प्रेमामुळें येथें आलेले असतात व दुसऱ्यांचें करतां येईल तितकें बरें करण्यासाठीं तळमळत असतात. आतां कांहीं तरी युक्ति करून आमच्या पोटापुरतें कसें द्यावें ह्याबद्दल त्यांना तळमळ लागली व त्यांनीं ही

बोर्डिंग संभाळण्याची जागा माझ्यासाठीं शोधून काढली.

मी साताऱ्याहून येतांच दत्तूनें मला सर्व हकीकत सांगितली, मला बरें वाटलें कारण राहण्यास निवाऱ्याची जागा, घरबसल्या काम, पंचेचाळीस रुपये पगार व हातांखालीं हवीं तेवढीं माणसें. पण घी देखा लेकिन बडगा नाहीं देखा.

मीं बिगारी इयत्तेंत पाऊल टाकलें. श्रीमती झालें असल्यामुळें ह्या इयत्तेला श्री पासूनच आरंभ केला म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां माझ्यापुढें पाटी आली. भाकरीची पाटी, भाजीची पाटी, बाजाराची पाटी, धोब्याची पाटी, दळणाची पाटी, लिहिण्याची पाटी, कचऱ्याची पाटी, अशा नानाविध पाट्या माझ्यापुढें आल्या. मुलांच्या लहानपणीं मीच त्यांची शिक्षक होतें. पण आतां तीं माझीं शिक्षक झालीं. बाजारचा हिशोब इंग्रजींत तपासावा लागे.

दत्तू कामाला जायचा, बेबी कॉलेजला जायची, रूथ माहेरीं गेली. तेव्हां मुलांनीं मला एक युक्ति सांगून ठेवली होती. त्यांनीं मला इंग्रजी आंकडे शिकवून ठेवले होते. व शब्दांचें पहिलें अक्षर पाहून व माल पाहून सह्या करण्याचें तंत्र मला सांगितलें होतें. C=खोबरें. S= साखर. P= बटाटे. T= चहा. अशा रीतीनें मी हिशोब पाही.

मुलींचीं पत्रेंहि फोडून वाचून मग जिचीं तिला द्यावीं असें एक काम होतें. तें मी करी. इंग्रजी पत्रें असलीं म्हणजे तीं मुलांकडून वाचून घेई. आजपर्यंत जगानें माझें फारच साह्य केलें. कोणीं मला कधीं नाहीं म्हटलें नाहीं. तसेंच येथेंहि कामाला व साह्याला माणसें होतींच. एकंदर लहानमोठ्या अडीचशें मुली होत्या. त्यांपैकी मोठाल्या मुलींनीं आपण होऊनचे माझें पुष्कळसें काम आवरावें. झाडझूड करणें, धोब्याचें पाहणें, भाकरवाल्यांवर नजर ठेवणें वगैरे कामें त्यांनीं आपल्या अंगावर घेतलीं.

मडमसाहेब [१] रोज दोन वेळेस येत. त्या कां येतात हें मला समजेना. अशा तऱ्हेचें काम करण्याची माझी ही पहिलीच वेळ होती. पण मुलींकडूनच मला कळलें की मेट्रननें रोज दोन वेळेस तरी मडमसाहेबांच्या कानाशीं लागावें असा शिरस्ता आहे. ह्या कानगोष्टी म्हणजे अमकीला चोरून पत्र आलें, तमकीनें डोळा वांकडा केला. ती उद्धटपणें बोलली, ही तिच्याशीं बोलत होती. मग ह्या कानगोष्टी झाल्यावर त्या त्या अपराधाच्या मगदुराप्रमाणें तशा तशा शिक्षा व्हायच्या.

साऱ्याच मुली चांगल्या कशा असणार ? अडीचशें ठिकाणच्या अडीचशें मुली. एका गांवांतील एका घरांतील, एका आईबापांचीं मुलें असलीं तरी त्यांच्यांत सुद्धां किती भिन्नपणा आढळून येतो. व त्यांतच तर मजा आहे नाहींतर साऱ्याच पुणेरी बाहुल्या असून उपयोग

१. मिसेस हेजन

काय ! वाईट नसतें तर चांगलं कळलें नसतें.

ह्या मुलींत बऱ्याच मुली खोडकर होत्या. व एकीचें पाहून दुसरी ह्या खोड्या करी. कांहीं मुली अगदीं पुरुषाप्रमाणें आवाज काढून बोलत. मला हें माहीत नव्हतें. एक दिवस रात्रींच्या अभ्यासाच्या वेळेस मला माडीवर पुरुष बोलल्याचा भास झाला. वर जाऊन पहातें तर सर्व मुलीच मुली. पुन्हां खालीं आलें तों पुन्हां वर पुरुष बोलताहेत असें वाटलें. मी पुन्हां वर गेलें. मला वेड लागण्याची पाळी आली. शेवटीं एका मुलीनें हळूंच मला ही गंमत सांगितली व पुरुषासारखें बोलून दाखविलें.

मला सगळीं आजीबाई म्हणत. मी अजून आजी झालें नव्हतें तरी माझ्या चिकीनें आधींच आजी म्हणून माझ्या घुगऱ्या वाटल्या होत्या. मुली माझ्याशीं फार चांगल्या वागत पण त्या कधीं बिथरत नसत असें नाहीं. एकदा एक मुलगी मला म्हणाली आजीबाई मला पत्रें पाहूं द्या. तसें करणें शक्य नव्हतें. मीं तिला पत्रें दाखविलीं नाहींत. झालें, तिनें पैजेचा विडा उचलला, कीं आतां हिला त्रास द्यायचा. तिची मजल चोरून माझीं लुगडीं जाळण्यापर्यंत गेली. झाडाच्या पाचोळ्यांत लुगड्याची आहुति देण्यांत आली. कपड्याचा वास येई पण जळतें काय व कोठें तें कळेना. पत्र न दाखविण्याचें कारण निनांवीं पत्रें येत. त्यांत भलतें सलतें लिहिलेलें असे. मी अशीं पत्रें जाळून टाकी. अधिकाऱ्यांना दाखवीत नसे कीं मुलींना दाखवीत नसे. अधिकाऱ्यांना दाखविलीं कीं मुलींना शिक्षा होत. बरें मुलींना दाखविलीं, कीं त्यांच्या मनावर भलताच परिणाम होई. तेव्हां अशीं पत्रें अग्निनारायणाला अर्पण होत. अर्थात् त्याला नुसत्या कागदाच्याच आहुति मी देते हें पसंत न पडून अग्निनारायणानें माझी लुगडीं लुबाडलीं.

मी रोज जेवणाच्या वेळेस व प्रार्थनेच्या वेळीं मुलींना सांगे, बायांनो, मला सहीसलामत आले तशी परत जाऊं द्या. तुम्हीं मी असेपर्यंत पळापळी करूं नका. त्या म्हणत आजीबाई आम्हीं तुमच्यावर कांहींच आणणार नाहीं. त्यानंतर तीन वर्षांत फक्त दोनदांच तसे प्रसंग आले. पण दोन्ही वेळेस बोर्डिंगमधून कोणी पळालें नाहीं. एक मुलगी गेली शाळेंतून व एक गेली चर्चमधून. त्या गेल्या त्या पुढें ज्यांच्याबरोबर गेल्या त्यांच्याबरोबर लग्नें करून सुखानें संसार करूं लागल्या. त्यांचें ज्यांच्यावर प्रेम होतें त्यांच्याशीं लग्न करून देण्याचा सूज्ञपणा अधिकाऱ्यांनीं आधींपासूनच केला असता तर असें कांहीं घडलें नसतें. दोघीहि अगदीं अधिकाऱ्यांच्या हातांतून गेल्या. मजवर म्हटल्याप्रमाणें कोणीं कांहीच आणले नाहीं.

टिळकांच्या इच्छेप्रमाणें झालें. ते म्हणत कीं माझ्यासाठीं कोणी रडूं नये. माझ्यामागें एक महिनाभर पुरेल इतके पैसे राहतील. पुढें ज्याचें त्यानें मिळवून खावें. आम्ही बावकर हॉलमध्यें आलों तेव्हां एक महिना झाला होता व एकच रुपया उरला होता. पुढें दुःख

करण्यास कोणाला वेळच मिळाला नाहीं. दिवसभर काम, रात्रींची भीति. बावकर हॉलच्या खालीं तळघर होतें. आंत फळ्यांच्या फटींतून कबरीसारखें दिसे. झुरळें अतिशय झालेलीं. ही झुरळसेना त्या फटींतून रात्रीची बाहेर पडायची व टपटप उड्या मारायची. अर्धवट झोपेंत तो आवाज, म्हणजे कोणी चालत येत आहे असा होई. मुलींचीं डोकीं रितीं. त्यांत कोणीं भुताखेतांच्या गोष्टी भरून दिल्या होत्या त्यामुळें मुलीच मुळीं भुतासारख्या वागत. तेव्हां त्या कामाच्या रगाड्यांतहि गमतींना कांहीं तोटा नव्हता. तेथें मीं एक प्रयोग करून पाहिला. तो यशस्वीहि झाला. मुलींना मारायला माझे हात धजत नसत. तेव्हां लहान लहान मुलींनीं कांहीं अपराध केले तर मी त्यांना पुढें उभे करून स्वत: छड्या मारून घेत असे. त्यांना आपल्या आजीबाईंना मार बसलेला पाहून फार वाईट वाटे व त्या खोड्या करायाचें सोडीत. मोठाल्या मुलींना मी कोपऱ्यांत उभें करी. एकदा असेंच एका मुलीला कोपऱ्यांत उभें केलें. तिला माझी शिक्षा मुळींच पचली नाहीं. तिनेंहि मला शिक्षा देण्याचें ठरविलें.

माझ्या संसाराला हातभार लावण्यासाठीं बावकर हॉल कांपाउंडच्या कोपऱ्यांत मीं कोंबड्या करण्याचें ठरविलें. राहुरीहून मी बावीस रुपयांच्या कोंबड्या आणविल्या. माझ्यासारखी अशिक्षित बाई दुसरा कोणता धंदा करणार? त्या मुलीनें मला शिक्षा देण्याचें ठरविलें व ती रात्रीची हळूंच उठून माझ्या कोंबड्यांकडे गेली. तेथें तिनें एकएक कोंबडी धरून गरगर फिरवावी व जमिनीवर आपटावी. अशा रीतीनें सात आठ कोंबड्या मारून तिनें वड्याचें तेल वांग्यावर काढलें.

पण दुसऱ्या दिवशीं तिला फार वाईट वाटलें. तिचा राग सगळा निघून गेला. तिनें एक पारवा धरून आणला व तो माझ्या स्वाधीन केला.

''आजी हा पहा किती मोठा आणि सुंदर पारवा आहे. हा घ्या तुम्हांला.''

मी तो पारवा ओळखला. त्याला पिंजऱ्यांत ठेवलें. त्यानें एका तडाख्यांत अर्धी पोळी खाल्ली पाणी प्याला व मग त्यानें वर डोकें करून इकडे तिकडे पाहण्यास सुरुवात केली. किती दिवसाचा बिचारा उपाशी होता कोणास ठाऊक?

संध्याकाळीं दत्तू घरीं आला त्याला मीं तो दाखविला.

''पाहा रे दत्तू ! मला फार दिवसाची हौस होती. हा मीं घेतला. टिळक मला नेहमीं म्हणत मी तुला झांजीबारचा पोपट घेऊन देईन. तो घेतला आज.''

''आई ! आपली अडचण आहे ! केवढ्याला घेतलास हा ?''

''साठ रुपयांना !''

आमचें बोलणे चाललें आहे तोंच पोपट अगदीं माणसासारखा बोलूं लागला. अगदीं

माणसांचा आवाज, तो सुंदर शीळ वाजवूं लागला. गाणें म्हणूं लागला. पण ही भाषा कोणती असावी हें आम्हांला कळेना. आम्ही सर्वच चकित झालों. हा पोपट पुढें आमच्याकडे १९३२ पर्यंत होता. घरांतील प्रत्येक माणसाचा आवाज काढून त्याच्याप्रमाणें तो बोले. आतां मात्र माझी पोपटाची हौस पुरी झाली.

चोर नेहमीं येत. पण त्यांना कधीं चोरी करायला मिळाली नाहीं. पण बाहेरच्या चोरांना कांहीं मिळालें नाही तरी घरांतल्या चोरांचा फार सुळसुळाट झाला.

एक दिवस दत्तूचा एक नागपूरकडील मित्र त्याला भेटायला आला.* त्याचे डोळे टपोरे, चेहरा रुबाबदार व एकदम वचक बसेल असा एकंदर तो दिसे. दत्तू त्याला म्हणाला, ''बापू, तूं हो तोतया. मला एक युक्ति सुचली आहे. तूं बरा आहेस. येथें कोणाच्या ओळखीचा नाहींस. मी आणि माझी बहीण तुला साह्य करूं.''

झालें. ठरल्याप्रमाणें दोन दिवसानीं बोर्डिंगमध्यें मेस्मॅरिझमचे प्रयोग होणार अशी बातमी उठली. मुली घाबरल्या. साहेब, मडमसाहेब, दत्तूचे श्वशूर इतकीच बाहेरची प्रेक्षकमंडळी होती. बाकी सर्व मंडळी बोर्डिंमधली. मुली मास्तरणी व आम्ही सारे हजर होतों.

मित्रवर्य आले. त्यांना पाहतांच कांहीं मुली घामाघूम झाल्या. त्यांनीं विचारलें बोला कोणावर प्रयोग करूं ? कोणीच उत्तर देईना, तारा म्हणाली करा माझ्यावर प्रयोग. त्यांनीं प्रयोग करण्यास सुरुवात करतांच ती लाल झाली. तिनें डोळे गच्च मिटून घेतले. हळूं हळूं तिचे ओठ हालण्यास सुरुवात झाली. बोल तूं काय काय केलेंस ! बापू म्हणाला. बेबी म्हणाली मी बरेच वेळां चोरून खाल्लें, आईचे पैसे चोरून खाऊ घेतला. एकदा एक पुस्तक चोरलें--हा पापांगिकार जसजसा तिच्या तोंडून बाहेर पडूं लागला तसतशी मुलींची पांचावर धारण बसूं लागली.

माझे व्याही हा प्रयोग पहाण्यासाठीं मुद्दाम आले होते. ते म्हणाले, ''आतां ह्या मुलीला सावध करा. ती फार घाबरली आहे. आतां दुसऱ्या एखाद्या मुलीवर प्रयोग करा.''

सर्व वातावरण गंभीर झालें. कोणी कांहीं बोलेना. बेबीला जादुगारानें सावध केलें. ती सावध झाली. मग साहेब म्हणाले, आतां रात्र फार झाली आहें आतां आपण पुन्हां एखादे वेळेस या.

सर्व मंडळी गेली. नाटक उत्तम झालें. परिणामकारी झालें. कारण दुसऱ्या दिवशीं सकाळींच ज्या जया वस्तू चोरीस गेल्या होत्या त्या त्या आपापल्या जागीं आपोआप येऊ न पडल्या. व त्यानंतर हें चोरीचें सत्र बंदच पडलें.

* पुण्यांतील सर परशुरामभाऊ कॉलेजमधील प्रो.ज.नी.कर्वे.

— ३ —

# दुःखार्णवांतील आनंदाच्या ऊर्मि

टिळकांना जाऊन जवळ जवळ तीन महिने होत आलें. आज माझ्या आनंदाला भरतें आलें होतें. मुलींच्या सहाय्यानें मी आपलीं कामें भराभर आटोपून घेतीलीं. मला समजलें होतें, कीं आज मला दवाखान्यांत जावें लागणार होतें. बारा एकाच्या सुमारास मी दवाखान्यांत गेलें. तो दिवस रविवारचा होता. त्यामुळें मुलींना कामें सांगून मला जातां आलें. दवाखान्यांत जाऊन पहातें तों खरेंच तेथें माझी सून व तिची आई. दुःख व आनंद ह्यांच्या भोंवऱ्यांत मी गिरक्या घेऊं लागलें. सुखदुःखाच्या उकळ्या एकसारख्या फुटत होत्या. मला रडूं आवरेना. चाराच्या सुमारास नातु [१] दृष्टींस पडला. त्याच वेळेस मीं हीं कविता रचली.

दुःखार्णविं मी बुडतां बुडतां हळुंच एक ऊठली
लाट ही, प्रेमाची धांवली
त्या लाटेनें हळुंच आणुनी तीरावर सोडिलें
जरी मज पुरें पुरें भिजविलें
शीतल वायू प्रखर सूर्य हा करी मला कोरडें
तरी कां येतें मजला रडें
आसवें कशाचीं सांगा मजला कुणी
मी हसतें रडतें वेड लागलें मनीं
रडविती हंसविती जुन्या नव्या अठवणी
एक नयन मम गाळी अश्रू, दुःखाचे परि दुजा
म्हणे मज सौख्याश्रूंनीं भिजा
सुखदुःखाचें भांडारचि हें उघडें माझ्यापुढें
पाहिलें मीं माझ्या प्रभुकडे
महिमा त्याचा गौरव त्याचें, त्यानें तें आपुलें

१. नारायण देवदत्त टिळक उर्फ नाना. जन्म: ५-८-१९१९.

उघडु नी पुढें अहा मांडिलें
जरा थबकलें, धांवुन गेलें, पायांना बिलगलें
अश्रुंनीं प्रभुचरणा भिजविलें
तो मला म्हणे घे तुज व्हावें तें करीं
मी तुला सांगतों सौख्याला तूं धरीं
ही देवाजीची कृपा होय मजवरी
बालकवी हा जगीं धाडिला देवानें मजकडे
चिमुकलें बालक माझ्यापुढें २

वंशवृक्ष हा माझा फुलला, बघुनी त्याच्याकडे
शिंपिले अश्रूंचे मी सडे
सुखदुःखाचा वांटेकरी मम माझ्याजवळीं नसे
पाहुनी मजला स्वर्गी हंसे
हंसें फुलांचें सदा जयाच्या हृदयामध्यें वसे
तयाला दुःख पाहवें कसें ?
तो देवाजवळीं काय विनंती करी
ही रिती जहाली जागा परतुनि भरी
जगिं सेवा माझी नाहिं जहाली पुरी
म्हणुन धाडिली जोड नवी ही माझ्या बाळाकडे
चिमकुलें बालक माझ्यापुढें ३

पाय गोजिरे हाणी माझ्या हृदयकपाटावरी
फोडुनि दुःख, तमातें हरी
साहुनि ऐशा अपमानातें आलें मजला हंसें
कळलें नाहीं मज तें कसें
मी हंसतें हें पाहुनि आली आशा माझ्याकडे
घेऊनी मज संगें वर चढे
ह्या आनंदाच्या उंच उंच गिरिवरी
मज घेऊन गेली दाखविले ते दुरी

मम जुनेपुराणे किल्ले त्याच्यावरी
हा सोन्याचा काय हिऱ्याचा कळस त्यावरी चढे
चिमकुलें बालक माझ्यापुढें ४

टिळकांच्या मागें मीं रचलेली ही दुसरी कविता. मुलें म्हणूं लागलीं, ''आई, बरें केलेंस कविता केलीस. आतां तर लोकांना म्हणतां येणार नाहीं ना कीं तुला पपाच कविता करून देत होते म्हणून ?'' मी म्हणाले, ''अरे त्यांनीं हे सारे प्रसंग कल्पून आधींच कशावरून नसतील ह्या कविता रचून ठेवल्या?''

सून दहा दिवस दवाखान्यांत होती. पुढें महिनाभर माहेरीं गेली व चाळीसाव्या दिवशीं मुलाचा बाप्तिस्मा झाल्यावर घरीं आली. मुलाचें नांव आजाचेंच ठेवलें, कारण मि.ब्युएल वगैरे मंडळीनें तें नांव मोठ्या आग्रहाने सुचविलें होतें. बारशाला आम्हीं कांहींच केलें नाहीं. मुलींना गुळतूप दिलें व दहा रुपयांचे पेढे वाटले.

नानासंबंधीं एक मोठी गंमतीची गोष्ट होती. टिळकांची शेवटली यात्रा सुरू होण्याच्या आधीं त्यांना दवाखान्यांतून घरीं आणलें होतें. त्या वेळीं माझ्या सुनेनें आठवण म्हणून त्यांच्या दाढीचे कांहीं केस कापून ठेवले होते. हें तिनें अगदीं गुपचीप केलें होतें. पण नाना जन्माला आला तेव्हां त्याच्या गळ्याला त्याच ठिकाणीं पेरभर लांबीचे केस होते. अजूनहि आहेत. पण आतां तो मोठा झाला आहे.

आम्ही होतां होईल तों सगळें कांहीं टिळकांच्या इच्छेप्रमाणें करण्याचा नियम ठेवला होता. टिळकांना दहन करून त्यांच्या अस्थि तीन चार महिने एका लहानशा पेटींत घालून रे.मलेलूंच्या ताब्यांत ठेवल्या होत्या. ह्या अस्थि नगरच्या कबरस्थानांत नेऊन ठेवायाच्या असें त्यांचें सांगणें होतें. आतां आम्हांला जरा उसंत मिळाला होता. तशांत नगरास तेथील वार्षिक सभाहि होतीं. रे.डॉ.एच्.फेअरबँक ह्यांच्याशीं पत्रव्यवहार करून आम्हीं सगळें कांहीं आधींच ठरवून ठेवलें होते.

मी, दत्तू व बेबी टिळकांच्या अस्थि घेऊन नगरास जाण्यास निघालों. आम्ही चारच दिवस बाहेर राहणार होतों. माझ्यामागें माझ्या सुनेनें बोर्डिंगचें काम करण्याचें अंगावर घेतलें. तिला सोबत बेंजी व बाळूबाई ह्यांना ठेवलें होतें.

आम्हीं निघायाचे रात्रींच मुलींनीं प्रथम आरडाओरड केली. नियमाप्रमाणें साडेदहाला इलेक्ट्रिक पॉवर बंद केली होती. पण एका मास्तरणीनें पॉवर बंद होतांच आरोळी ठोकली. त्यासरशीं झोपेंतल्या अर्धवट झोंपलेल्या, व जाग्याहि मुली ओरडूं लागल्या. शेवटीं पॉवर सुरू केल्यावर सर्व कांहीं शान्त झालें. गांव करी तें राव न करी हें खरें ठरलें. कारण पुष्कळ

मुलींना रात्रभर दिवे पाहिजे होते व त्यांनीं अशा रीतीनें आपलें म्हणणें खरें केलें.

आम्हीं नगरला पोंचलों तो वार्षिक सभेचा शेवटला दिवस होता. ते दिवाळीचे दिवस असून त्या दिवशीं सरस्वतीपूजनाचा दिवस होता. देवळांत टिळकांच्या अस्थींची पेटी ठेवण्यांत आली व पुन्हां एकदा प्रार्थना वगैरे विधि झाले. बऱ्याच जणांनीं भाषणें केलीं. सखारामभाऊजींनींहि भाषण केलें. टिळकांच्या अस्थि चर्चपासून कबरस्थानापर्यंत भजनें म्हणत म्हणत नेण्यांत आल्या. त्यांनीं रचलेला ''तुला कोठें होते चाकरनोकर''* हा अभंग रा.हिवाळे[१] व डॉ.हिरालाल गायकवाड वगैरे दरबारी मंडळीनें फार तळमळीनें आपल्या भजनीमंडळीसह म्हटला. दुतर्फा सरस्वतीपूजनानिमित्त सडा टाकून रांगोळ्या घातल्या होत्या व दिवे लावले होते हें पाहून कोणी कोणी म्हणाले कीं, सरस्वतीभक्ताचे हे आपोआपच सोहाळे घडून येत आहेत.

डॉ.हिरालाल ह्यांनी तो अभंग अगदीं घोळून घोळून शेवटपर्यंत म्हटला. व शेवटली ओळ- 'दास म्हणे बापा तुझ्या कंथेवरी मला जागा करी थोडकीशी' - टिळकांच्या वृत्तीला व त्या प्रसंगाला अगदीं साजेशीच होती. आम्ही जातांना मुलींची झालेली आरडाओरड आम्ही गेल्यावरहि पुन्हां झाली व मधून मधून नेहमींच होऊं लागली. एकामागून एक सर्व मुली ओरडूं लागल्यावर मोठा करण्यासारखा आवाज होत असे. मला हसूंहि येई व मी घाबरूनहि जाई.

दैवयोगानें जरी मी पागेंत येऊन पडलें होतें तरी माझा मूळस्वभाव होता तोच कायम होता. बाळपणींची वहिवाट व टिळकांचें वळण हीं कांहीं मला सोडीनात. टिळकांच्या वेळीं येत्याचें घर व जात्याचें दार असेच. त्यांनीं कोणाला आग्रहानें बोलावलें नाहीं. पण कोणी आलें म्हणजे त्याला ते नाहीं म्हणाले नाहींत.

ख्रिस्ती लोकांत शिरलेले कांहीं कांहीं पाश्चात्य रीतीरिवाज मला येतच नाहींत. सलाम करणें, उपकार मानणें, दाराशीं उभें राहून दार ठोकणें, या म्हटल्यावर मगच आंत जाणें, आपल्या घरीं कोणी पाहुणा येणार असेल तर अधिकाऱ्यास त्याबद्दल परवानगी विचारणें हें माझ्याच्यानें कधींच होत नाहीं - मी एक स्वतंत्रलक्ष्मी आहें.

माझ्याकडे एक म्हातारी आली. मीं तिला ठेवली माझ्या घरांत. पण रात्रीं ती फार बडबड करीं व झोंपेंत मोठमोठ्यानें बरळे. मला दिवसभर काम पडे व रात्रीं झोंप थोडी येई, दत्तूचें काम व अभ्यास, बेबीचेंहि तसेंच. आम्हांला तिच्यामुळें झोंपेचा त्रास होऊं लागला. तेव्हां मी तिला म्हटलें ताराबाई तुम्ही आंत मुलींच्या बाजूला निजा.

* अभंगाजलि ७७ १. रे. गंगाधरराव हिवाळे

ऐन झोपेची वेळ. बाई बाहेरून अंधारांतूनच आली व एका मुलीचें अंथरूण चांचपूं लागली. नवें घर, नवी जागा, तशांत म्हातारी, ऐन झोंपेंचा अंमल, चोरहि मधून मधून डोकावत, भुताची कल्पना, त्यांत हीं सत्रा भुतें शिरल्यावर मग एका मुलीनें म्हतारीचा हात लागतांच सुतोवाच केलें. मोठा हॉल. त्यांत लहान मोठ्या मुली, नोकरणी वगैरे साऱ्या जणी निजलेल्या. एकीचा हात दुसरीला लागला कीं तिनें ओरडूं लागावें व हाच चोर किंवा भूत म्हणून म्हणावें. जी ती आपल्या जिवाला भीत होती. कोणी कोणाचे केस ओढीत कोणी ज्याकीटें ओढून ओढून त्यांच्या चिंध्या करीत, कोणी कोणाचे पदर धरून हिसकाहिसक करीत; कोणी तर भीतीनें रांगतच होत्या. कोणी मोठ्यानें रडत होत्या तर कोणी मेलें-मेलें धांवा धांवा म्हणत होत्या; कोणी देवाचा धावा करीत होत्या, पण तोहि ओरडतच.

माशा मधाच्या पोळ्यावरून उठवाव्या व त्याहि गांधीलमाशा असाव्या म्हणजे जो आवाज होईल तस्साच हा आवाज होता. मात्र त्या आवाजाच्या शेंकडों पटीनें मोठा होता एवढेंच. मला त्या आवाजाची अजून आठवण होते व हंसूं येतें.

मी एकदम पॉवर उघडली व आंत गेलें. एक बाई रांगतच मजकडे आली. ती थरथर थरथर कांपत होती. तिचे केस मोकळे होते. कांहीं झिंज्या तोंडावर लोंबत होत्या. तिच्या ज्याकीटाच्या वाती झाल्या होत्या व लुगड्याचें वाभारे झाले होते. तिचे डोळे रडत होते व तोंड हंसत होतें. ती घामानें ओली चिंब झाली होती. तिला माझा फार राग आला होता. पण तिच्या त्या हंसण्या-रडण्यांत तो विरून गेला होता. ती रांगतां रांगतां मागें हात करून म्हणाली ''आजीबाई ती तुमची ताराबाई तिला उद्यांपासून जवळ घेऊन निजा.''

मीं ताराबाईला विचारलें काय केलेंस ? ती म्हणाली, ''मी माझें अंथरूण चांचपीत होतें, मी कुठें काय केलें ?''

० ० ० ० ०

आपल्या ख्रिस्ती व ख्रिस्तीतर देशबांधवांना टिळक एक गोष्ट नेहमीं बजावून सांगत, कीं धर्मान्तर म्हणजे देशान्तर नव्हे. धर्मभिन्नत्वामुळे ते कधीं कोणाशीं भांडले नाहींत. त्यांच्याकडे कोणत्याहि धर्माचे व कोणत्याहि जातीचे लोक येत व तेहि सर्वांकडे जात. आपल्याला आपले देशबांधव कसे वागवितात ह्याचें वर्णन त्यांनीं खालील अभंगांत उत्तम केले आहे:-

धन्य धन्य माझ्या जन्मभूची कूशी ।
उपजे महर्षी संत मूनी
कां रे ख्रिस्ती मला कोणीच पुसेना ।

कोणी रागावेना मजवरी
भेटती वंदीती प्रेमें आलिंगिती ।
कोणी न म्हणती विटाळलों
माझीया गुरुला सुखें सन्मानीती ।
आप्त हा म्हणती आमूचाच
सांगतों नित्याचा माझा अनुभव ।
नका अवास्तव म्हणूं कोणी
दास म्हणे माझी जननी उदार ।
तिचा परिवार तिच्या ऐसा

(अभंगांजलि १८९ अभंग *)

पण आमच्या ख्रिस्ती बंधुभगिनींचा पुष्कळ वेळेस असा समज असता, कीं कोणा हिंदू माणसाकडे अधिक जाणें येणें किंवा मैत्री असली कीं तो ख्रिस्ती माणूस हिंदु होण्याच्या पंथाला लागला. आमच्याकडे पुष्कळ हिंदु येत; रहात. व तें मुलींचे बोर्डिंग, तशांत वरील चमत्कारिक कल्पना; त्यामुळें पुष्कळ वेळेस भीक नको कुत्रें आवर अशी आमची स्थिति होत असे.

एक दिवस दुपारीं दोन अडीचच्या सुमारास एक तरुण माणूस भेटायाला आला. दत्तू त्या वेळीं घरीं नव्हता. त्या गृहस्थाचा पोषाक सरदारी थाटाचा होता. गुडघ्यापर्यंत कोट, घट्ट पायजमा, पायांत चढाऊ बूट, अंगठी, छडी, घड्याळ.

''टिळक येथेंच राहतात ना ?''

''होय ? तुम्ही कोठून आलां ?''

''इंदुराहून.''

मला वाटलें माझ्या रामभाऊ काकांनीं टिळक वारलेले कळल्यामुळें कोणाला तरी पाठविलें असावें. दत्तूच्या मुंजींत त्यांनीं मला पैसे पाठविले होते. हे काका म्हणजे दिनकरशास्त्री खांबेट्यांचे चिरंजीव. मीं म्हटलें,

''तुम्हीं कोणाकडून आला?''

* नवी आवृत्ति १३३

‘‘कोणाकडून नाहीं. माझा मीच आलों.’’

‘‘कोणाला भेटायचें आहे ’’

‘‘लक्ष्मीबाईंना व त्यांच्या मुलाला’’

‘‘बसा. मुलगा गेला कामाला-मुलगी कॉलेजांत, सून नातू घरांत आहेत. आणि लक्ष्मीबाई त्या मीच. खरेंच मीं तुम्हांला ओळखलें नाहीं.’’

‘‘कसें ओळखाल?’’

‘‘आपलें नांव आडनांव काय ?’’

‘‘विठ्ठल दत्तात्रय घाटे.’’

नांव ऐकतांच मला आनंदाचें भरतें आलें. मीं त्याला पोटाशीं धरलें. अश्रूंचे लोट त्याच्या स्वागतार्थ बाहेर पडूं लागले. मीं त्याला किंवा त्याच्या माणसांना कधीं पाहिलें नव्हतें. पण त्याचे वडील टिळकांचे प्रेमळ स्नेही होते. आम्हीं नसतांना * त्याचे आजोबा व आजीबाई नेहमीं टिळकांचा समाचार घेत. झाल्या केल्याला त्यांना आपल्या घरीं नेत. त्या वेळेस हीं दोन मुलें लहान लहान होतीं. मीं सर्वांची विचारपूस केली. त्यानें सांगितलें, आम्ही आतां नुसते दोन भाऊ काय ते आहोंत.

‘‘काय रे तूं कविता करतोस का ?’’

‘‘हो.’’

‘‘मग म्हण पाहूं.’’

त्यानें इतकी सुंदर कविता म्हणून दाखविली कीं कांहीं पुसूं नका. मीं दुसरी म्हणायला सांगितली. तेव्हां त्यानें संध्याकाळीं पुन्हां येण्याचें कबूल केलें. सात-आठच्या सुमारास वही घेऊन येतों व मग साऱ्या कविता म्हणून दाखवितों असें कबूल करून तो गेला.

तो गेल्यावर दत्तू, बेबी घरीं आलीं. त्यांना हें समजल्यावर फार आनंद झाला. रात्रीं आठ वाजतां म्हटल्याप्रमाणें तो आला. आम्ही सारे तयार होऊन त्याची वाट पहात बसलों होतों. सारे म्हणजे घरांतीलच सारे. त्याचें काव्यगायन रात्रीं एकपर्यंत चाललें होतें. तें काव्यगायन अगदीं कमालीचें मनोवेधक होतें. कविता सुरस, म्हणणें प्रेमळ व स्वभाव आनंदी. त्यानें प्रथम म्हणून दाखविलेली कविता प्रेमानें ध्याऊं ही पुढें दत्तूनें ज्ञानोदयांत

* लक्ष्मीबाई नगरास टिळकांकडे येण्यापूर्वी १८९५-९९ च्या दरम्यान

× उपासना संगीताच्या नवीन आवृत्तीत ही कविता वगळलेली आहे.

छापली व नंतर ती आमच्या उपासनासंगीतांतहि प्रविष्ठ झाली.[×] दत्त कवींचा पूर्वीचा ऋणानुबंध पुन्हां अशा तऱ्हेंनें कायम झाला.

माझी सून जरी मुंबईसच जन्मलेली व तेथेंच वाढलेली तरी तिला बावकर हॉलची हवा मानवेना.नानाहि फारसा बरा नसे; तेव्हां ती नगरास माझ्या बहिणीकडे म्हणजे सौ.शहाबाई मिसाळ ह्यांच्याकडे गेली. तेथें शहाबाईंनीं व त्यांच्या पतींनीं [१] तिचें पुष्कळ केलें. पण नानाला जास्तच बरें वाटेनासें झाल्यावर ती राहुरीला गेली. डॉ. व मिसेस बालेंटाईन ह्यांनीं तेथें त्यांचें फार केलें. तेथें सहा महिने राहून बेंजीच्या लग्नाला ती परत आली.

वयाच्या मानानें नाना फारच लवकर बोलूं लागला होता. त्याला चित्रांचा फारच नाद. तो त्याचा खेळच होता. त्याच्या हातांत खडू देऊन त्याला फळ्यांच्या जमिनीवर बसविलें कीं तो ''बाग्याबुवा'' ''भपभपगाई'' वगैरे आवडती चित्रकला सुरू करायचा. बाग्याबुवा म्हणजे बागूलबोवा. भपभपगाई म्हणजे आगगाडी. त्याला मुली विचारीत तुझी आई काय शिकली ? तर तो म्हणे बीये, बाप ? बीये. आत्या ? बीये. अन् तुझी आजी काय शिकली रे ? तर तो म्हणे ''भोपळा'' मुलींच्या प्रार्थनेच्या वेळीं तो हजर राही. न शिकवितांच तो आपल्या आईच्या वडिलांना ''आदा'' म्हणूं लागला. त्याच्या आजीला फार धन्यता वाटे.

१ .ग्यानोबा मिसाळ

— ४ —

# विनाशकाले विपरीतबुद्धि

नाना लहान होता. रूथच्या माहेरी दारापुढें नागपंचमीचा मोठा बाजार भरे. ती आज नानाला घेऊन तो पहावयास गेली होती. आमच्याहि बोर्डिंगच्या मुलींना ती यात्रा पाहायला पाहिजे होती. पण असले हिंदु लोकांचे सण, मेळे, यात्रा पाहणें योग्य नाहीं असा आमच्या समाजाचा समज व अधिकाऱ्यांचें मत असल्यानें बिचाऱ्या मुलींना जातां आलें नाहीं.

अलीकडे आमच्या मडमसाहेबांना व त्यांच्या पतींना [१] पोहाण्याचा बराच नाद लागला होता. आपणासारीखे करीती तात्काळ । नाहीं काळवेळ तयालागी. त्यांनीं मुलींनाहि पोहण्यास नेण्यास सुरुवात केली. आज शाळेलाहि सुट्टी होती व मनांतहि हौस होती. तेव्हां मुलींना घेऊनच पोहोण्यास जाण्याचें त्यांनीं ठरविलें.

साहेबांनीं पोहोण्यासाठीं आधींच निवांत व निर्जन अशी जागा ठरवून ठेवली होती. मुली, मास्तरणी, मी वगैरे सर्वांनीं जमून निघायाचें असें आधल्या रात्रींच ठरलें होतें. सर्व जणींनीं पहाटेंच उठून आपापलीं कामें उरकून घेतलीं. मोठाल्या माणसांनासुद्धां अशा वेळेस कांहीं सुचत नाहीं. मग लहान लहान मुलींचा उत्साह तो काय विचारावा ? आज त्यांच्या अनंदाला भरती आली होती. दोन दोन घांस खाऊन जिनें तिनें सर्व कांहीं व्यवस्था बिनभोभाट करून सहाला सर्व जणी तयार होऊन उभ्या राहिल्या. रात्रींच सर्व जणींनीं आपापले दागिने काढून मजजवळ ठेवले होते. दागिने ते काय असणार- पण होतें तें किडुक मिडुक मिळून बरेंच झालें.

आम्ही येथून तेथून पायानेंच गेलों व आलों. इतक्या जणींना मोटारी न् तांगे कसे करतां येणार ! मधला प्रवास आम्हीं आगगाडीनें केला.

साहेब मोटारीनें माहीमपर्यंत गेले. मडमसाहेब आमच्याबरोबर आगगाडीनें आल्या. त्या माहिमास उतरून साहेबांबरोबर पुढें गेल्या. आम्ही चालत गेलों.

१. मि. व मिसेस हेजन

स्टेशनवर उतरतांच आम्हांला एका मुलीचे वडील [१] भेटले. आमच्याबरोबर ते बरेच बोलले. ती त्यांची एकुलती एक मुलगी होती. तशी त्यांना मुलें बरींच होतीं. पण ही शेवटचीच व सर्वांच्या पाठीवर पाय देऊन आलेली होती. ती फार बुद्धिमान् व हुषार असल्यामुळें सर्वांना हवीहवीशी वाटे.

मी आजपर्यंत अधिकाराचीं कामें कधीं केलीं नसल्यानें अधिकार कसा गाजवावा तो मला कधींच गाजवितां आला नाहीं. मुली व मी नातेवाईकाप्रमाणें वागत होतों. एखादी काकी, मावशी किंवा आजी असावी तशा त्या माझ्याशीं वागत व मी त्यांच्याशीं वागे. मात्र कोरडीच हो.

आम्हीं सर्वजणी खेळीमेळीनें चाललों होतों. सर्वजणी माझीच थट्टा करून बोलत होत्या. कोणी म्हणे पाहूं आजी कशा धांवतात. तर कोणी म्हणे अग त्यांना चांगलें झराझर चालतांहि येत नाहीं नि त्या कसच्या धांवताहेत. एक म्हणे काय ग ? आजी पडल्या तर ग ? दुसरी म्हणे पडल्या तर मी त्यांना उचलून घेईन. त्यावर तिसरी म्हणे तुला एकटीला नाहीं उचलली तर? यावर उत्तर येई ''अग चार माणसं आणून आजीला उचलून नेऊं.'' नाहीं तर डोली करून नेऊं.

''अन् जखमी झाली तर ?''

''पट्ट्या बांधूं''

''अन् बुडाली तर ?''

''पाण्यांतून काढूं.''

''अन् मेली तर ?''

''आपण रडूं.''

''अग नका ग आजीला असं बोलूं.''

''बायांनो मला बोला पण तुम्ही सुखरूप असा. बोलतांना नेहमीं सुधें बोलावें. व्हायचें तें होतेंच''.

आम्हीं सरासरीं साडेदहाला जुहूला पोंचलों. सामानसुमान लावलें. कोणीं आपल्या सतरंजा हंथरल्या. कोणी लोळूं लागल्या. कोणी वाचीत बसल्या. कोणी इकडे तिकडे बागडूं लागल्या. पोर व ढोर सारखेंच. ढोराला चारा असला कीं चाललेंच तें पुढें पुढें.

१. सावळारमाजी भालेकर

पोराला गंमत दिसली कीं चाललेंच तें तिच्या मागें मागें.

मडमसाहेब म्हणाल्या असलें ठिकाण कधींच मिळालें नाहीं व पुढेंहि मिळणार नाहीं. हें फारच आठवणीजोगें आहे.

बाईंचें हें भाकीतच ठरलें.

मी गोदातटीची. माझी व सागराची जानपछान नव्हती. तशी नुसती नजरभेट झालेली होती इतकेंच.

निघतांना बऱ्याच जणांनीं मोडा घातला होता, कीं आज नागपंचमी आहे. तेव्हां भरतीच्या वेळेस तुम्हीं जाऊं नका. पण आमच्या साहेबांना व मडमसाहेबांना भरती दोनला येणार असें कोणीं सांगितलें होतें व त्यावरच ते अवलंबून होते.

आम्हीं गेलों तेव्हां पाणी कुठेंच नव्हतें. मला गंगेचें पाणी पाहण्याची संवय. तेव्हां हें सारें उघडें वाळवंट पाहून मला नवल वाा़टलें. मी म्हणें येथें घोटा भिजण्याची मारामार. येथें ह्या पोहोंणार कशा ?

मुलीं म्हणाल्या आतां भुका लागल्या. आम्हांला कांहींतरी खायला द्या. आपल्या देशाची रीत, कीं भुकेचें नांव काढल्यावर खाल्ल्यावांचून जाऊं द्यायचें नाहीं. तर जेवल्यावर आंघोळ करायची नाहीं अशी पाश्चात्य रीत. येथें माझा व मडमसाहेबांचा मतभेद होऊन त्यांनीं आधीं आंघोळ व मग जेवण असें फर्मावलें.

एकीमागें एक अशा सर्वच मुली निघाल्या. कांहीं मोठ्या व मध्यम मुली शिंपा वेंचीत वेंचीत आमच्या पासून बऱ्याच दूर गेल्या. कांहीं मुली पोहायाला शिकण्याजोग्या मडमसाहेबांजवळ होत्या. व तीस चाळीस लहान लहान मुली माझ्याजवळ होत्या. दत्तू, बेबी आलीं नाहींत म्हणून मला वाईट वाटत होतें. ह्या मुलींत एक लहानसा डे स्कॉलर मुलगाहि आला होता. तो आपल्या आईंबापांचा एकुलता एक मुलगा होता. आंधळ्यांची शाळाहि आली होती.

अकराचा सुमार. पाणीं येऊं लागलें. पाणी फारच संथ होतें. आत्तांशा कोठें घोट्याचें पाणी गुडघ्याला लागूं लागलें. पाणी गढूळ व गरम होतें. माझें डोकें सुपीकच. मला वाटलें आतां बाराचा सुमार झाला आहे तेव्हां सर्व गिरण्या सुटल्या असतील व त्यांचें हें सोडलेलें गरम पाणी असेल. आतां पायांखालची वाळू सरकूं लागली तोंच एक आरोळी ऐकूं आली. ''भरती आली बाहेर व्हा.'' जवळ नाहीं माणूस. हातांत नाहीं काठी. पायांजवळ नाहीं दगड. मोकळें मैदान. कोणाचा शब्द कोणाला ऐकूं येईना. मडम पोहोण्याच्या नादांत. मुली

शिंपांच्या नादांत. मडम म्हणाली होती कीं, हीच मुलींना पोहोण्यास योग्य जागा आहे. कारण येथें पांखराचा वारा नाहीं कीं, माणसाचा थारा नाहीं. मला त्या बोलण्याचा अनुभव आला. एवढी बारा कोसांची मुंबई. माणसांनीं गजबजलेली पण तेथें चिटपांखरूं नसावें ! असे अकालीं बळी घेतले गेले ह्यांत ईश्वराची काय योजना असेल ती त्याची त्यालाच माहीत. घोट्याचें पाणी गुडघ्याला लागलें, गुडघ्याचें कमरेला लागलें. पण अगदीं संथ. माझ्या कमरेला पाणी लागूं लागलें तें माझ्या बरोबरीच्या लहान लहान मुलींच्या गळ्याशीं आलें. पाणी संथ असल्यानें व त्या परिस्थितीच्या भयानकपणाची जाणीव मला नसल्यानें मला माझ्याजवळच्या सर्व मुली पाण्यांतून काढतां आल्या. कोणाचे केंस, तर कोणाचे खवाटें, कोणाचीं ज्याकिटें, तर कोणाचीं मनगटे धरून मी त्या मुली भराभर पाण्याच्या बाहेर काढल्या. तोंच कोळी लोक आपल्या होड्या घेऊन आले. त्यांनीं आंधळ्यांच्या शाळेंतील एक बुडणारा मुलगा काढला. त्यांची शाळा आमच्यापासून बऱ्याच अंतरावर उतरली होती. त्याच दिवशीं त्या आंधळ्या मुलांपैकी एकजण नारळाच्या झाडावर चढून तेथून पडला होता.

आमच्याकडे सर्व स्त्रीराज्यच होतं. माझ्याभोंवतीं सर्व लहानलहान मुलीं होत्या; पण त्यांत वीरस्वामी नांवाची एकच मुलगी मोठी होती. ती अशक्त व आजारी म्हणून मागें राहिली होती. माझ्या बरोबरीच्या मुली पाण्यांतून काढून त्यांना हर्र हुर्र करीत कशी तरी हांकीत त्या मोठ्या मुलीजवळ घेऊन गेलें. ती तेथें पडलेल्या सामानाजवळ बसली होती.

तेथें जाऊन पोंचतें तों दुसरें संकट आलें. तेथील रखवालदार म्हणूं लागला, हें सामान येथून काढा. आतां जवळ नाहीं मोठें माणूस. जेवणाचीं मोठमोठीं भांडीं, बाराजणींच्या बारा जिनसा, छत्र्या, वहाणा, लुगडीं, ब्यागी, पिशव्या, पैसे - त्या वेळीं मला त्रिभुवन आठवलें. त्या रामोशाचा एकसारखा तगादा. येशू ख्रिस्ताच्या बोलण्याची आठवण झाली कीं, ''मनुष्याच्या पुत्राला डोकं टेंकायाला जागा नाहीं.'' कसेंतरी दाट बळ करून जिवाच्या अदावतीनें तें सामान हालविलें. तोंच ह्या मुली भोरड्याप्रमाणें इकडून तिकडे सैरावैरा धांवूं लागल्या. शिंपांच्या मागें गेलेल्या मुलींचे चेहरे अंधुक दिसत होते. कोणी वर हात करून आपल्याकडे बोलावीत, कोणी उंच दगडावर चढून बसत, पण कोणाचे आवाज ऐकूं येत ना. आतां मात्र समुद्रानें उग्र स्वरूप धारण केलें. कोळी पांचशें रुपये मागूं लागले. मी त्यांना म्हणाले, पांचशें रुपये देतें पण मुली पाण्यांतून काढा. ते म्हणत आधीं पैसे द्या. कारण माझ्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवतो ? एक नूर अदमी दस नूद कपडा. मी तर नेहमींचीच लंकेची पार्वती. माझे कपडे चांगले नसले तरी मजजवळ त्या वेळेस विम्याचे अडीच हजार रुपये आलेले होते. माझी खात्री होती कीं, मीं ते सारे पैसे देऊन टाकले असते तरी टिळकांनीं मला कधीं मना केलें नसतें व दत्तूहि नाहीं म्हणणार नाहीं. पण त्या कोळ्यांना मडमसाहेबांकडून

पैशाचें वचन हवें होतें. आणि मडमसाहेब जवळच्या मुली काढून साहेबांना टेलिफोन करण्यास गेल्या होत्या. साहेब परत गेले होते व थोड्या वेळानें येणार होते.

हा सर्व खेळ साडेअकरापर्यंत चालला. दोनाची भरती साडेदहाला आली ! बाराला मुली किनाऱ्याला लागल्या. नाशीक-पंचवटीप्रमाणेंच हें असेल. मुलींना दुसऱ्या तीरावर कोणी धरील. मग आपण त्यांना चांगली शिक्षा करूं असें मी म्हणत होतें.

पण समुद्राला त्या मुली पचविणें अशक्य झालें. त्यानें ताबडतोब स्वत: होऊनच त्या किनाऱ्याला आणून टाकल्या.

साडेबारा झाले. सकाळपासून सगळे उपाशी. लहान लहान मुली कळो कळो भुकेनं व्याकुळ झाल्या. साहेब आले. त्यांनी आपली शिदोरी सोडली व पाण्याला आधार केला. तोंच आसपासच्या बंगल्यांतून लोक हळूं हळूं जमून आमच्याभोंवतीं कडें करून उभे राहिले व आम्हांला प्रश्न विचारूं लागले, मुली होत्या किती ? बुडाल्या किती ? त्यांना कोण कोण आहे ? का साऱ्याच ऑर्फन ? तुम्ही आज आलांत हेंच मुळीं चुकलें. आज धादांत नागपंचमी. देवाला हें रुचणार कसें ? आणि तुम्ही खात तरी कसें बसलां आहां.

शेवटलें वाक्य ऐकतांच विचाऱ्या साहेब-मडमेनें आपल्या तोंडांतले घांस तसेच टाकले.

माझा पदर बांधलेलाच होता. मी त्या कड्यांत उभी राहून कमरेवर हात देऊन एक खणखणीत व्याख्यान दिलें.

''ह्यांत तुम्ही आम्हांला एक बोट तरी लावतां आहां का ? तुम्ही सर्व नुसता तमाशा पहायाला जमलां आहां. चला सारे बाजूला व्हा. आमचें आम्हांलाच ओझें वाहिलें पाहिजे.''

आतां तें कडें फुटलें व सर्व पांगापांग झाली. पहिली जी मुलगी आली ती इंग्रजी सहावींतली. ह्या मुलीचा जन्म माझ्याच हातचा. हिला मींच न्हाऊं घातलेलें. तिची आई बाळपणींच वारलेली. त्यानंतर तिच्या बापानें व बहिणीनें तिला जतन केलेलें, काल तिचा वाढदिवस होता. काल जी तिच्या डोक्यांत फुलांची वेणी घातली होती ती अजून तशीच तिच्या डोक्यांत ! तिच्या हातांतील बांगड्या तीनच दिवसांपूर्वी मीच भरल्या होत्या. एका मागें एक अशा अकरा मुली व बारावा मुलगा बाहेर आला !

हें सारें खरें का, स्वप्न ? मी हाताला चिमटा घेऊन पाहिला. स्वप्न नव्हतें. एक खटारा भरून त्यांत ह्या मोळ्या भरून जे.जें.त पाठविल्या. माझी अक्कल माझ्यापुरती. मला वाटलें कीं ह्यांना कुंभाराच्या चाकावर घालून पोटांतलें पाणी काढतील आणि त्या बऱ्या होतील.

साहेबांना विचारलें, ह्या बऱ्या होतील का ? त्यांनीं म्हटलें होतील. एक गाडी भरून चारपांच मुली उरल्या. त्या साहेबांनीं आपल्या मोटारींत भरल्या. मला ते म्हणाले, ''आजी आतां तुम्हीं थकलां असाल. मोटारमध्यें या.'' मी म्हणालें ''मी बसणार नाहीं.'' ज्यांच्या जिवावर मी पोट भरतें आहे त्या दु:खांत पायीं आणि मी मोटारमध्यें ? मला हें पसंत नाहीं. पुढें पोलिसांनीं मोटार अडविली. साहेब असो नाहींतर राजा असो त्यांना काय? तेथून साहेब सहीसलामत सुटून पुढें गेले आम्हीं सारीं पायदळच परत आलों. पण येतांनाचा तो हुरूप, तो उल्हास, तो आनंद हें आतां चटसारें नाहीसें झालें होतें. त्याची जागा आतां भेसूर अंधकारानें व्यापिली होती. पायांचा गळाठा, उरांत धडधड, मनांत चिंता ! आतां आमचे पाय मात्र चालत होते. तोंड उघडून बोलण्याची इच्छा होत नव्हती. साऱ्या वाटेनें त्या मुली दिसत होत्या. अमकी असें बोलली. तमकीनें तिला तसें उत्तर दिलें, एक ना दोन. वैऱ्यावर असा प्रसंग येऊं नयें.

आम्हीं स्टेशनवर आलों. पुन्हां तीच व्यक्ति. त्यानें विचारलें, माझी मुलगी [१] कुठें आहे? आम्ही स्टेशनवर पोचण्याच्या आधींच टेलिफोननें जिकडे तिकडे ही अशुभ वार्ता पसरली होती.

तो जिला तिला विचारी. सर्वजणांनीं माझ्याकडे बोट दाखविलें. मी वरिष्ठ. त्या आपल्या मोकळ्या झाल्या. माझ्या पोटांत मोठी धोंड उभी राहिली.

''कां बाई ? बोलत नाहीं? काय झालें ? माझी मुलगी कुठेंच दिसत नाहीं ? सांगा ! चोरून नका ठेवूं.''

मी काय बोलणार ? आपला केवढाहि वैरी असला तरी त्यालाहि असली अशुभ वार्ता सांगण्यास धीर होणार नाहीं. प्रिय वाचक हो, माझ्यावर केवढें हें मोठें संकट आलें होतें. खरें बोलूं का खोटें बोलूं हेंच मला कळेना. खरें बोललें तरीहि पाप आणि खोटें बोललें तरीहि पाप. जें आहे तें पुढें येणारच. मी सांगितलें, ''मला कांहीं बरोबर माहीत नाहीं.'' कदाचित् ती मागें असेल. कदाचित् पुढेंहि गेली असेल.

आम्हीं कशीतरी गाडी गांठली.

सात वाजतां आम्ही आपल्या व साहेब आपल्या ठिकाणी पोंचलों.

बंगल्यावरून साहेबांचा निरोप आला कीं फाटक बंद करा. कोणाला आंत येऊं देऊं नका. व परवानगीवांचून कोणा मुलीला जाऊं देऊं नका.

१. मनोरमा भालेकर

डॉ.गुरुबाई करमरकर व मि.ब्युएल भेटून गेलीं. माझे व्याही व विहीण येऊन गेलीं. कांहीं म्हणाले बरें झालें हें अधिकाऱ्यांच्या समक्ष झालें; नाहींतर तुमच्यावर केवढी ही तोहमत आली असती. डॉ.ह्यूमकडे एक मुलगा शाळेंत शिकत होता. तो आतां मोठा झाला होता. त्याच्या मेहनतीनें मुंबईस वडाळ्यानजीक एक चांगली शाळा स्थापन झाली होती. त्याला ही बातमी कळतांच तो माझ्या साह्यार्थ धांवून आला. तो मला आई मानीत असे. त्याचें नांव नारायण देशमुख.

आम्ही हुकमाचे बंदे गुलाम ! आम्हीं फाटक बंद केलें. चौकीवर जहागीरदार मांडा ठोकून बसले. जहागीरदारच्या हातांत एक सोटा होता. त्याची जात मुसलमान आहे. ह्या गृहस्थानें चाळीस वर्षें ह्या ठिकाणीं इमानेंइतबारें चौकीदाराचें काम केलें आहे. गेटच्या बाहेरच्या बाजूनें लोकांची झुंबड उठलेली. बाहेर काठ्यांचे आवाज एकसारखे होत होते. भिंतीवरून दगडांचा वर्षाव होत होता. जो तो म्हणें, दार उघडा, नाहींतर आम्ही तें मोडूं. मग काय होईल तें सांगवत नाहीं. मेलों तरी बेहेत्तर. सरकार कांहीं कुठें गेलें नाहीं. आमच्या मुली आम्हांला दाखवा नाहींतर खून पडतील.

घरांत चहूंकडे रडारड व बाहेर हें काहूर. दे माय धरणी ठाय, असें होऊन गेलें. पृथ्वी दुभंग होऊन आतां पोटांत घेईल तर बरें होईल असें वाटूं लागलें. आंतमध्यें धीर देणारे तिघेच पुरुष. दत्तू, नारायण देशमुख व जहागीरदार. कामदारणीं बायांपैकीं एकीची गेलेली बहीण, एकीची मानलेली मुलगी. तेव्हां त्या आपापल्याच दु:खांत चूर. घरांत अन्न पुष्कळ होतें पण तें घेण्यास कोणाचा हात उचलेना व खाण्यास तोंड उघडेना. जागोजागीं मोटकुळीं पडल्याप्रमाणें मोठाल्या मुली पडल्या होत्या व लहान लहान मुली मास्तरणींच्या आश्रयाला पडल्या होत्या. मोठीं माणसेंहि असल्या हलकल्लोळांत गांगरतात मग यांची बिचाऱ्यांची का कथा.

रडारड, आरडाओरड हीं चाललींच होतीं. मीं फाटकापाशीं गेलें व मोठ्यानें ओरडून बाहेरच्या माणासांना सांगितलें-

''मी दार उघडतें, तुम्हीं माझें हवें तें करा. मी भीत नाहीं. पण तुम्ही असा दंगा करूं नका. मला कोणाच्याच मुली ओळखून दाखवितां येणार नाहींत. पण मी चोहोंकडची पॉवर उघडतें. तुम्ही आंत येऊन आपापल्या मुली ओळखा.''

इतकें बोलून मीं कुलूप काढलें. धों धों धों धों माणसें आंत शिरलीं. जितक्या मुली होत्या तितक्यांचे नातलग आले. त्यांच्याबरोबर माझाहि तपास करण्यास शेवंतीबाई कोटक[१] आली.

१. टिळकांचें परमस्नेही भास्कर नानजी कोटक यांच्या पत्नी.

प्रत्येकांने मला व माझ्या अधिकाऱ्यांना शिव्यांची लाखोली वाहिली. कित्येकांनी आपल्या मुली त्याच वेळेस नेल्या. मी म्हणालें-

''अधिकाऱ्यांचा हुकूम नाहीं. तुम्हीं त्यांना विचारून मुली न्या.''

''आम्ही तुला आणि तुझ्या त्या अधिकाऱ्याला भीक घालीत नाहीं. तुम्हीं आपल्या अधिकारावर घासलेट ओता आणि काडी लावा. एवढ्या मुलीं मेल्या आणि तुम्ही ग कशा वांचलांत ?''

ती रात्र म्हणजे वैऱ्याचीच. दत्तू, बेबी, मी व नारायणराव रात्रभर उभेचे उभेच. बाहेर जहागीरदार उभा. मुंबई व आसपासची गांवें इकडून माणसें मुलींच्या तपासाला येऊं लागलीं. लहान मुली घाबरून गेलेल्या, कोणी पहिल्याच आजारी, तर कोणी आजारी झालेल्या अशा एक ना दोंन, कितीतरी भानगडी. कोणाला चहा, तर कोणाला कॉफी, कोणाला सोडा तर कोणाला मोहोऱ्या, शेगड्या, गरम पाणी, रोटी, लोणी-काय लागेल त्याचा नियम नव्हता. माडीवरून खालीं व खालून वर. पुन्हां पाहुण्यांची मनधरणी. कोणाचें समाधान करणें, कोणाला धीर देणें, कोणाला बाबापुता म्हणून परत लावणें. एका रात्रींत माझे वीसपंचवीस रुपये वरच्या वर खर्च होऊन गेले. पुन्हां पोटांत धडकी. लहान मुली राहून राहून मोठ्यानें ओरडत.

''आजी चमिंद्र चमिंद्र.''

तेथें श्रीधरराव गायकवाड मॅनेजर होते. एखाद्या लग्नाच्या वेळेस वडील माणसाला विचारावें, कीं मुलीला अमकं अमकं मागताहेत द्यायची का तेथें ? त्याप्रमाणें मला वडीलकीचा मान द्यायला ते आले. पेट्या किती लागतील, त्यांची लांबी रुंदी उंची किती धरावी वगैरे. मला तरी काय दगड कळत होतें. मी नुसती होस हो करीत होतें.

सकाळींच साहेब आले.

''आजीबाई तुम्ही मुली ओळखाल का ?''

''हो''

''त्यांचीं नांवें सांगाल का ?''

''हो. पण कोणापुढें ?''

पण माझ्या प्रश्नाचें कांहीं उत्तर न देतां साहेब निघून गेले. माझ्या उरांत धडकी भरली. डोक्यांत चक्र सुरू झालें. आतां जर का नांवें बरोबर न सांगितलीं तर काय होईल? पहिल्यांदां

साहेबच माझ्याबरोबर होते. त्यांनींच मला नांवें सांगितलीं. मला एकहि मुलगी ओळखूं आली नाहीं मग नांवें कसलीं मी सांगणार ? पण नांवें सांगण्याचा प्रसंगच आला नाहीं.

माझ्यां जीवानें सर्व अनुभव घेतले आहेत पण अद्याप कधीं कोर्टाची पायरी चढण्याचा मजवर प्रसंग आला नव्हता. पण अकराच्या सुमारास कोर्टाची-व टिळक गेल्यानंतर पहिल्यांदांच -जे.जे.ची पायरी चढलें. तेथें लोकगंगेला भरती आलेली होती. दाराशीं मोटारी व बग्या यांची गर्दी उसळली होती. सायकली असंख्य होत्या व पायदळाची तर कांहीं गणतीच नव्हती.

मला कोणी आळशी म्हणा किंवा गचाळ म्हणा. पण माझ्या अंगावर समुद्रावर अंग धुतांना जें लुगडें होतें तेंच अजून होतें. माझा त्या वेळेस जसा पदर बांधलेला होता तसाच अजून होता. तें लुगडें तसेंच ओलें अंगावर वाळलें होतें. माझ्या शरीराचें घुसळण चालूच होतें. आधींच माझी मान हालते त्यांत हें वारें. मग काय सारेंच शरीर ताजाचा कळस बनलें. मी तांग्यांतून उतरलें व चिकीच्या बापानें मला उचलून आंत ज्युरीपुढें उभें कलें. त्या गर्दीत मला माझ्या जीवाभावाची एक व्यक्ति दिसली. ती म्हणजे डॉ.गुरुबाई करमरकर [१] त्यांच्याजवळ मी जाऊन बसलें. माझें नांव पुकारतांच ही थरथरणारी मैना पिंजऱ्यांत अडकली. आतां जबानीला सुरुवात झाली. तेंच लुगडें व तोच पदर. दोन्ही हात कठड्यावर टेंकलेले. जणूं काय, लक्ष्मुंबाई डेराच घुसळण्यांस उभ्या आहेत. सर्व अंग हालतें आहे. पाठीवर मोकळे केस लोळत आहेत. पुढें कठड्यावर मान आपटत आहे. आतां ऊद कापराचाच उशीर कीं हें वारें लागणार बोलायाला. जबानीला सुरुवात झाली, पण त्या थाटांत तोंडांतून शब्दच निघेना.

इतक्यांत डॉ.गुरूबाई उभ्या राहिल्या. त्या म्हणाल्या, ''मला ज्युरीला एक विनंती करायची आहे. कृपा करून मला ह्या बाईंच्या पाठीमागें उभी राहूं द्या. मी तिला कोणतीच सूचना करणार नाहीं. पण मागें उभें राहून तिची मान धरली तर ती बोलेल.'' त्याप्रमाणें त्यांना परवारगी मिळून त्यांनीं माझी पाठराखण केली.

पुढें पहातें तों रावबहादूर आठवले. मला थोडा धीर आला. आमचीं प्रश्नोत्तरें येणेंप्रमाणें झालीं.

१. र.सुमंत विष्णु करमरकर यांच्या पत्नी.

''तुम्हीं गेलांत तेव्हां पाणी किती होतें ?''

''मुळींच नव्हतें.''

''मुलींजवळ कोण कोण होतें ?''

''आम्ही दोघीं.''

''तुम्हीं कशा बुडालां नाहीं ?''

''तें मी काय सांगूं ?''

''पाणी कोणीकडून आलें व कोणीकडे गेलें ?''

''मला भूगोल येत नाहीं. पण डावीकडून आले व उजवीकडे गेलें.''

झाली माझी जबानी. मुलींचे पुढील सोहोळे पाहण्यास मी गेलें नाहीं. जे.जे.तील देखावा वर्णन करणें माझ्या शक्तीबाहेरचें आहे. आयाबहिणी दगडाच्या जमिनीवर धडाधड अंग टाकीत होत्या. नको. ती आठवणसुद्धां असह्य होते.

जुहूची पिकनिक येथें संपली. पण तिचें प्रायश्चित बरेच दिवस भोगावें लागलें. रडणें व आरडाओरड हें पुढें दोन महिने चाललें होतें.

— ५ —

# मृत्यूच्छायेच्या खिंडीतून

आमच्या घरीं सुरू झालेल्या ह्या मृत्युसत्रांतील पहिली आहुति ठोंबऱ्यांची. नंतर टिळक. त्यांच्यानंतर लागोपाठच माझे वडील बंधु केशवरावमामा. आम्ही बोर्डिंमध्यें येऊन स्थिरस्थावर होतों न होतों तों केशवरावमामांची अशुभ बातमी कानीं पडली. त्यानंतर आमची चिकी, मग भाउजी,[१] मग माझ्या व्याह्यांची बहीण,[२] मग ज्यांना मी मुलीनाती समजत होतें त्या अकरा मुली [३], रा.मित्र,[४] रेंदाळकर,[५] काकासाहेब मिरीकर,[६] पंडिता रमाबाई,[७] माझे व्याही [८] अशी एकंदर वीसबावीस माणसें त्या वीसबावीस महिन्यांत काळानें हिरावून नेलीं. मृत्यूछायेच्या खिंडींतून [*] आम्ही चाललों होतों. मधल्यामधें कोण उचललें जाईल ह्याचा नियम नव्हता.

एक दिवस भाऊजींचें पत्र आलें मी येतों. मला स्टेशनवरून घेऊन जा. दत्तू त्यांना स्टेशनवरून घेऊन आला. टिळकांच्या मृत्युनंतर भाऊजींच्या मेंदूला धक्का बसला हें मी मागें लिहिलेंच आहे.

ते आतां पूर्वीप्रमाणें राहिले नाहींत. वाटेल त्याला वाटेल तें ते बोलूं लागले. आपल्या भावाच्या मृत्युस आपली भावजयच कारणीभूत झाली असें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें होतें. आपण आतां एक उत्तम कवि होणार असेंहि त्यांना वाटूं लागलें होतें. व कविता करण्यांत ते रात्र रात्र जागून काढूं लागले.

दत्तू, बेबी व रूथ त्यांच्या मर्जीप्रमाणें वागून त्यांना आनंदित ठेवण्याचा प्रयत्न करीत. त्यांनीं कांहींहि म्हटलें तरी त्याला होस हो करीत.

जे भाऊजी उभ्या आयुष्यांत एका शब्दानें मला कधीं कांहीं बोलले नव्हते ते आतां माझ्याशीं भांडूं लागले. मुलांना तर तीं जवळ असलीं म्हणजे ते उभीं धरीत. त्यांना रागवायला

१. स.वा.टिळक, मृत्यू : २०-५-१९२०
२. यमुनाबाई मलेलु , मृत्यू : ५-७-१९२०
३. अकरा मुली, मृत्यू : १८-८-१९२०
४. का.र.मित्र, मृत्यू : २३-६-१९२०
५. ए.पो.रेंदाळकर, मृत्यू : १५-११-१९२०
६. रा.ब.मिरीकर, मृत्यू : २२-११-१९२०
७. पं.रमाबाई, मृत्यू : ५-४-१९२२
८. कृष्णराव सरोदे, मृत्यू : २०-५-१९२०
* 'मृत्युच्छायेच्या खिंडींतून' हा शब्दप्रयोग बायबलमधला. (स्तोत्र. २३:४)

कारणच लागत नसे. एकदा बाजारांतून त्यांनीं कांहीं खाण्याचे जिन्नस आणून माझ्यापुढें आदळले व म्हणूं लागले,   घ्या खा. माझ्या भावाला मरण्यास तुम्हींच कारण झाला.   असें म्हणून ते रागारागानें स्टेशनावर निघून गेले. त्यांच्या पाठोपाठ मीं जहागीरदाराला स्टेशनावर पाठविलें व त्यानें त्यांची कशीतरी समजूत करून त्यांना घरीं परत आणलें. घरीं आल्यावर तो मला एका बाजूस घेऊन सांगूं लागला कीं, काकांनीं स्टेशनावर नोटांचें दुकानच मांडलें होतें. मीं त्यांना विचारलें, ''तुमच्याजवळ किती पैसे आहेत ? त्या सर्व नोटा मजजवळ ठेवायाला द्या.'' ह्यावरून ते पुन्हां रुसले व निघून गेले. आमच्या दीरभावजयांचें हें पहिलें व शेवटलेंच भांडण. ह्यानंतर त्यांची माझी गांठ पडली नाहीं. लौकरच ते वारल्याची बातमी आली.

पुढें माझे व्याही हवा बदलायला वाईस गेले. तिकडे ते बरेच आजारी पडले. दत्तूला डॉक्टरांचें पत्र आलें कीं, रा.कृष्णरावांची प्रकृति अतिशयच बिघडली असून त्यांच्याजवळ त्यांच्या मुलीनें असलेलें बरें. त्याप्रमाणें रूथ, दत्तू व नाना वाईस गेले. तिकडे रूथला व नानाला ठेवून दत्तू परत आला. नंतर वृत्त आलें कीं रा. सरोदे वारले. टिळकांच्या नंतर लागोपाठ आमच्या घरांतील तीन माणसें गेलीं. रा.सरोदे, सखारामभाऊजी व माझे वडील बंधु केशवरावमामा. टिळकांचा घास मिळतांच मृत्यू जणूं काय सवकला.

वाईहून रूथ परतली. ती आल्यानंतर तीनचार महिन्यांनीं रूथ पुन्हां दवाखान्यांत गेली. दिवस रविवारचाच होता. संध्याकाळी सहाच्या सुमारास दुसरा नातु[१] माझ्या दृष्टीस पडला. मी दवाखान्यांतून परत येतांना, मला बेंजी भेटला, त्याला मी म्हणूं लागलें, ''अरे बेंजी बेंजी तुला दुसरा मामा झाला.'' तो हंसू लागला. पण मी माझ्या आनंदांत इतकी कांहीं गर्क होतें कीं, बराच वेळ तो कां हंसतो हें माझ्या लक्ष्यांत येईना.

नानाच्या जन्माआधीं आमच्या घरांत चमचमीत फोडणीचे पदार्थ, निरनिराळे मसाले वगैरेचें प्राबल्य होतें. पण नंतर हा सारा मनु बदलला. आम्ही होतां होईल तों बिनफोडणीचें व बिनमसाल्याचें अन्न खाऊं लागलों. कच्चें अन्नसुद्धां आमच्या आहारांत असे. मोड आलेलीं कडधान्यें तर रूथ गर्भारपणांत व पुढें बाळंतपणांतहि खाई. त्यामुळें नाना जितका अशक्त व किडका तितकाच हा दुसरा मुलगा सशक्त व धडका निघाला.

देवदयेनें माझ्या घरांत आतां बाळगोपाळ खेळूं लागले. नानासोनाची जोडी, भीमार्जुनाप्रमाणें शोभूं लागली. नाना अशक्त, सोना सशक्त. पण त्याचें नांव सोना नाहीं. माझ्या हातांखालीं हरणाबाई नांवाची एक बाई होती. तिनें ह्याला सोन्या म्हणण्यास सुरुवात

१. अशोक देवदत्त टिळक, जन्म २९ मे १९२१

केली. पण पुढें त्यांने स्वत:च सत्याग्रह करून त्या नांवाच्या ऐवजीं त्याचें खरेखुरे नांव अशोक हें आम्हांला उपयोगांत आणण्यास भाग पाडलें.

अशोक तीन महिन्यांचा झाला नाहीं तोंच उपडा पडून समोरचें सामान भराभर ओढूं लागला. रूथ पुन्हां राहुरीस गेली. तेथें डॉ.बालेंटाईनसाहेबांनीं प्रार्थना करून त्याचें नांव अशोक ठेवले. तो खरोखरच अशोक आहे. राहुरीहून परत आल्यावर एक दिवस रूथ लोणच्याचे आंबे चिरीत बसली होती. जवळच मी लोणच्याचा मसाला करीत होतें. तोंच अशोक ओकूं लागला. मीं रूथला म्हटलें, ''पाहिलेंस तूं आंबे चिरायला घेतलेस म्हणून त्याला सर्दी झाली.'' रूथ म्हणे, ''त्याला अजून मीं हातसुद्धां लावलानाहीं, त्याला सर्दी होईल कशी ?''

नाना त्याच्या जवळच बसला होता. तो एकसारखा म्हणे, ''बाळ आजींची पावडर लावतो   नाना सारा दीड वर्षांचा.  आम्हीं दोघीं आपापल्या नादांत. अशोक शिंकतो आहे, ओकतो आहे, नाना बडबडतो आहे.'' शेवटीं  नाना ओरडून म्हणाला, ''आजीची काळी पावडर बाळानें खाल्ली.'' आतां आमच्या ध्यानांत आलें. आजीची पावडर कसली कर्माची! जन्मांत तिला पावडर माहीत नाहीं, पण काळी पावडर म्हटल्यावर आमचें लक्ष गेलें. अशोक तपकिरीच्या पुड्याशीं खेळत होता व तपकीर खात होता.

हें बाळ बाळपणापासूनच खोडकर. हाहि नवव्या महिन्यांतच चालू बोलूं लागला. नाना बैठा तर हा फिरंग्या. रात्रीं रडणें ठाऊक नाहीं. दिवा असला  म्हणजें पुरे. हे उंदीरमामा चोहींकडे कारभार करण्यास निघत. रात्रीं पिंजरा उघडून एकदोन केळीं काढून सोलून त्यांचा चट्टमट्टा झाल्यावर कोणापुढें तरीं जाऊन निजत. एक दिवस दुपारीं मी निजलें होतें. माझ्या तोंडावर रुमाल येऊन पडला. डोळे उघडून पहातें तों कोठें कोणी नाहीं. पुन्हां निजलें. पुन्हां तोच प्रकार. दोन दारांतच भिंतीला लागून माझा पलंग होता. एका दारांत पहावें तों दुसऱ्या दाराने तो पळून जाई. दुसरीकडे पहावें तों पहिल्यानें निसटे. शेवटीं उठलेंच.

टिळक जाण्याच्या आधींपासूनच चिकीला फारसें बरें नव्हतें. पण त्या गडबडींत चिकीकडे फारच दुर्लक्ष झालें व त्याचें मला एकसारखें वाईट वाटतें. माझ्यामागें काम धांवत होतें व पुढें पोट धांवत होतें. दिवाळीच्या सुट्टींत मुली आपापल्या घरीं जाण्यास निघाल्या. आपणहि जावें असें चिकीला वाटूं लागलें. तशी चिकी फार हौशी मुलगी होती. फिरावयाला जाणें, वनभोजन करणें, चांदण्यांत बसणें, गांवाला जाणें - पण ह्या साऱ्या गोष्टी तिच्या मनासारख्या तिला कोणी करूं देत नसे. तिच्यासाठीं आणि तेवढ्यांतल्या तेवढ्यांत असल्या धूमधडाक्यांत पैसा व वेळ कोण खर्च करतें ? तिचा बाप इकडे तिकडे कोठेंतरी कामाची धरसोड करीत फिरत होता. त्यानें दुसरें लग्न केलें होतें. त्या आईकडे मला

पुण्यास पाठीव म्हणून ती एकसारखी माझ्यामागें लागली. ह्या मायलेंकींनीं कधीं एकमेकींची तोंडेंहि पाहिलीं नव्हतीं. तेव्हां अनायासेंच मुलींची सोबत होती म्हणून मीं तिला पुण्यास पाठविलें, पण तिची चांगलीच हवापालट झाली. पुण्याहून जी आली ती अधिकच आजारी होऊन. आतां बरीक माझें लक्ष्य तिच्याकडे गेलें. डॉ.दांडेकरांचें औषध तिला सुरू केलें. पण बैल गेला नि झोपा केला याप्रमाणें तें झालें. दत्तू, बेबी, रूथ ह्यांनीं तिची बरीच काळजी घेतली. डॉक्टर रोज येत. तशी ती कांहीं निजून नव्हती. एक दिवस ती मला म्हणाली,

''आजी रोमन कॅथॅलिक लोकांचें मरण किती चांगलें. मेणबत्त्या, उदबत्त्या तशींच कितीतरी फुलें. मला तसें मरण फार आवडतें.''

''चिके तूं मरूं बिरूं नकोस हं. बघ तूं मेलीस तर आजोबा तुला चांगला ठोक देतील,'' बेबी म्हणाली.

''खरं का ग आजी ? स्वर्गांत ते कसे मारतील ? ते मारायला लागले तर मी टेबलाखालीं लपेन.

मरायच्या आधीं तिनें फार नाद घेतला कीं, ''आजी तूं आपल्या हातानें मला न्हाऊं घाल.'' मला काम होतें. मी म्हणालें, ''चिके असें काय करतेस ? तुला आत्या घालील न्हायला. नाहींतर बाई घालील.'' पण ती ऐकेना. ती म्हणे, ''आजी तुला काम असते ग पण मला तुझ्याच हातानें न्हाऊं घाल. तुझ्याच हातानें मला आवडतें.'' मीं तिला रागारागानें न्हाऊं घातलें.

कामाच्या बाईला तिनें एका बाजूला सांगितलें, ''हे बघ माझ्या आजीचा बिछाना घालून ठेवीत जा आणि तिचें पाणी पिण्याचें भांडें घांसून ठेवीत जा. ती कामामुळें दमून जाते. आणि तशीच कांहीं तरी खाते पिते नि कशीतरी निजते.''

चिकी माझी फारच काळजी घेत असे. माझीच असें नाहीं. घरांतील सर्वांच्याच ती फार उपयोगी पडे. इतर मुलींच्याहि ती खस्ता खाई. ती फारच प्रेमळ मुलगी होती. लौकरच आपल्या गोड आवाजानें, ''आजी येते हं, आजी मी लौकरच येईन.'' असें म्हणत म्हणत तिनें प्राण सोडला. तिचे ते शब्द अजून कधीं कधीं माझ्या कानांत घुमतात. त्यामुळें दुःख होते.

औषधाचें बिल चाळीस रुपये झालें. ते मी डॉ.दोडेकरांना देण्यासाठीं गेलें. पण त्यांनीं त्यांतील एका रुपयाला हात लावला नाहीं. ते म्हणाले, ''आई तुम्हीं तिच्यासाठीं इतकीं वर्षे इतकें केलें. मीं तिला थोडेसें औषध दिलें त्यांत काय झालें ?''

नऊ महिन्यांची संभाळलेली माझी चिकी बारा वर्षें सुख देऊन गेली.*

तिच्याबद्दल १५ जुलै १९२० च्या ज्ञानोदयांत खालीं दिलेला लहानसा मृत्यूलेख आला आहे.

-एका लहान प्रेमळ मुलीला ता.११ जुलै रोजीं देवाज्ञा झाली. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत ज्या ज्या व्यक्तींचा ह्या बाळाशीं संबंध आला, त्या त्या व्यक्तीला ही बातमी ऐकून चुकल्यासारखें वाटल्यावांचून राहणार नाहीं. जगाच्या थोड्या दिवसांच्या ह्या मुशाफराचें नांव सुभद्रा रामभाऊ धर्माधिकारी.

* चिकी जन्म १-१२-१९०८; मृत्यू ११-७-१९२०

— ६ —

# पाहुणे

मुली रात्रीं भीत. दिवसां मात्र त्यांनी कधींच आरडाओरड केली नव्हती. पण असाहि एक दिवस उगवला, कीं दिवसांसुद्धां त्यांनीं आरडाओरडीला सुरुवात केली. दोन माकडें अकल्पित अवतरलीं. लहानपणापासून पक्षी, प्राणी व मुलें ह्यांची दत्तूला फार आवड. माकडें आलीं. त्यांनीं बरीच नासधूस करण्याचा सपाटा लावला. त्यांना प्रेमानें जिंकण्याचें दत्तूचे प्रयत्न सुरू झाले. पण शेजारच्या साहेबाला प्रेमबीम कुछ मालूम नव्हतें. त्यानें गोळी घालून एक माकड मारून टाकलें. पत्नी अशा रीतीनें अचानक नाहींशी झाल्यामुळें तिचे पति एकदम कोठें गडप झाले. पण अशौचाचे तीन दिवस संपल्यावर ते पुन्हां अवतरले. दत्तूनें त्यांना केळें व पोळी दिली. पुढें रोज जेवणाच्या वेळेस ते खिडकींत येऊन बसत व हळूं हळूं पुढें पुढें सरकत. हळूंच पुढें हात करून दत्तूजवळून पोळी घेऊन जात. पण मुली भीत. त्या ओरडत व अशा रीतीनें आमच्या येथें दिवसाच्या शांतिपाठास सुरुवात झाली.

एक दिवस दत्तू शाळेला गेला असतां, एका माकडवाल्याला आठ आणे देऊन, मीं त्याच्याकडून आमच्या ह्या पाहुण्यांना पकडलं व बांधून टाकलें. तरी त्याच्याजवळ जाण्यास कोणाला धीर होईना. दत्तू आल्यावर त्याच्याकडे पाहून तें पटापट सलाम करूं लागलें. तो जवळ गेला तसें तें खालीं मान घालून त्याच्या पोटरीला धरून बसलें. दत्तूनें त्याला उचलून घेतलें. थापटलें थोपटलें व कांपाउंडांच्या भिंतीजवळ नेऊन झाडाला बांधून टाकलें.

माकडच तें. त्याच्या चेष्टा काय सांगाव्या ? ती भिंत होती कांपाउंडची, भिंतीवर बसलें कीं पलीकडल्या फूटपाथवरून जाणाऱ्या येणाऱ्याच्या डोक्यावरून आमच्या माकडाला सहज हात फिरवितां येत असे. डोक्यावरून माल नेणाऱ्यांकडून त्याच्या नकळत तें नाकें वसूल करी. काकड्या, कणसें, भाजीपाला, फळफळावळ - जें मिळेल तें वरच्यावर उचललें जाई. तशांत जर का एखादा आपला माल डोक्यावर घेऊन तेथेंच जरा कोणाशीं बोलत उभा राहिला तर त्याचें अर्धे बोलणें संपायाच्या आधींच त्याच्या डोक्यावरील सबंध टोपली संपायची. आमच्या पठ्ठ्यानें वेळ प्रसंग पाहून भराभर माल भिंतीच्या आंत फेंकायला सुरुवात करायाची. डोक्यावरील भार उतरला म्हणजे आश्चर्यचकित होऊन, त्यानें परमेश्वराचा धांवा करण्यास वर पहावें तों, वरती हे बुवा किचकिच करून त्याची चेष्टा करायाला तयार. जहागीरदाराला हें एक रोजचें कामच झालें. माकडानें माल आंत फेंकावा व जहागीरदारानें तो बाहेर नेऊन द्यावा.

एका रात्रीं अकराच्या सुमाराला समोर आग लागली. रस्त्यांत माणसांची ठेलाठेल. ती गर्दी भिंतीसरशीं. मग काय विचारतां ''किती शस्त्रें कुंडलें आणि कटके'' च्या ऐवजीं ''किती टोप्या मंदिलें आणि फेटे'' म्हणावयाची पाळी आली. आंत टोप्याफेट्यांचा पाऊस पडूं लागला. जो तो आपलें डोकें चांचपून पाहूं लागला. कोणाच्या हातांत शेंडी तर कोणाच्या हातांत गोटे. कारण टोप्या फेटें होते माकडाच्या हातांत. आपल्या डोक्यावरून कोणीं हात फिरविला हें त्या बिचाऱ्यांना काय माहीत. आगीचा डोंब शमविण्यास पाण्याचे सपके बसत होते. पण गरम झालेलीं डोकीं थंड करण्याचा सोपा उपाय कोणाच्या लक्ष्यांत येत नव्हता. ती स्वयंसेवा आमचा हा वीर करीत होता.

जहागीरदार आपल्या उच्च स्वरानें ओरडत होता, ''टोपी, टोपी, टोपी कोणाची ? फेटा, फेटा, फेटा कोणाचा?''

शनिवार रविवार मुली घरीं असत. इतर दिवसाचें एवढें वाटत नसे. पण त्या घरीं असल्या म्हणजे आमचा माकडोबा हटकून सुटे. आणि मुलींत जाऊन धुडगूस घाली. त्या ओरडायाला लागल्या कीं मी धांवत तेथें जाईं तों ही स्वारी माझ्या खांद्यावर येऊन बसे. त्या म्हणत, ''आजीबाई ह्या तुमच्या माकडानें सारा गोंधळ उडतो. त्याला बांधून टाका.''

माकड माझ्या खांद्यावर बसलें म्हणजे मी हळूं हळूं पावलें टाकीत भिंतीजवळ येई. त्या सांखळीजवळ आलें कीं त्यानें वरच्यावर उडी मारून पुन्हा मुलींकडे जावें. कीं मीं पुन्हां धांवपळ करीत तिकडे जावें. मला पाहतांच त्यानें पुन्हां माझ्या खांद्यावर उडी मारून बसावें. पुन्हां हळूं हळूं पावलें टाकीत मीं त्याला भिंतीजवळ आणावें की पुन्हां वेताळ पूर्वस्थितीवर ! असें सात आठ वेळेस झालें, आणि हा बोजा खांद्यावर-खांदे दुखून आले, व जीव नकोसा झाला, मग दत्तू आला म्हणजे त्यानें त्याला बांधावें.

एक दिवस दत्तू माझ्या मागें लागला की, ''आई तूं नानाला घेऊन फिरायला जा.'' मला इतर गांवापेक्षां मुंबईची फार भीति वाटते. मुंबईस मी कधींच एकटी बाहेर जात नाही. कोठें जायला निघालेच तर एका घरीं जाऊन मग तेथून माणूस घेऊन दुसऱ्या घरीं जातें. मग पुन्हां तेथून माणूस घेऊन तिसऱ्या घरीं जातें. मी कांहीं एकटी बाहेर जात नाहीं. तो म्हणे, ''मी तुला अशा ट्रॅममध्यें बसवून देतों कीं तुला उतरावेंच लागणार नाही. गाडी थांबेल व तेथून परत निघेल. तूं आपलीं तिच्यांतच बसून रहा.'' शिवाय ट्रॅमचा स्टँड आमच्या दारांतच. हो नाहीं करतां करतां मला व नानाला त्यानें ट्रॅममध्यें बसविलें.मजजवळ दहा बारा रुपये होते. पण त्यांचा उपयोग करतां यायला हवा होता. ट्रॅम थेटपर्यंत जाणार असा दत्तूचा समज होता. पण ट्रॅमनें मध्येंच साऱ्या उतारूंना उतरून दिलें व ती एका मोठ्या घरांत शिरून विसांवा घेऊं लागली. मी म्हटलें, ''मी उतरणार नाहीं. माझ्या मुलानें सांगितलें आहे कीं

तूं ट्रॅममध्येंच बसून राहा म्हणजे तूं परत येशील. मला उभ्या पारशाकडे जायचें आहे.'' ट्रॅमवाला म्हणाला, ''बाई तुमच्या मुलाची कांहीं चूक झाली आहे. ट्रॅम परत जात नाहीं.'' आतां मला त्रिभुवन आठवलें. जाणार कोठें ? राहणार कोठें ? खाणार काय ? ह्या मुलाला कशी जपूं? तो लहान, तोहि धड न चालता न बोलता. त्याची माझी स्थिति बहुतेक सारखीच होती. फरक एवढाच होता कीं तो जी जिन्नस पाही तो मागे. खाण्या खेळण्याच्या वस्तु दिसल्या कीं त्या तो मागें. दुधाच्या कावडी समोरून गेल्या कीं दूध मागे. मूल कडेवर, डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या आहेत, घेऊं काय नि देऊं काय असें झालेलें आहे, अशा थाटांत मी चाललं होतें. एकाला मीं सांगितलें, ''बाबारे, मला उभ्या पारशाजवळ नेऊ न पोंचीव मी तुला चार आणे देतें.'' तो तयार झाला. पण गर्दीत कोठें दिसेनासा झाला कोणास ठाऊक ? आणखी एक परोपकारी भेटला. त्यानें विचारलें, 'आजीबाई, कोठें जायचें तुम्हांला ?' मी म्हटलें, 'खडा पारशाजवळ. तो म्हणाला, चला मी नेतों तुम्हांला. मी म्हणालें, ''मीं चार आणे देईन बाबा तुला.''

त्यानें मला बऱ्याच अंतरावर नेलें. तेथे एक पारशी कोणाची वाट पहात उभा होता. त्याच्याकडे बोट दाखवून तो म्हणाला, ''आजीबाई, हा पहा येथें पारशी खडा आहे. मी येतों आतां.'' असें म्हणून तो गर्दीत अदृश्य झाला.

मला इतका राग आला कीं दोन ठेवून द्याव्या. पण तो जवळ होता कोठें ? पाय चालत होते. डोळे रडत होते. मन विचार करीत होतें ''जर का रात्रीं निजण्याची वेळ आली, तर फुटपाथवरच निजावें लागेल. पण नानाला कसें निजवूं ? त्याचे आईबाप किती काळजी करतील ?'' एक ना दोन हजार विचार येत होते व जात होते. एकीकडे पाय चालतच होते व देव नेत होता. रस्ता ओळखीचा वाटे.पण मुंबईंतच सब भाई सारखेच. मी जड पावलानें बावकर हॉलच्या पुढें चाललें. तों माकडानें किच किच करून बोलावलें. ही सरळ पुढें का चालली असें त्याला वाटलें असेल. मलाहि शंका येतच होती. आम्ही जसजसें पुढें जाऊं लागलों तसतसें तें मोठ्यानें ओरडूं लागलें. तेव्हां मी मागें पाहिलें व माझें काळीज सुपाएवढें झालें.

ह्याच सुमारास माझ्याकडे गाळांत रुतलेली एक गाय आली होती. तिचें वय लहान होतें. तिला एकच डोळा होता.कोणीतरी तिला लबाडीनें फसवून आपण मोकळाच राहिला होता. तिला सातव्या महिन्यांतच मुलगा झाला. ती सातच महिने आमच्याकडे राहिली. ह्या लहान मुलाचें सर्व मलाच करावें लागे. कारण पोरवय असल्यानें तिला बिचारीला कांहीं करतां येत नसे. तिच्यांत अशक्तपणामुळें त्याचें शरीरपोषण करण्याचें सामर्थ्य नव्हतें. मी संभाळी तिचें मूल व ती संभाळी माझी चूल. मुलाचें नांव मीं छोट्या ठेवलें होतें.

दुसऱ्याच्या दु:खानें दु:ख होते पण आनंदानें आनंद होणें पुष्कळ वेळेस जड जातें. मला दोन्ही भरपूर होतात. चंपा माझ्याच घरून दवाखान्यांत गेली. मुलगा झाला. मुलगा झाला म्हणून केवढा आनंद लोकांना होतो. पण तिला बिचारीला कसला आनंद करतां येणार ? मीं मात्र पेढे तर नाहीं पण छोट्याच्या जन्मानिमित्त बरीच साखर वाटली व माझी बऱ्याच जणींनीं चेष्टा केली.

भास्करराव उजगऱ्यांचे अलिबागेहून पत्र आलें कीं साराअम्मा मी फार काळजींत आहे. सोनूची ही पहिलीच खेप आहे. तुमच्या तिकडेच तिनें यावें असें आम्हां दोघांना वाटतें. तेथें बरेच दावाखाने आहेत.

भास्कर मला साराअम्मा म्हणे. टिळकांना आब्राहाम पापा म्हणे व दत्तूला इजहाक बाबा म्हणे. टिळकांना ऐकूं जाणार नाहीं अशा बेतानें-पण मला व दत्तूला ऐकूं जावें अशा तऱ्हेनें तो नेहमी एक गाणें म्हणे-

अब्रांमपापा तुम्ही इझाकबाबाला कापा

जुन्या करारांत आब्राहाम नांवाचा एक फार मोठा इब्री भगवद्भक्त सांगितला आहे. त्याच्या बायकोचें नांव सारा व मुलाचें नांव इझाक होतें. परमेश्वराच्या प्रेमामुळें तो इझाकाचा यज्ञ करण्यास निघाला; पण परमेश्वरानें इझाकाचा जीव वांचविला अशी गोष्ट आहे. इझाक हा आब्राहामाचा एकुलता एक मुलगा होता. तेव्हां हीं नांवें आम्हांला चटकन् बसत.

असो. साराअम्माचें ह्या लोटाला * पत्र गेलें कीं सोनूला सातव्या महिन्यांत इकडे घेऊन या. पत्राप्रमाणें भास्करराव सहकुटुंब म्हणजे सोनूसह आले. संध्याकाळची वेळ होती. आमचीं जेवणं आटपून आम्ही गप्पा मारीत बसलों होतों. अर्थात हीं दोघें आमच्या गप्पाष्टकांत सामील झालीं. त्यांना तेथल्या सर्व गमती सांगितल्या. मी म्हणालें,

''भास्कर, पण येथील एक मजा तुला पहायला मिळेल तर मोठी मजा होईल. कशाची बाबा आरडाओरड. ती प्रत्यक्षच ऐकण्यांत खरी मजा आहे. अरे नशीब लागतें त्याला.''

''खरं-अशी काय मजा आहे बुवा?'' भास्कर आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें जमिनीवर दोन्ही हाताचे पंजे टेंकून मजपुढें बसला व म्हणाला. हा माझ्यापुढें असाच नेहमी येऊन बसतो व माझी गंमत करतो.

''अरे नशीब लागतें नशीब !''

* लोट हा आब्राहामाचा पुतण्या होता.

''मग ? साराअम्मा ? उद्यां तर मी जाणार ? आजच ती गम्मत होईल तर किती छान होईल.''

''अरे ती गंमत अशी सांगून थोडीच आणतां येते ?''

पण भास्कर नशीबवान् खरा. सारी निजानीज झाल्यावर करणा फुंकला गेला. ज्या खोलींत पावरचा स्विच होता त्याच खोलींत भास्कर निजला होता. बत्त्या सगळ्या विझल्या होत्या व त्या विझविण्याचें यंत्र भास्करच्या पायांशींच होतें.

एक दोनाच्या सुमारास एका मुलीच्या डोक्याशीं बसून त्यानें चौर्यकर्मास सुरुवात केली. तिच्या गळ्यांतील वज्रटीकेवर त्याची नजर होती. तो तिचा गळा चांचपीत होता. कंदिलाचा अंधुक प्रकाश होता. तिनें विचारलें 'कोण आहे ?' तो म्हणाला 'मी हं. नीज.' ती डोळे किलकिले करून पहात होती. तो दुसरीच्या डोक्याशीं जाऊन बसला. तिच्या गळ्याशीं त्यानें हात घालतांच आता मात्र त्या मुलीला धीर निघेना. तिनें सप्तसुरांत सुरुवात केली. भास्कररावांची इच्छा पूर्ण झाली व त्यांना ही आरडाओरड पुष्कळच वेळ ऐकायला मिळाली. कारण त्याला दार सांपडेना व स्विच होता त्याच्याच खोलींत. मी म्हणे अरे दार उघड. तो म्हणे उघडूं कसें ? मला तें सांपडत नाहीं. आम्हीं बाहेरून फळ्या ठोकून त्याला दाराची खूण सांगत होतों. पण आंतल्या आवाजापुढें आमच्या फळ्यांचा आवाज त्याच्या ध्यानांतच येत नव्हता. शेवटीं दत्तूनें फटींना चिकटून कंदील धरला. व त्याच्या अनुरोधानें त्यानें दार उघडलें. मग पावर उघडली. जिकडे तिकडे प्रकाश झाला आणि मग आम्ही चोर पहाण्यास निघालों. तो बिचारा केव्हांच निघून गेला होता.

चोरांत देखील इयत्ता असतात. तो किती वेळेस तुरुंगात गेलेला, किती दिवस राहिलेला, वगैरेंची विचारपूस केल्याशिवाय त्याला कोणी मुलगी द्यायचा नाहीं. आमच्याकडे येणारे चोर कोणत्या इयत्तेंतील होते ठाऊक नाहीं. पण त्यांच्या हें ध्यानांत आलें कीं, मुलींकडे कांहीं लभ्यांश नाहीं. तेव्हां मेट्रनकडे कांहीं लग्गा लागल्यास पहाण्याचें त्यांनीं ठरविलें.

दत्तूच्या पायथ्याशीं त्याचें मोठें टेबल होते. त्याला दोन्ही बाजूला कपाटें आहेत. अंधारांत चोराला हीच तिजोरी वाटून तेथें त्यानें खडबड करण्यास सुरुवात केली. ख्रिस्ती लोकांकडे चोराला काय सांपडणार ? कपडे व लाकडें !

त्या दिवशीं नेहमींचा करण्याचा आवाज नसून निराळाच आवाज ऐकूं येऊं लागला. मी बिछान्यावर पडल्या पडल्या ऐकूं लागलें. कोणी फुगड्या खेळतें आहे कीं काय? मधूनच एकतारीनें ताल धरल्याप्रमाणें वाटे ! आधींच फळ्यांचें घर, त्याखालीं तळघर आणि त्यावर ही धांवपळ. एकसारखें धप् धप् धप् व त्यांतच चो चो चो. मी पॉवर उघडतें तों दत्तूच्या हातून

चोर निसटला. मुंबईचे चोर अंगाला कांहीं तरी गुळगुळीत चोपडतात. दत्तू व चोर शिवाशिवी खेळत होते व रूथ चो चो चो करीत होती.

— ७ —

# आजाराचा चौकोन

रूथला व मुलांना बरें वाटेना म्हणून त्यांना पुन्हां राहुरीला पाठविलें. तिला आम्ही ५० रुपये पाठवीत होतों.

जहाल मंजुळाबाईची सून मी राहण्यास बोलावली होती. लग्न झाल्यापासून मी तिला पाहिलेंच नव्हतें. ती आली होती.

ह्या वेळेस दत्तू एल.एल.बी.च्या टर्मस् भरीत होता. त्यावरून त्याचे व त्याच्या अधिकाऱ्याचे खटके उडूं लागले. तसेंच चर्चमध्येंहि त्या दोघांचें पटेनासें झालें.

उद्यां प्रिन्स ऑफ वेल्स येणार तेव्हां प्रिन्स ऑफ वेल्सला पहायला कोण कोण जाणार ह्याचे बेत चालले. सहाला जाऊन अकराला परत यायचें असें ठरलें. लहान मुलींखेरीज करून सर्व मोठ्या मुली व मास्तरणी पहाटेंच घास घास खाऊन निघाल्या. बंदरावर जायचें होतें. त्यांच्याबरोबर ही राधाहि गेली ! राधा [१] म्हणजे जहाल मंजुळाबाईंची सून.

मुलींच्या बरोबर समद्याहि गेला. जहागीरदाराला मुली समद्या म्हणत. कारण तो साऱ्या मुलींसंबंधानें बोलायचें झालें म्हणजे समद्या मुली असें म्हणे.

दत्तू बेबीनेंहि बंदरावर जावें असें मला वाटत होतें. पण दोघेहि घरीं अभ्यास करीत बसले. मी चंपीकडून बराचसा भात व वालाचें बिरडें करविलें. मीं म्हटलं बिचाऱ्या मुली, मास्तरणी भूक-भूक करीत येतील तेव्हां अन्न तयार ठेवलेलें बरें. मुली गेल्यावर थोड्या वेळानें घरीं राहिलेली एक मोठी मुलगी धांवत धांवत येऊन मला सांगूं लागली,

''आजी आजी. ती बघा गंमत ! अहो पुढच्या माडीच्या साऱ्या खिडक्या भराभर लावून घेताहेत.''

मी पुढें जाऊन पहातें तों खरेंच. आणखी आश्चर्य म्हणजे त्या खिडक्यावर रस्त्यानें भराभर दगड येऊं लागले. मीं माळ्याला सांगितलें. ''अरे काय आहे पाहून ये.'' माळी फाटक बंद करून आला. आज 'समद्या' मुलींबरोबर गेला असल्यानें गेटवर माळी बसला होता. गेट बंद होतांच बाहेरून महात्मा गांधींचा जयजयकार होऊं लागला, आंतमध्यें तीस

१. राधा गोविंद गायकवाड

चाळीस लहान लहान मुलें होतीं. तीं बाहेरचें ऐकून 'गांधी की जय, गांधी की जय' म्हणून ओरडूं लागली.

आधीच जाते वेळेस मुलींत दोन पक्ष होऊन मोठा कडाक्याचा वाद झाला होता. मीं त्यांना बजावलें होतें कीं बायांनो, हा वादविवाद करायाला तुम्हांला पुढें पुष्कळ वेळ आहे. आज रस्त्यानें एक अक्षर न काढतां जा. पण त्या मुलींची मीं समजूत काढली तशी ह्या लहान लहान पोरांची काढतां येईना.

इतक्यांत फाटकाला धक्का बसूं लागले. आमचे दोन ख्रिस्ती भाऊ व बहिणी ओरडत होतीं, कीं आम्हांला लौकर आंत घ्या. त्यांना आम्हीं आंत घेतलें. त्यांच्या येण्यानें बाहेर काय चाललें होते ह्याची कल्पना करतां आली. आमच्या तीस चाळीस गांधींभक्तांना मी दळणाच्या खोलीत नेऊन बसविलें व पुढल्या दारीं आलें तों रस्त्यांत मोठमोठ्यानें आरडाओरड चाललेली. आमच्या पाहुण्यांनीं खबर दिली की ''ट्रॅमच्या तारा तोडल्या, बत्त्यांचे खांब आडवे केले, मोटारी तोडून अस्ताव्यस्त टाकल्या. चहुंकडचीं दारें खिडक्या बंद झालीं आहेत. वाटेनें दोन्ही प्रकारच्या टोळ्या हिंडत आहेत. आम्हीं अर्ध्याच वाटेवरून माघार घेतली पुढें जाण्यास कोणाचें धैर्य होत नाहीं.''

हें सांगतांना त्यांना दम लागत होता व अंगांतून एकसारख्या घामाच्या धारा चालल्या होत्या.

आतां दत्तू बेबीला जाण्याचा हुरूप आला.

''बेबी चल येतेस का ? मी जातों हें पहायाला''

''बाबांनो तुम्ही दोघेहि जाऊं नका.''

''आई तूं फार बोवा भित्री.''

असें म्हणून ते दोघेहि निघून गेले ! आधीं मुलीं-मास्तरणींची काळजी त्यांत पाहुणी म्हणून आलेली राधा-तिची भर. तिच्या अंगावर दोनतीनशांचे डाग, त्यांतच दत्तू बेबीचा आणि धाक.

ही दोघें भेंडीबाजार, पायधुणी, चौपाटी, नळबाजार, भायखळा, नवा नागपाडा अशीं बरींच ठिकाणें पाहूनआलीं. रस्त्यांत जिकडे तिकडे शुकशुकाट. त्यांना आश्चर्य वाटे कीं एवढा मोठा दंगा म्हणतात पण येथें तर मुंबई रोजच्यापेक्षां शान्त दिसते. दत्तू बोडकाच होता. बेबी तर खादीचें मोकळें लुगडें नेसली होती. उभ्या पारशाजवळ येतांच त्यांना दोन्ही बाजूच्या लोकांनीं अडविलें. पण दोघे एकमेकांच्या सहाय्यानें वाचलीं. बाई म्हणून तिला सरकार पक्षाच्या लोकांनी हात लावला नाहीं. व अंगावर खादीची साडी म्हणून गांधीपक्षाच्या

लोकांनीं त्यांना मुकाट्यानें जाऊं दिलें. दत्तू बेबी संध्याकाळीं सुखरूप घरीं पोचले. आमच्या अमेरिकन मिशनच्या देवळापुढें भर रस्त्यांत खून झाला. तेथले साहेब आपला बंगला बंद करून आंत बसले. आमचे अधिकारी मात्र आपल्या मडमसाहेबांसह तेवढ्या दंगलींत मुलींना सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. काठ्या, सोटे, दगड हींच काय तीं हत्त्यारें; पण सारी मुंबई घाबरून गेली होती.

आमच्या 'समद्यानें' 'समद्या' मुली मास्तरणींचा कळप कसातरी संभाळून सुरक्षितपणें कॅनन जोशांच्या [१] वाडींत नेऊन सोडला. तेहि परात्मा जाणणारे गृहस्थ होते. त्यांनीं कांहीं वेळानें म्हणजे चाराच्या सुमारास महत्प्रयासानें मुलींना एक एक गुटली, एक एक चहाचा कप आणून दिला.

आमचा माळी फाटकाच्या फटीला डोळे व कान आदलून बदलून लावीत बसला होता. पांच पांच मिनिटांनीं तो आंत बातमी आणून पोंचवायाचा. त्याची प्रत्येक खबर ताजी व खुसखुशीत असायाची. आतां काय तर मुली पठाणानें पकडल्या, आतां काय तर त्या मवाल्यांनीं कोंडल्या, आतां काय तर ट्रॅम उलटली त्यांत मुली चेंगरल्या. त्याच्या सगळ्या बातम्यांचा संबंध केवळ आमच्याच मुलींशी असे.

रात्रीं नवाच्या सुमाराला कसें तरी लपत छपत आमचे साहेब येऊन पोंचले. त्यांनीं सांगितलें, ''आजीबाई, भिण्याचें कांहीं कारण नाही. सर्व मुली कॅनन जोशीसाहेबांकडे सुखरूप आहेत. त्या कदाचित् आतां येतील, नाहींतर उद्यां सकाळीं येतील'' पण दहासाडेदहाला मुली येऊन खरोखरीच्या माझ्यापुढें उभ्या राहिल्या तेव्हां माझा जीव खालीं पडला.

दुसऱ्या दिवशीं मला दोन जोडकार्डें आलीं. त्यांच्यावर एकाच अर्थाचा मजकूर होता. तुम्हीं सर्व कसे काय आहां तें उलट टपालानें कळवा. एक जोडकार्ड होतें माझी बहीण शहाबाई मिसाळ ह्यांचे व दुसरें पुण्याहून श्रीमती मथुराबाई मल्हार ह्यांचें होतें. मथुराबाईंनीं दत्तूविषयीं भलतेंच कांहीं ऐकिलें होतें.

रूथ, नाना व अशोक ह्यांना ज्या आजारामुळें राहुरी दाखविली तोच बेबीला आतां झाला. आजार म्हणजे फार मोठा नाहीं; पण बेबीच्या शरीराला तो फारच मोठा ठरला. हा हिंवतापाचा आजार तिला झाला. तिच्या आयुष्यांत तिला फार थोडे आजार झाले पण जे थोडेसे झाले त्यांनीं तिला अगदीं पिळून काढलें. पहिला प्लेग, मग विषम आणि आतां हा. तिला हिवांत ताप व तापांत हींव येऊं लागलें. तशांत तिची बी.ए.ची परीक्षा सुरू झाली. ती

१. १. रे.कॲनन डी. एल.जोशी, रा.सा.र.लु.जोशी यांचे वडील बंधु

तशीच परीक्षेला गेली. पहिल्याच दिवशी अर्धामुर्धा पेपर देऊन कशीतरी परत आली. अंगांत ताप म्हणतो मी-तरी दुसऱ्या दिवशीं तोच विचार व तोंच नाद. ती म्हणे मला जाऊं दे; माझी परीक्षा बुडेल. मी कसें तरी तिला थोपवून धरलें. घरगुती कांहीं कांहीं औषधें दिलीं तरी ताप अधिकच. मग डॉ.दांडेकरांचें औषध सुरू केलें. त्यांनीं फार श्रम घेतले. तिच्या डोक्यावर किती बर्फ ठेवला असेल त्याचें मोजमापच नाहीं. आतां तिला आपली सही देखील करतां येईनाशी झाली.

दिवाळीची सुट्टी आली. मुली, मास्तरणी जिकडे तिकडे गेल्या. दत्तू राहुरीस गेला. जिकडे तिकडे शुकशुकाट झाला. चोरहि येईनासे झाले. माझ्या मनाला सारखी हुरहूर लागून राहिली, कीं मुलीचा ताप तर रहात नाहीं आणि तिला सहीहि करतां येत नाहीं. डॉक्टर म्हणाले, हिला माशाचें पाणी द्या व हवा बदलण्यास न्या. आतां माशाचें पाणी द्यायचें कसें व तें आणायचें कोणी ? हवा बदलायाला नेणार कुठें व जाणार कुठें ? बापाला नाही भाऊ व आईला नाही जाऊ. आमच्या शेजारीं यशोदाबाई नांवाची एक माऊली रहात होती, तिनें पंधरा दिवस नियमानें माशाचें पाणी आणून दिलें व तिनेंच पुढें सुचविलें कीं तुम्हीं माथेरानला जा. माथेरान अगदीं जवळ आहे. तिच्या सुचनेप्रमाणें मीं बेत ठरविला. सारें सामानसुमान गोळा केलें. तेथें बाजारहाटाची जरूर रहायला नको अशी व्यवस्था होती माझी.

आता माझी मानसकन्या चंपा मला नकळत पळून गेलेली होती. तिनें छोट्यालाहि नेलें होतें. गेल्यावर तिचा निरोप आला, की ''आई मी बरी आहें. काळजी करूं नको.'' पण ती त्यानंतर मला अजूनपर्यंत भेटली नाहीं.

आमच्याबरोबर शाळेंतली एक ऑर्फन मुलगी घेतली. ती सात आठ वर्षांची होती. नेरळला माझ्या भावाची मुलगी सोनू [१] होती. हे भाऊ म्हणजे गुडशस्त ब्राह्मण रा.बापुराव आढाव. तिला पत्र टाकलें. तिचं उत्तर आलें बेबीला घेऊन या. मी सर्व व्यवस्था ठेवीन. इकडे बेंजीनें आम्हांला गाडींत बसवून दिलं. बसवून दिलें म्हणजे एकीला तरी खरोखरच उचलून गाडींत ठेवून दिलें. तिकडे सोनु व तिचा मुलगा [२] स्टेशनवर आले होते. नेरळला आम्ही दोन दिवस राहिलों. पण बेबीचा ताप व माझी काळजी होती तीच होती. सोनू म्हणे आत्याबाई, तुम्ही येथेंच रहा व रोज बेबीला माथेरानला पाठवीत जा. कारण आतां सीझन आहे व माथेरानचें भाडें तुम्हांला झेंपणार नाहीं. दत्तू व रूथ येथें आले होते तें मला आठवलें. मीं तिच्या मुलाला माथेरानला पाठवून त्या घराचा तपास करविला. घरवाल्यानें निरोप पाठविला कीं दत्तोपंतांच्या आईला म्हणावें, ''कधींहि या घर तुमचेंच आहे.''*

१. सोनुबाई आंग्रे २. प्रभाकर माधव आंग्रे

* हें घर भाई कोतवाल यांच्या वडिलांचें.

सकाळींच आम्ही प्रभाला घेऊन माथेरांनला गेलों. तेथें तांगे नाहींत. जिनरिक्षा आहेत. बेबीला जिनरिक्षेंत बसविलें व आम्ही पायीं होतों.

आमच्या न्हावीबुवांनी निरोप पाठविल्याप्रमाणें खरोखरीच त्याचें घर माझेंच होतें. पण आंत पाऊन टाकायाला मात्र मला जागा नव्हती. घर लहान व त्यांत बिऱ्हाडें फार. पण मीहि भटीण. मीं आपलें चंबूगवाळें त्या गर्दीतच झोंकलें. मात्र माझें तें चंबूगवाळें मागल्या पडवींत जाऊन पडलें. तेथें तीन दगड मांडण्यापुरती व तिघींना एकामेकींना चिकटून निजण्यापुरती पांच हात लांबीरुंदीची जागा मिळाली. पहाटें सहाच्या आंत मी आपलें काम आटोपून दिवा मालवी. सकाळचा सर्व स्वैंपाक करून शिदोरी, धुणें व बेबी आणि लक्ष्मी ह्यांना घेऊन बाहेर पडे, ती संध्याकाळीं परत घरांत येऊन जातांना जो दिवा मालवी तो परत लावी. संध्याकाळचा स्वैंयपाक घरवाली किंवा भाडेकरणी ह्यांच्यापैकीं कोणीतरी करून ठेवीत. कारण माझ्या उभ्या आयुष्यांत मला कधीं कोणी नाही म्हटलें नाहीं.हें विश्वचि माझें घर आहे.

माथेरानला हवा भरपून तर पाणी तितकेंच दुर्मिळ. दूध व पाणी ह्यांचा तुटवडा पण तो आमच्यासारख्यांना; लक्ष्मीपुत्रांना नाहीं. मी लक्ष्मी असलें तरी लक्ष्मीपुत्र नाहीं. आम्हांला चहाची जरुरी नव्हती. बेबीचें दूध बंद केलें होतें. पाण्याचा एक हंडा आम्ही घेत होतों. त्याला तीन आणे पडत. आमचे प्रातर्विधि, धुणें, अंघुळी वगैरे सारें कांहीं पाण्याचा आश्रय पाहून होत असे. दिवसभर आमचा मुक्काम झाडाखालीं होई. जसजशी त्याची सावली फिरे तसतसें आमचें बिऱ्हाड फिरे.

रात्री परत आल्यावर आम्ही घरवाल्याच्या व इतर बिऱ्हाडकरूंच्या पायवाटेतच निजत होतों. पण ते बिचारे आपली पायवाट मग बाजूनें करीत. त्या घरांतील सर्वच माणसें फार सज्जन आहेत. पण सीझनमुळें सकाळीं हातांत धरलेले वस्तरे संध्याकाळींच त्यांना खालीं ठेवतां येत. आणि पुरुषमंडळीं अगदीं दमून जाई. त्यामुळें श्रमपरिहारार्थ रात्रीं कलालाला भेट देऊन येत. दिवसभर चाललेले हात थांबून त्यांची आतां तोंडें चालूं लागत. पण त्यांचीं लेक्चरें घरांतील मालकिणी फारशीं चालूं देत नसत.

मुंबईहून एक नर्स हवा बदलण्याठीं आली होती. ती शेजारींच राहत असे. बुद्धीनें व मनानें ती माझीच सोबतीण होती. त्यामुळें आमचें मेतकूट चांगलें जमलें होतें. आम्ही कोणत्या बाजूला जायचें तें तिला सांगून जात होतों. मग ती आपलें सारें काम आटोपून चाराच्या सुमाराला आम्हांला शोधीत येई. मला इंग्रजी येस, नो, कॅट, डॉग, कम, गो इतकेंच येतें. पण तिला इंग्रजी मुळींच येत नव्हतें व तिला इंग्रजी शिकविण्याचें मीं कबूल केलें होतें. तिला इंग्रजी शिकायला फार हवें होतें. तशांत माझ्या घरांत तीन बी.ए. त्यामुळें

तर ती जास्तच खूष होती.

ती आली म्हणजे आम्ही गाणीं म्हणत होतों. तिला वाटे माझा आवाज फारच चांगला आहे. मलाहि माझ्या आवाजाचा अभिमान वाटे. मला सर्व टिळकांचींच गाणीं पाठ. तिचीं गाणीं मुरल्या, गवळणी अशी असत.

एक दिवस आम्ही अगदीं रंगांत आलों होतों. आमच्या आवाजाच्या रोंखानें दोनचार मुसलमान स्त्रिया आल्या. त्या चांगल्या श्रीमंत दिसल्या. पण त्यांना पाहून आम्हीं आमचें गाणे थांबविलें नाहीं. त्या आमच्याजवळ येऊन बसल्या तरी आमचें गाणें चालूच होतें.

त्यांच्याबरोबर असलेल्या दोन बाया मधून मधून त्यांना पानपट्ट्या करून देत होत्या. त्या पानें चघळींत होत्या. पण त्यांचें सारें लक्ष्य आमच्या गाण्याकडे होतें.

आमच्या नर्सबाईनी त्यांच्याशीं बोलण्यास सुरुवात केली ती त्यांच्याच भाषेंत.

''आपने कभी गोहरजानका गाना सुना है ?''

''हां हां सुना तो है. लेकिन हमारे सवाई गोहरजानका गाना आपने कभी सुना है ?''

त्यांतील एकजण म्हणाली.

''तुम्हारे गोहरजानका गाना सुनकर खाली आदमी बेहोष हो जायगे लेकिन हमारे सवाई गोहरजानका गाना सुनकर जंगलके नाग भी डोलते है.''

नर्स म्हणाली,

''पाहूं तुमच्या सवाई गोरहजानचें गाणें. खऱ्या गोहरजानच्या गाण्याला लोक दहा दहा रुपये देऊन जातात. मीं तिला पाहिली आहे. तिचें गाणें ऐकलें आहे. तिची सर कोणालाच यायची नाहीं.

''सुनो तो.''

आणि त्या सवाई गोहरजाननें गाण्यास सुरुवात केली. तिचें गाणें स्वर्गीय वाटलें. भोंवतालीं लोक जमा झाले. तिनें चार गाणीं म्हटलीं. व शेवटीं सांगितलें कीं तुम्हीं म्हणतां ती गोहरजान मीच. पण आमच्या नर्सबाईची खात्री पटेना.

इतकी श्रीमंत आणि कलानिपुण बाई आमच्याशीं अगदीं जुन्या ओळखीप्रमाणें वागूं लागली. दुबळ्या अंत:करणाला सज्जनांचा वारा हवा असतो असें मीं कोठेसें वाचल्याचें आठवतें. म्हणूनच ती आमच्या मागें मागें राहिली कीं काय कोणास ठाऊक. पण आम्हीं प्लेग, कॉलरा, रक्तपिती अशा स्पर्शजन्य रोगाप्रमाणें तिच्यापासून दूर दूर राहण्याचा प्रयत्न

करूं लागलों. आम्हांला एखादा साथीचा रोग लागतो कीं काय असें आम्हीं तिच्याशीं वागलों. तिनें काय काय केलें पण आम्ही तिच्या बंगल्यांत गेलों नाहीं. मग तिनें आम्हांला आपला मुंबईचा पत्ता दिला. तिचें वय साठपासष्ठ वर्षांचें असावें.

आम्हीं एकत्र जमलों होतों पण हळूं हळूं पांगलों; आमच्या भोंवतीं जमा झालेला श्रोतृगण आपापल्या मार्गाला लागला ! ती आपल्या बंगल्यावर गेली व आम्हींहि घरीं जाऊन आपल्या फूटपाथवर पड पड कुडी केलें.*

आम्हीं येथें तीन आठवडे राहिलों. निघतांना घरवाल्याच्या हातांवर वीस रुपये दक्षिणा ठेवली. बेबी आतां बोलूं चालूं लागली होती पण ताप मात्र चालूच होता.

जूनच्या पहिल्या तारखेला दोन तीन दिवस पुढेंच होते तोंच आम्ही मुंबईला येऊन दाखल झालों. मास्तर मास्तरणी जें तें आपापल्या कामावर हजर होण्याकरतां परतूं लागलें. दत्तूहि सहकुटुंब सहपरिवार राहुरीहून परतला. कारण आतां राहूरीला राहण्याची सोयच नव्हती. एक तर पावसाळा व दुसरें म्हणजे तेथें मुंबईसारखी दवाखान्याची सोय नव्हती. आतां सर्वच एकत्र झालों. काळजीचें कारण कांहीं उरलें नाहीं असें मन म्हणत होतें, तोंच रूथ जी आली ती ती व दोन्ही मुलें तापानें पछाडली. आतां मात्र आजाराचा चौकोन जमला. ही तिघें व चवथी बेबी. रूथला परत पाठविण्याची सोयच नव्हती कारण ती मुळीं दवाखान्यासाठीं येथें आलेली. तेव्हां मीं नगरास मिसेस ह्यूम ह्यांना पत्र पाठविलें कीं मीं अशा अशा अडचणींत आहे. तरी बेबीला तुमच्या कंपाउंडांत ठेवा व तिच्या साह्याला एखादी बाई पाहून द्या. मी दरमहा दहा पंधरा रुपये पाठवीन. कारण दत्तू कामांत, मीं कामांत, घरांत चार माणसें आजारी त्यांत दोन लहान मुलें व बेबीहि मुलच बनलेली.

पत्र पाहतांच मिसेस ह्यूमचें उत्तर आलें कीं बेबीला मजकडे पाठवा. मी तिला बंगल्यांतच माझ्याजवळ ठेवींन. तुम्हीं मुळींच काळजी करूं नका. मला एकच वाईट वाटतें कीं तुम्हीं पैशासंबंधानें लिहिलें. मला तिच्या खर्चासाठीं एक पै हि नको.

त्या माऊलीनें लिहिल्याप्रमाणें तन, मन, धन खर्च करून बेबीची शुश्रूषा आपल्या हातानें आपल्या घरीं तीन महिने केली तेव्हां कोठें तिचा ताप गेला.

* '' पड पड कुडी, गंगाभागिर्योच्या तिरी, गयागीं गमन, प्रयागीं मरण, नित्य काशीविश्वेश्वरा तुझें स्मरण'' असे निजतांना म्हणण्याची पूर्वीच्या स्त्रियांची रीत होती. व उठताना '' कराग्रे वसते लक्ष्मी, करमुले सरस्वती, करमध्ये तु गोविंद, प्रभाते करदर्शनम्'' हा पाठ असे.

— ८ —

# मुलीची हौस

त्याच सुमारास एक दिवस संध्याकाळीं जराशी पावसाची भुरभुर चालू असतां दाराशीं एक व्हिक्टोरिया येऊन उभी राहिली. व्हिक्टोरियांतून आवाज आला-मिसेस टिळक येथेंच आहेत ना? हो म्हणतांच पडत्या फळाच्या आज्ञेप्रमाणें बाई आंत आल्या. त्यांच्यामागें व्हिक्टोरियावाल्यानें आणलेलें सामान आलें. सलामालकी झाल्यावर त्यांनीं आपलें बोचकें माझ्या बिछान्यासरसेंच सरकावून दिलें. ह्या बाई कोण, कोठल्या, कोणाकडे आल्या ह्याचा कोणालाच पत्ता नव्हता. पुन्हां बाई शकुनी मामांची बहीण. तिनें सासूच्या कानगोष्टी सुनेला व सुनेच्या सासूला करण्यास सुरुवात केली.

पंधरा दिवस झाले तरी पाहुणी सुनेची, कीं सासूची ह्याचा पत्ता लागेना. आमचीं घरें निराळीं नसल्यामुळें दोन्ही घरचा पाहुणा उपाशीं राहण्याचा प्रसंग तिच्यावर आला नाहीं, तरी एकमेकींच्या चुगल्या एकमेकींना सांगून आमचींच पोटें तिनें भरपूर भरलीं. व त्यामुळें एक दिवस तिच्यावर मात्र उपाशी राहण्याचा प्रसंग आला. शिवाय ती पडद्यांतली बिबी. पुरुषांसमोर कधीं यायची नाहीं. जेवणखाण सारें पडद्यांतच व्हायचें तिचें.

एक दिवस बाबू * आला. त्यानें विचारलें, ''काय हो काकू, ही कोण पडद्यांतली बिबी आणली तुम्ही ? मीं म्हटलें मला नाहीं बाबा ठाऊक. तूं आपल्या भावजयीला विचार.''

''काय हो वहिनी ? ह्या कोण ?''

''मला काय माहीत ? असतील तुमच्या काकूंच्या कोणीं !''

''काकू ही काय भानगड आहे ?''

''कांहीं कळत नाहीं बाबा. पण ह्या बाईनें फार त्रास दिला आहे. हें खरें. दत्तू भिडस्त. त्याचा अभ्यास. बेबी नगरास. तिची काळजी. घरांत आजार.''

''आच्छा.''

इतकें बोलून तो बाहेर गेला. त्यानें एक व्हिक्टोरिया आणली. त्यांत त्या बाईचें सामान

* प्रो. भा.ल.पाटणकर

भरलें व तिला म्हटलें, हं चला बाई. गाडी तयार आहे.''

ती मुकाट्यानें गाडींत बसून चालती झाली.

''बाबू हें काय केलेंस ? ती तरुण बाई. मुंबईची वस्ती. ती कुठें जाणार ?''

''आली तेव्हां नव्हती का मुंबई ?''

मीं त्याच्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाहीं. माझ्या भावाचा मुलगा वासुदेव [१] तेथेंच होता. त्याला स्टेशनवर पाठविला. त्यानें येऊन सांगितलें कीं ती तिकीट काढते आहे.

माझ्या सुनेच्या स्वभावाची घडी कधीं विस्कटत नाहीं. म्हणजे तिचा स्वभाव घडीच आहे. एक गांव, एक घर, एक जागा, एक व्यक्ति, अशी ती एकनिष्ठ आहे. एकदां एक पसंत पडलें म्हणजे त्यांत बदल न होऊं देण्याची तिला काळजी लागते.

तसेंच औषधांविषयीं. अशोकच्या जन्मापासून आमच्या घरांत राजश्री कुन्हेंनीं प्रवेश केला व त्याला कारण आमचे तात्या.[२] नाना लहान असतांना आंवेनें अतिशय आजारी झाला. इतका, कीं त्याला कोणतेंच औषध लागूं पडेना. त्याच सुमारास तात्यांच्या कुन्हे उपायांचा आमच्या घरांत त्यांच्या उत्तेजनानें प्रवेश झाला होता. पुढें रूथ राहुरीला गेली. तेथें असल्याच विषयावरचें महात्मा गांधींचें एक पुस्तक तिच्या वाचण्यांत आलें व तिनें मागें पुढें न पाहतां नानाच्या पोटावर मातीचें पोटीस ठेवलें. व सर्व डॉक्टर वैद्यांनीं हात टेंकल्यावर हात देणाऱ्या ह्या मातीच्या पोटीसानें नाना ताबडतोब बरा झाला.

आतां आम्हांला तात्यांची आठवण झाली. तात्या टिळकांचे एक जुने मित्र. त्यांना आम्ही तात्यासाहेबच म्हणतों. त्यांना पत्र लिहिण्याचा मोठा कंटाळा पण मुलांच्या आजारासंबंधीं आमचीं पत्रें गेलीं कीं त्यांचीं मात्र उत्तरें उलट टपालानें येत. पुढें त्यांचें रोज पत्र येऊं लागलें. व ते लिहित ती ती उपाययोजना आम्हीं करूं लागलों.

ज्या माझ्या सुनेनें बाळंतपणांत कडधान्याचें पथ्यपाणी करायला मागें पुढें पाहिलें नाहीं ती का ह्या उपायांना डरते! दोन्हीं मुलें व रूथ आजारी. तेव्हां आम्हीं तात्यांना पुन्हां पत्र घातलें. पण उत्तर नाहीं. आणखी पत्र घातलें, तरी तसेंच. तेव्हां आम्हीं दोघांतिघांनीं बसून पोक्त विचार केला कीं मीं हीं दोन्हीं पोरें घेऊन तात्यांचें गांव गांठावें. सुनेला जाणें अशक्य. मुलगा शाळेंत. मुलगी नगरास. तेव्हां राहतां राहिलें मीच.

''काय रे दत्तू पण मला कसें रे जातां येणार ?''

१. वासुदेव विष्णु गोखले
२. रा.सा.र.लु.जोशी

''त्यांत काय आहे. मी गाडींत बसवीन. स्टेशनवर उतर. हमाल कर व पोष्टांत जायचें असें सांग, कीं झालें. कुठें मधें उतरायचें नाहीं. थेट त्या गांवींच उतरायचें झालें.''

नाना अडीच वर्षांचा. अशोक दीड वर्षांचा. मी अडाणी.

आमच्या स्वाऱ्या निघाल्या.

डब्यांत फारशी गर्दी नव्हती. नाना आजारानें फारच किरकिऱ्या बनला होता. त्याचा एक मुटकुळा माझ्या मांडीवर. अशोकहि रोगी पण उद्योगी. माझे पाय नानाला संभाळीत होते व डोळे अशोकला संभाळीत होते.

अशोकच्या पायांला जणूं भोंवरा बांधला होता. तो एका जागीं बसेना व मला त्याला आवरतां येईना. त्या डब्यांत एक मारवाड्याचें जोडपें बसलें होतें. मीं मुलांना बरेच खेळ शिकविले होते. आपडीथापडी, अटकमटक, आड्यामाड्या, बुवा बुवा. अशोकला वाटलें समोरची बाई आपल्याशीं 'बुवा बुवा' खेळते आहे. तो जाई आणि तिच्या बुरख्यांत हात घालून म्हणे 'बुवा आव !' ती इतकी रागावली, कीं बोलायाची सोय नाहीं. ती त्याचा हात झिटकारून टाकी. तसतसा ह्याला चेव येई. ह्याला वाटे ती आपल्याशीं खेळते आहे. तिचा बुरखा हाले व त्याच सपाट्यांत हातहि हाले. शिवाय त्या पडद्याच्या आंत त्याला काय काय दिसत होतें ! तेथें कधीं न पाहिलेले सारे पदार्थ होते. नथ, ठुशी, कपाळावरील सोन्याचें बोर, पुतळ्या, पांढरे तांबडे सोनेरी दांत ! हें युद्ध बराच वेळ चाललें. ती म्हणे तुम्ही आपलें मूल सांभाळा. मला हंसूं येई. त्या बाईचा रागहि येई. तें मूल तें केवढें व त्याचा राग तो काय यायचा ? मी तिच्या जागीं असतें तर त्याला उचलून घेतलें असतें. पाठीवर केस मोकळे लोळताहेत, सारखा इकडून तिकडे वाऱ्याप्रमाणें आनंदानें धांवतो आहे, तोंडानें कांहीं तरी बोबडे बोल बोलतो आहे अशा बाळाला उचलून घेण्याचा मोह कोणाला होणार नाहीं ? बाकीं तो रूपानें माझ्यासारखाच आहे.

ख्रिस्ती लोकांत कांहीं कांहीं रीतिरिवाज हाडीमासीं खिळलेले आहेत. आतां मला ते बरेच कळूं लागले आहेत पण कांहीं कांहीं बाबतींत वळत नाहींत एवढेंच. इकडे कसें वागावे हें मी आपल्या सुनेजवळ बहुतेक शिकलें.

तात्यासाहेबांना आधीं न कळवितांच मी मुलें घेऊन त्यांच्या दारांत येऊन उभीं राहिलें. बरोबर कामासाठीं एक बाई आणली होती. ती उंच जातींच्या हिंदूत शोभण्यासारखी नव्हती. तात्यासाहेब मोठे अमलदार होते. त्यांना उंच वर्गाच्या हिंदु लोकांत वावरावें लागे. त्यांच्या हाताखालचे लोकहि सारे उंच हिंदूतील होते. त्यांच्या घरांत ही बाई शोभण्यासारखी नव्हती.

आम्ही न कळवितांच एकदम दत्त म्हणून तात्यासाहेबांच्या आवारांत येऊन उभे राहिलों.

आमच्या स्वाऱ्या पाहून तात्यासाहेबांना आश्चर्य वाटलें. आणि ती बाई पाहून तर त्यांना थोडा रागहि आल्यासारखें दिसलें. तात्यासाहेबांच्या पत्नी मला बाई म्हणतात. त्या म्हणाल्यां,

''तुम्ही कशा आलांत ? पत्र तरी पाठवावयाचें होतें ?''

''दत्तूनें बरींच पत्रें तुम्हांला पाठविलीं. तात्यांचें उत्तर आलें नाहीं. घरांत सारे आजारी. तेव्हां मुलें घेतलीं आणि आलें.''

''हे पहा बाई तुमच्या सुनेचे आतां दिवस भरत आलेले तुम्ही कशाला आलां ?''

तात्यांनीं मला त्यांच्या पद्धतीचे सर्व उपाय समजावून दिले. त्या उपायांपासून काय फायदा होतो ह्यावर एक लेक्चर दिलें. रात्र झाली. आम्ही सर्व निजलों.

अशोक आपल्या नित्यनियमाप्रमाणें मध्यरात्रीं जागा झाल्यावर गस्त घालण्यास निघाला. तो थेट तात्यांच्या खोलींत गेला व त्यांना उठविण्याचा प्रयत्न करूं लागला. तात्यांना दिवसभर मर मर काम करावें लागे. त्यांना ही गस्तवाल्याची फेरी मुळींच मानवली नाहीं. ती पाहून त्यांना मोठा राग आला, सकाळीं उठल्यावर ते मला म्हणाले,

''बाई तुम्ही मुलें घेऊन जा.''

''मी कशी जाऊं? त्यांना आणलें कशाकरतां ? दत्तूनें मला बिऱ्हाड करून रहावयाला सांगितलें आहे.''

''तुम्हांला येथें घर मिळणार नाहीं. मीं सांगितलेले उपाय करा म्हणजे झालें, मुलांना आराम पडेल.''

त्यांनीं दत्तूला तार केली. आम्हांला गाडींत बसवून दिलें व आमच्या स्वाऱ्या परतल्या.

त्यांच्या सांगण्याचा मुख्य विषय पोट होता. तें स्वच्छ ठेवलें पाहिजे. खरोखरच आपण जर आपली जिभली ताब्यांत ठेवली म्हणजे आपली भांडणें आणि खाणीं जर प्रमाणांत ठेवलीं तर आपले बरोचसे मानसिक व शारीरिक रोग टळतील. पण मी देखील ब्रह्मज्ञान सांगण्यापुरतीच आहें.

वर सांगितलेंच आहे, कीं तात्यासाहेबांनीं दत्तूला तार केली; दत्तू स्टेशनवर आला. पण मला तो कोठें दिसेना कीं, मी त्याला दिसेना. मी हमाल करून उतरणार तो एकहि पोर हमालाजवळ जाण्यास तयार होईना. व हमाल करावयाचा मुलांसाठीं. शेवटीं हमालानें घेतलें बोचकें व दोन्हीं बगलेंत दोन पोरें घेऊन मी कशी तरी अदावतीनें डब्यांतून उतरूं लागलें. इतक्यांत दत्तूने मला पाहिलें. तेव्हां माझा बोजा उतरला.

तात्यासाहेबांनीं सांगितलेल्या उपायांना सुरुवात झाली. दुसऱ्याच दिवशीं नानाला टबांत बुचकळून ओलेंच दाबून कसें तरी निजविलें. अशोकला शेकून माती बांधली, असा क्रम पांचसहा दिवस चालला. रूथला लौकर बरें वाटलें. म्हणजे हींव गेलें. पण तापांत तिला ताप भरूं लागला. तीनतीन, चारचार, पांचपांचपर्यंत ताप चढे. नाना, अशोक बरे झाले पण हिचा ताप निघेना. आता टॉवेल पाण्याचा उपयोग सुरू केला. एकसारख्या थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवीत होतों. तिचे दिवस भरत आलेले. आणि अशा स्थितींत मुंबईस किती तरी बाया त्या वेळेस आजारी असल्याचें कानावर येत होतें.

एक दिवस मीं बऱ्याच वाटाण्याच्या शेंगा उकडून ठेवल्या होत्या. रूथची आई निजायला येत असे. त्या दिवशीं रूथ बरी दिसेना. मीं म्हटलें, ''काय ग आज तूं बरी कां दिसत नाहींस? वाटाण्याच्या शेंगा फार खाल्ल्यास वाटतें?'' दुसऱ्या दिवशीं पहाटें उठून पहातें तों दाराशीं तांगा उभा व त्यांत ह्या दोघीं मायलेकी बसलेल्या ! मीहि चटकन् तांग्यांत बसलें व आम्ही सहाला दवाखान्यांत पोंचलों; पंधरा मिनिटांच्या आंत मीराबाईंनी [१] जगांत प्रवेश केला. त्या वेळेंस तेथें असलेल्या कित्येक बाळंतपणींची मुलें तापानें होरपळून निघालीं होतीं; पण आमची मुलगी त्या दिव्यांतून सहीसलामत बाहेर पडली. आम्हांला मुलीची हौस होती. मुलीची हौस म्हणूनच सुनेनें अशोकचे केस ठेवले होते. दहा दिवसांनीं बाळबाळंतीण घरी आलीं.

त्याच सुमारास कराचीहून ताराबाईंचे [२] पत्र आलें, कीं  मी परीक्षेकरतां मुंबईस येणार आहे. मजबरोबर आणखी एक विद्यार्थी आहे. तुमच्याकडेच मला उतरायला पाहिजे तरी उलट टपालीं उत्तर घाला.

ताराबाई सौ.शहाबाई मिसाळ ह्यांची कन्या. ताराबाई डॉक्टर असून आतां त्यांनीं कराचीस स्वत:चा एक मोठा दवाखाना उघडला आहे. त्यांच्या पत्राला दत्तूनें व रूथनें उत्तर दिलें कीं  घर आपलेंच आहे, आपण वाटेल तेव्हां या.

बेबी आतां बरी झाली होती. मिसेस ह्यूमच्या मेहनतीचें फळ आलें. तीहि नगराहून आली. चिकीचे वडील रामभाऊहि आले होते !

दत्तूची मास्तरकीची परीक्षा. तो आपल्या गडबडींत होता. रूथला सरासरीं तीन आठवडे झालेले. दिवाळीची सुट्टी जवळ आलेली. रूथनें रामभाऊंना विचारलें, ''पारोळ्याची हवा कशी काय आहे ?'' रामभाऊच ते ! त्यांनीं सांगितलें ''फारच उत्तम''  रूथनें विचारलें

१. मीरा देवदत्त टिळक (मीरा अच्युत भागवत) जन्म १०-९-१९२२
२. डॉ. ताराबाई कोतमराज पुनय्या, उर्फ के.ताराबाई.

''तुमचें घरबीर केवढें आहे ?'' रामभाऊंनीं सांगितलें  घर मोठें आहे. पाण्याची उत्तम सोय आहे. सामानसुमान भरलेलें आहे. सरपण आहे. चहा साखर आणून ठेवलीं आहेत, तुम्हीं चला''  सून म्हणाली, ''मग आम्हीं येतों तुमच्याकडे. उद्यां परवां त्यांची परीक्षा संपेल मग निघूं आपण'' रामभाऊंनीं मोठ्या आनंदानें हो म्हटलें, चिकीप्रमाणेंच तोहि कधीं कोणाला कमीपणा दिसूं देत नसे. चिकीचाच बाप तो. पोकळ मिजाशी व ठोकळ गोष्टी.

डॉ.ताराबाई व त्यांच्याबरोबरचा विद्यार्थी आला. तो जेवी आमच्याकडे व निजायला दुसरीकडे जाई. दत्तूची परीक्षा संपली त्याच दिवशीं तो त्याची बायको, मुलें व रामभाऊ पारोळ्याला गेलीं. आतां मागें दोन पाहुणे, आम्हीं दोघी पेशंट व माझी काळजी एवढींच आम्ही मुंबईस राहिलों. काळजी करण्याचें  कारण सून बाळंतीण, दोन लहान मुलें, मीरा तीन आठवड्यांची, दत्तू थकलेला, पण सत्तेपुढें शहाणपण काय कामाचें ! एकदा मुलें मोठीं झालीं कीं ती सत्ताधीश होतात. घरांतील इतकीं माणसें व मुलांची गडबड एकदम कमी झाल्यानें आम्हांला कांहीं करमेना.

— ९ —

# स्वातंत्र्य

डॉ.ताराबाई कुंकू लावीत. त्यांचे पति [१] दुसऱ्या समाजांतील. आधींच आमच्या समाजाला कुंकवाचें वावडें. तशांत परजातींत लग्न झालेलें. त्यांत बरोबर एक हिंदू विद्यार्थी. असली ही आमची पाहुणे मंडळी. आतां बरीक आमच्यावर चांगलीच पाळत ठेवण्यांत आली, हळूंच पहाणें, टपून रहाणें, काय काय होईल त्याचें विकृत स्वरूप करून त्याला तिखटमीठ लावून तें अधिकाऱ्यांना नेऊन वाढणें, अशा गोष्टींना सुरुवात झाली. तिकडे दत्तूचें व अधिकाऱ्यांचें कांहीं ना कांहीं कारणांवरून खटके उडत. तेव्हा अधिकाऱ्यांची मनेंहि हें तिखटमिठाचें भरीत गट्ट करण्यास तयारच होतीं.

पण एकालाहि उघड उघड येऊन बोलण्यास धैर्य होईना. ताराबाईंना व त्या विद्यार्थी पाहुण्याला प्रत्यक्ष पाहण्यासाठीं अधिकारी व इतर युरोपियन डोकावून गेले. माझ्या प्रकृतीविषयीं आतां सर्वांना एकदम काळजी वाटूं लागली ! तसें माझ्या प्रकृतीला कांहींच झालें नव्हतें, पण ह्या इतरांच्या काळजीनें मात्र होणार होतें खास ! मला कांहीं होण्याऐवजीं त्यांनाच मात्र आमचा खोकला लागला होता व तो सुंठीवांचून कसा घालवावा ह्याची ज्याला त्याला काळजीं वाटायला लागली होती. जो कोणी मला भेटे तो म्हणे, आजीबाई तुम्ही हवा बदलण्यास जा. मी म्हणे, झालंय काय ? मी जाऊं कशाला ? मला कांहीं झालें नव्हतें तरी माझा जीव मात्र मला ह्यांच्या काळजीनें नकोसा झाला. उघड उघड धडधडीत बोलण्यास मात्र कोणाचें भय थोडेंच होतें ? पण हा सुसंस्काराचा परिणाम. डोळा फोडायला नको काडी मोडायला नको.

कोणीं जरी न कळत डोकावलें तरी आमच्या घरीं कांहीं चोरून, लपून कधींच कांहीं होत नसे; सारें कांहीं उघड उघड होत असे. आम्ही बोलत बसलों

असतांना आमचीं दारें खिडक्या सताड उघडी असत. पडदा-पद्धतीचें आम्हांला नेहमींच वावडें असे. कानोसे घेऊन, चोरून पाहून, कल्पना करून जेव्हां माझ्यांत लपंडाव दिसून येईना, तेव्हां हें हवा बदलण्याचे बंड उठलें. परदेशी मिशनरी. त्यांना आपली भाषाहि धड

१. कोतमराज पुनय्या, सिंध ऑब्झर्वरचे संपादक.

समजत नाही, रीतीरिवाजहि ठाऊक नसतात. त्यांना शिकवणारे व त्यांचीं मनें कलुषित करणारे आपलेच लोक व त्यांची दिशाभूलहि तेव्हांच चटकन ह्यांना करतां येते.

ह्याच गडबडींत एक दिवस एका सभ्य स्त्रीनें येऊन आग्रहाचें बोलणें लावलें, कीं आजीबाई,''तुम्ही खरोखरच कुठेंतरी जा. तुम्ही दिसाव्या तशा दिसत नाहीं.'' मी म्हणालें,''हें पहा तुम्हां सर्वांना वाटतें आहे कीं, मला तुमचें बोलणें कळत नाहीं. मला सारें कळतें. अलीकडे माझ्या प्रकृतीबद्दल तुम्हा सर्वांनाचा एकदम फार काळजी उत्पन्न झाली आहे. पण माझी आतां एवढीच इच्छा आहे कीं, हें काम बिनपगारी करावें. दत्तूची टर्म भरेपर्यंत मला रहायाला जागा पाहिजे आहे.'' सभ्य स्त्री म्हणाली,''पण बाई येथें मला दवाखाना काढायाचा आहे.'' मी म्हटलें ''काढा दवाखाना. मी हाताची नीट आहे. मी मिठाईचें दुकान काढीन आणि त्यावर माझ्या नांवाची पाटी लावीन.''

बाई गेली. दुसऱ्या दिवशीं पाळक आले. त्यांचाहि तोच सवाल. आतां मात्र माझ्या काळजानें ठाव सोडला. दत्तू दूर, तशांत तो तिकडे जाऊन आजारी पडलेला. माझ्यामागें ह्या लोकांची कुरकूर. मला आतां खरेंच वाटूं लागलें कीं, मी आजारी पडणार व हवापालट मला करावीच लागणार!

बेबी म्हणाली, आई तूं घाबरूं नको. थोड्या वेळानें तिनें टाळी वाजविली. ''आई मिरा पायगुणाची झाली. तिनें आपली ह्या पारतंत्र्यांतून सुटका केली.''

''तें सारें खरें ग. पण मुलें लहान. मुंबईची वस्ती. जाणार कुठें, आणि राहणार कसें?''

''आई मला आतां पुरेसें शिक्षण आहे. कामाचें काय घेऊन बसली आहेस?''

डॉ. ताराबाई म्हणाल्या,

''मावशी कराचीला येतां का? मी बेबीला आणि वहिनीला काम लावून देतें, मग भाऊ वकिलीचा अभ्यास करावयाला मोकळा होईल.''

''कराचीच काय, इंग्लंडला सुद्धां जायची माझी तयारी आहे. स्वदेशीं चोरी आणि परदेशीं भीक.''

दत्तू पारोळ्यास आजारी होता त्याची मला दादच नव्हती. ही मुलें मला काहींच सांगत नसत. ताराबाई, पाटणकर, बेबी ह्यांची पारोळ्यास तारा नि पत्रें येत जात, फळांचीं पार्सलें जात, पण मला त्याची गंधवार्ताहि नसे. इकडील हकिगतीचीं पत्रें दत्तूला जात.

परीक्षा झाल्यावर ताराबाई कराचीस गेल्या. त्यांनी तेथें जातांच मुलींच्या कामाची खटपट चालविली. आतां दत्तूला बरें वाटूं लागल्यानें तो सहकुटुंब सहपरिवार परत आला.

आतां सर्व एकत्र झालों. काळजी काय ती खाण्याची व नाण्याचीच उरली होती. बाकी आजारबिजार कांहींच उरला नव्हता. नाहीं म्हणायला लोकांनीं आणलेला तेवढा आजार होता. पण त्याला डॉक्टर काय करणार?

लौकरच ताराबाईंचे पत्र आलें. परीक्षेच्या रिझल्टसारखी आम्ही ह्या पत्राची वाट पहात होतों, एकदाचा निकाल लागला. ही परीक्षा म्हणजे आमच्या नशीबाची परीक्षा होती. तींत आम्ही उतरतांच वरचा वर्ग गांठला.

ताराबाईंचे पत्र आलें की, ''कामाची व्यवस्था झाली. ताराबाईला पगार १३० रुपये व रूथबाईला पगार १५० रुपये ठरविला आहे. तीस रुपयांचें घरहि पाहून ठेवलें आहे. तरी ताबडतोब तारेनें तुमचें म्हणणें कळवा.''

हें पत्र पाहतांच आमच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. त्याच दिवशीं रे. एडवर्डस्‌साहेबांनी[१] टिळकांच्या कसल्याशा लेखाबद्दल खटपट करून पाऊणशें रुपये आणून दिले होते; शिवाय आम्ही अगदींच कंगाल नव्हतों. विम्याचे पैसे हंसत हंसत आमच्याकडे पाहतच होते.

कराचीस तार गेली व आमची आवराआवर व बांधाबांध सुरू झाली. तसाच बाजारहाटहि सुरू झाला. तरी एक दुहेरी काळजी होतीच; दत्तूची एक काळजी व दुसरी सामानाची काळजी. दत्तूला आमच्याबरोबर येणें शक्य नव्हतें. सामान आवाच्यासवा वाढविलेलें. दत्तूची राहण्याची सोय त्याच्या सासूकडे केली. सामानालाहि तेथेंच बावकर हॉलमध्ये एखादी खोली मिळणें अशक्य नव्हतें. पण दुधानें तोंड भाजलेलें तेव्हां आम्हांला ताकहि फुंकून प्यावेसें वाटलें. सातारचा अनुभव ताजाच होता.

भास्करराव उजगऱ्यांना विचारलें. आमचे भास्करराव आधीं कोणत्याहि गोष्टीला मोडता घालायाचे, पण एकदा का त्यांच्या मनानें एखादें काम चांगलें आहे असें घेतलें की, मग कांहीं बदलायाचे नाहींत. आमचा कराचीचा बेत त्यांना सांगतांच आधीं त्यांनीं आमची थट्टाच केली. पण आम्ही चौघे व ते एकटे. आम्ही का त्यांना दाद देतों. मी म्हणालें,

''अरे बाबा, तें सारें राहूं दे, पण आमच्या ह्या एवढ्या सामानाची काय सोय करायाची?''

''माझी जागा फार मोठी आहे. ठेवा तेथें आणून.''

भास्करराव त्या वेळीं गिरगांवांतल्या अंब्रोली चर्चचे पाळक होते. व त्यांना मुंबईच्या मानानें बरेंच मोठें घर होतें. शिवाय एक अडगळ टाकायाला खोलीहि होती. आम्हीं पडत्या

१. जे. एफ. एडवर्डस्

फळाची आज्ञा घेऊन  सामानाचा भार हलका केला. हें काम बेबीनेंच केलें; कारण दत्तूची शाळा, माझें काम व सुनेचीं मुलें. तेव्हां तीच तेवढी मोकळी होती.

मीं कामाला लागल्यापासून माझ्या अधिकाऱ्यांना कधी जेवायाला बोलाविलें नव्हतें, कीं कधीं त्यांना कांहीं वाढून पाठविलें नव्हतें. कारण मेट्रनच्या कामांपैकी हेंहि एक काम असतें असा समज झालेला आहे. वाढून पाठविणें किंवा जेवायला बोलावणें ह्यापेक्षां चोख कामानें आपले वरिष्ठ अधिकारी आपल्याला संतुष्ट ठेवतां येतात अशी माझी समजूत होती. आतां काम सोडायचें आमचें पक्कें ठरलें असल्यानें व सारी सोय व तयारी जय्यत करून ठेवली असल्यानें मीं आमच्या साहेबांना व मडमसाहेबांना पहिलें व शेवटलें जेवायला बोलावले. माझ्या स्वभावाच्या विरुद्ध पण दत्तूच्या आग्रहामुळें मीं जेवणाचा दिवस काम सोडण्याच्या बरोबर एक महिना आधींचा धरला. जेवण संपेपर्यंत आम्ही कोणी कामाबद्दल कांहीं बोललों नाहीं. सर्व वेळ मोठ्या आनंदात घालविला. मग साहेब व मडमसाहेब [१] निघण्याच्या वेळेस त्यांच्यां हातांत राजीनामा व महिन्याची नोटीस ठेवली.

राजीनामा अशा तऱ्हेनें हातीं पडल्यावर त्यांना मोठें आश्चर्य वाटलें.

''तुम्ही कोठें जाणार?''

''देव नेईल तिकडे!''

''ह्या एवढ्या सामानाचें काय करणार?''

''सामानाची आम्हीं सोय केली आहे !''

मडमसाहेब म्हणाल्या, ''मी तुम्हांला सर्टिफिकेट पाठवून देईन.''

''मला त्याची गरज नाहीं. माझें हें पहिलें व शेवटलें काम आहे. मी कोणाची ताबेदारी केली नव्हती व पुढें करणार नाहीं.''

नाताळाची सुट्टी आली. इकडचें काम पहिलीपासून सोडलें होतें. कराचीचें दुसरीपासून सुरू होत होतें. आम्ही नाताळांत कराचीला जाण्यास निघालों. दत्तू आम्हांला पोंचविण्यास आला.

बंदरावर भास्करराव उजगरे, मनोहरराव उजगरे, लक्ष्मणराव पडाळे वगैरे मंडळी पोंचविण्यास आली होती. म्हणजे आम्हांला हारतुरे द्यायला नव्हती आली. कारण आम्हीं असला कांहीं पराक्रम गाजवायला निघालों नव्हतों. पण सामानाची व्यवस्था करायला व मुलांबाळांना उचलासाचलायला ही आमची मित्रमंडळी आली होती.

१. मिस्टर व मिसेस हेजन

बोटीनें करणा फुंकला. ती आम्हांला पोटाच्या वाटेकडे घेऊन निघाली. आम्ही दूर सरकरणाऱ्या मुंबईकडे व तिच्या कांठावर उभ्या असलेल्या आमच्या मित्रमंडळीकडे आनंदाने पहात होतों. सागर शांत होता. पाण्याचे रंग मधून मधून बदलत होते. आमच्याहि मनांत निरनिराळे विचार येत होते. जगाच्या दृष्टीनें नसलें तरी आमच्या दृष्टीनें कराची म्हणजे आम्हांला इंग्लंड वाटत होतें. इतक्या दूरच्या परकीय प्रदेशांत केवळ तीन मुलें व तीन बायकांनी जाऊन तीन वर्षे काढायचीं होतीं! आम्ही एकीकडे व दत्तू एकीकडे. जवळ पुरुष-माणूस नाहीं. तसे आमच्याजवळ दोन पुरुष होते. पण त्यांचा उपयोग पंक्तीचाच. संगतीचा मुळींच नाहीं. एक पुरुष अडीच वर्षांचा व एक पुरुष दीड वर्षांचा.

स्वतंत्रता ! टिळकांचें एक गाणें ह्या वेळेस आठवतें.

**सांग कुठें पाहुं तुला सखि स्वतंत्रते**
**जनिं विजनीं सांग कुठें रमशि सुव्रते,**
**फिरविं मला दाहि दिशा**
**कर मम अन्नान दशा**
**परि तूं हो माझी एकदा -**
**तुजविण मज जगत सकल विकल भासतें.**

— १० —

# कराचीस प्रयाण

आमच्या बरोबर आमचें सामान होतें. तसेंच मुलांबाळांचेहि सामान होतें. आमचीं अंथरुणें पसरून भोंवतालीं सामान व्यवस्थित मांडून आम्हीं बोटीवर आमच्या पुरतें घरकूल केलें होतें. आमचा पोपूहि * आमच्याबरोबर होता.

बोट फार लागते असें एकलें होतें म्हणून आम्हीं बरीच पूर्वतयारी करून ठेवली होती. पण आम्हांला कोणालाच तिनें आपला पराक्रम दाखविला नाहीं. आम्ही सर्व मोठ्या मजेंत होतों. सर्वजण हंसत बोलत मार्गक्रमण करीत होतों.आमच्या बोलण्यांत मुलें व पोपूहि भाग घेत होतीं.

मुंबई सोडल्यावर आम्हांला प्रथम द्वारका लागली. द्वारकेची शोभा अवर्णनीय वाटली. पाहतां पाहतां पाण्यावर द्वारका तरंगूं लागल्यासारखें वाटलें.

वर जाऊन द्वारकेची मजा आमच्यापैकी सर्वांनी पाळीपाळीनें पाहिली. आमचे जहाज पुढें पुढें सरकूं लागलें. द्वारका लांब लांब जाऊं लागली व कच्छ मांडवी येऊं लागलीं.

कच्छ मांडवीला आम्हीं पाण्यांतील मोटार पाहिली. दत्तू व रूथ डेकवर गेले होते. त्यांनीं आपल्याबरोबर चालतीं बोलतीं मुलें नेलीं होती. खाली मीरा बेबी व पोपू एवढी मंडळी माझ्याबरोबर होती. मीराला चालतां बोलतां येत नव्हतें. ती हां हूं करीत लोळत पडली होती. तिच्या पायाशीं तिची दुधाची बाटली पडली होती.

कच्छ मांडवीचें बंदर दिसतांच आमची बोट थांबली. ज्याप्रमाणें एखादी मांजरी बऱ्याच वेळानें घरीं परतल्यावर तिचीं पिलें तिला चहूंबाजूंनीं बिलगतात त्याप्रमाणें आमची ही 'विठामाय' तेथें येऊन थांबतांच किती तरी मचवे होड्या तिला येऊन बिलगलीं. ह्या होड्यांतून प्रवासी उतरले पण त्यांच्याहि पेक्षां अधिक संख्या होती हेल्यांची. हेल्यांची म्हणजे हेलकऱ्यांची. पाण्याचा एखादा लोंढा यावा त्याप्रमाणें ह्या प्रवाशांचा व हेल्यांचा लोंढा आला, चांच्यांच्या हल्ल्यांच्या गोष्टी ऐकल्या होत्या. ते हल्ले असेच होत असावे. हेले अगदीं हेल्यासारखे ओझ्यांवर धांवून आले. ते जाणारांचीं ओझीं उचलीत तशींच न जाणारांचीहि उचलीत. एकाचा एक पाय मिराच्या दुधाच्या बाटलीवर पडून तिचा चक्काचूर

* पोपट पृ.१४-१५

झाला. दुसरा मिराच्या पोटावर पडणार इतक्यांत बेबीनें तिला फर्रकन् ओढून पोटाशीं धरली. थोडक्यांत चुकलें, नाहींतर मिराची कच्छांतच गच्छन्ति होत होती.

दोन रात्रीं व दोन दिवस आम्ही बोटींत होतों. तिसऱ्या दिवशीं म्हणजे नाताळाच्या दिवशीं पहाटें कराची गांठली. हिंवाळ्याचे दिवस. कराचीचे दिवस लहान झालेले. पुढच्या घड्याळांत आठ वाजले होते तरी साडेपांच सहाचा सुमार झाल्याचा भास होत होता. बंदरावर आम्हांला नेण्यासाठीं डॉ. ताराबाई व त्यांचे वडील ग्यानोबा मिसाळ आले होते. त्यांनीं आम्हांला व आमच्या सामानाला उतरून घेतलें. आम्हांला डॉ. ताराबाईंनीं वडिलांबरोबर आपल्या घरीं पाठवून दिलें व सामान त्यांनीं आमच्यासाठीं ठरवून ठेवलेल्या भाड्याच्या घरांत नेऊन ठेवलें.

माझ्या बहिणीनें म्हणजे ताराबाईंच्या आईनें आमची तयारी करून ठेवली व त्या आमची वाट पहात बसल्या होत्या.

आमचा नाताळ होता, तरी बोटीच्या प्रवासानें आमचीं डोकीं बेताल झालीं होतीं. बोटींत कांहीं वाटलें नाहीं पण खालीं उतरल्यावर कसेसेंच वाटूं लागलें. त्यांत कराचीची ती भयंकर थंडी. आम्ही नुसते थडथडत होतों. जेवणीं वगैरे झाल्यावर आम्ही घरींच पोथी-प्रार्थना केली व नंतर गृहपरीक्षेस निघालों. आम्हांला वाटत होतें अजून सकाळच आहे — पण मध्यान्ह झालेली होती.

घर चार मजली होतें. आमचें बिऱ्हाड तळमजल्यावर होतें. भाडें तीस रुपये. जागा दिसण्यांत फार सोयीची. रस्त्यावर दारासमोरच एक नाला. चांगला सिमेंटानें बांधून काढलेला स्वच्छ पण बिनपाण्याचा. नाल्याला लागून चार हाताचा दारापुढील रस्ता. आंत जाण्यायेण्यास दोन पायऱ्या. त्याच्या आंत एक लहानसा चारसहा हातांचा चौक. त्याच्यापुढें बैठकीची जागा. तींत एक डबल कॉट ठेवली तर आंत जाण्यास पाऊलवाट राहील इतकी ती लांब रुंद होती. त्याच्यामागें मागील चौक. चौकाला लागून ओसरीवजा पडवी. ती बिनभिंतीची. भिंत नसल्यानें दाराचा प्रश्नच नव्हता. मागला चौक वरील तीन मजल्यावरील लोकांच्या सोईसाठीं व आमच्या गैरसोईसाठीं मुद्दाम ठेवलेला होता. कराचीस भेदभाव, स्पृश्यास्पृश्य वगैरे कांहीं भानगडी नाहींत, जेवायाला बसायचें झालें तर सारे एकाच रांगेनें बसतात. तसेंच घरांतील निरनिराळ्या दालनांचे होतें. ह्याला अपवाद मालकांचीं घरें. भाडेकरांच्या घरांत स्वयंपाकघर, संडास, न्हाणीघर हीं सारीं एकाच ओळींत बसतात. आमच्याहि घरांत चौकाला लागून हीच सुव्यवस्था होती.

सामान लावणें, बाजार भरणें ह्याला दोन दिवस लागले. तिसऱ्या दिवशीं आम्हीं गृहप्रवेश केला. दत्तूला कामाला जावयाचें होतें म्हणून आम्हांला ह्या घरीं आणून पोंचविल्यावर तो

परत मुंबईला गेला. सून व मुलगी शाळेला जाऊं लागली. आतां घरांत सारें पोरांचें व म्हाताऱ्यांचें राज्य राहिलें. वडील माणूस मीच. आम्ही कराचीस जातांना पाटणकरानें आपल्या एका मित्राला [१] आमच्याबद्दल लिहिलें होतें. आमच्या नव्या घरी गेल्यावर पाटणकरांच्या मित्राचे वडील आम्हांला भेटायला आले. त्यांनीं आम्हांला सांगितलें, आपणांस हवी ती मदत करायला मी तयार आहे. कांहीं संकोच ठेवूं नका. मलाहि पडत्या फळाचीच आज्ञा हवी होती. मी म्हणालें, दोन गडी पाठवून आमचा एवढा पलंग लावून द्या. आणखी हें पहा, आम्हांला येथली भाषा समजत नाहीं तेव्हां आम्हांला भाजीपाला रोजच्या रोज आणण्याची एक पंचाईत भासेल. मलिकांनीं ताबडतोब गडी पाठविले. आणि एक बैलगाडी ते घेऊन आले. ही बैलगाडी एका बैलाची होती. तींत भाजीपाला भरून गाडीवाला दारोदार भाजी विकी. हेंहि आयतें काम झालें. पलंग लावून घेतला. भाजी दाराशीं येऊं लागली. येथील हिंदु बायांनाहि मुसलमान बायांप्रमाणें गोषा असतो. पण भाजीपाला त्या घेतात. हें सारें घरांतल्या घरांत चालतें. वरच्या मजल्यावरून त्यांनीं पैसे घालून टोपलें खालीं सोडून द्यावें व मग भाजीवाल्यानें आंत पाहिजे ती भाजी ठेवली कीं त्यांनीं टोंपलें शेंदून वर घ्यावें.

आम्हांला अशी भाजी शेंदण्याचें कारणच नव्हतें; कारण आम्ही तळमजल्यावरच होतों. नाल्याच्या व घराच्या मधें सांपडणाऱ्या बोळांतून ती गाडी दाटीपुटीनें येऊन आमच्या दारापुढें उभी राही. मुलें लहान, मी बाहेर पडलें कीं तीं माझ्याबरोबर बाहेर पडत. मी भाजी घेऊं लागलें कीं तेथें त्यांची लुडबुड सुरू होई. एक दिवस थोरला नातू गाडीचे चाकाला खेटून पालथा पडला. गाडीवाल्याच्या किंवा माझ्या हें लक्ष्यांत आलें नाहीं. आम्ही आपल्या कामांत दंग होतों. बैल देखील एक पाऊलहि पुढें न टाकतां शांतपणें उभा होता. धाकटा एकसारखा मला डवचून सांगत होता, ''आजी बघ नाना कसा निजला तो.'' पण मी आणा पै करीत होतें. इतक्यांत माझ्या पायाला नानाचा हात लागला. मी त्याला चटकन उचलून घेतला व भाजीवाल्यास पुन्हां न येण्याविषयी सांगितलें. घरांत कोणी नसल्यामुळें मुलें माझ्या मागें अशींच येणार आणि उद्यां कांहीं करतां कांहीं झालें तर काय करायचें?

आम्ही पाताळांत म्हणजे खालच्या मजल्यावर रहात होतों. स्वर्ग म्हणजे वरचे मजले जरी दोन बोटांवरच होते तरी आम्हांला नको तो स्वर्ग असें झालें होतें. कारण स्वर्गलोकांहून आमच्यापुढें धबाधब सारी घाण येऊन पडायची. खालच्यांच्या सुखाविषयीं बेपर्वाई दाखविणें हा जन्मसिद्ध हक्क मुंबईस रहा कीं कराचीस जा, कोठेंहि सारखाच बजावण्यांत येत असलेला दिसून येतो. आम्हांला आतां त्या स्वर्गाच्या वाऱ्यासहि उभें रहावेसें वाटेना.

१(शांति निकेतन मधील प्रोफेसर गुरूदयाळ मलिक)

मुलांची पहाटेच चुळबुळ सुरू व्हायची. आई, बाबा, आजी वगैरे शुद्ध मराठी शब्द त्या इमारतींत पहाटें घुमूं लागायाचे. हे शब्द ऐकून एक दिवस अगदीं वरच्या मजल्यावर राहणारा एक गृहस्थ[१] खालीं आला. त्याचा चेहरा आनंदानें फुललेला दिसत होता.

''अलीकडे पहाटें उठल्याबरोबर आमच्या देशांतील शब्द कानावर पडतात म्हणून मला फार आनंद वाटतो. म्हटलें कोण मराठी लोक राहायाला आले म्हणून मी मुद्दाम पहायाला आलों.''

ह्या गृहस्थाला आपल्या देशांतले लोक पाहून आनंद वाटला तसा आम्हांलाहि वाटला व आम्हांला कोणीहि महाराष्ट्रीय भेटले तरी आत्यानंद होत असे.

आमचें घर बदलण्याचें ठरलें. घरांत पुरुषमाणूस कोणीच नाहीं व कराचीला हिंदुमुसलमानांत गोषा सारखाच ! एक दिवस सकाळीं थंडीच्या कडाक्यांत रूथ व बेबी निघाल्या. आज घर शोधून येण्याचा त्यांनीं निश्चय केला. लौकरच करीमजी मंझीलमधील ५ नंबरचा ब्लॉक रिकामा होणार असल्याची शुभवार्ता त्यांनीं आणली. भाडें रुपये तीस. दुसऱ्या दिवशीं सकाळींच ह्या दोघी मुली पुन्हां बाहेर पडल्या. पांच जिने चढून वर गेल्या. पांच नंबरच्या खोलीचें दार ठोकलें. एका तरुण सिंधी माणसानें दाढी करतां करतांच त्यांना दार उघडलें. ह्या न बोलतांच आंत शिरून सारें घर पाहून आल्या ! त्याची हजामत चाललीच होती. ह्या परतल्यावर त्यानें दाढीवरचा हात न काढतां शान्तपणें सांगितलें कीं हें घर मोकळें होत नाहीं. बारा नंबरचें मोकळें होणार आहे ! ह्या दोघींनीं १२ नंबरच्या दारावर थाप मारली. एका उतार वयाच्या सिंधी माणसानें दरवाजा उघडला व तो त्यांच्याकडे आ वासून बघूं लागला. पण त्याहि घरांत न बोलतां त्या शिरल्या व घर पाहून आल्या. नं ५ चें घर चांगलें व थोड्या भाड्याचें होतें पण त्याचा प्रश्नच उरला नाहीं. ह्या दोघी आतां हे पांच जिने उतरून खालीं आल्या. पुन्हां पाचं जिनें चढून दुसऱ्या इमारतींत गेल्या. पण तेथलीं घरें चाळीस चाळीस रुपये भाड्याचीं होतीं तेव्हां त्यांचा प्रश्नच राहिला नाहीं. दुसऱ्या दिवशीं मी जाऊन हीं दोन्ही घरें पाहून आलें. १२ नंबरचें घर घेण्याचें ठरलें. ५ चें मिळालें असतें तर बरें झालें असतें. पण उपाय नव्हता.

आतां आमच्या सामानाची बांधाबांध सुरूं झाली. फेब्रुवारीच्या सुरुवातीपासून घर बदलायाचें ठरलें. १२ नंबरचा खोलीवाला आपलें घर देण्यास तयार झाला. त्याला रु. ३५ आगाऊ द्यावयाचे. पण आम्हांला खात्री वाटेना. शेवटीं माझे बंधु ग्यानोबा मिसाळ ह्यांना पाठविलें, आमच्या सामानाची बांधाबांधी निमीअधिक होत आली होती. रात्रीं दहा साडेदहाला ग्यानोबा आले. ते सांगूं लागले कीं, १२ नंबरचें घर मिळत नाहीं. आमची

१. (बापूजी बाळकृष्ण कामत)

सर्वांची निराशा झाली. पण मागें ठेवलेली आनंदाची बातमी त्यांनीं नंतर सांगितली कीं ५ नंबरचा ब्लॉक रिकामा होत आहे. भाडें रुपये तीस. आतां खरोखरच आमच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. घर ठरलें. दुसऱ्या दिवशीं सकाळींच एक बोहोरी आला. त्यांने एका छापील कागदावर रूथची व बेबीची सही घेतली. नंतर तो त्यांना आपल्या बरोबर बोलावूं लागला. त्या त्याच्याबरोबर गेल्या. तेथें बरेच बोहोरी होते. ते अकरा महिन्यांचें लीज करून मागूं लागले. लीज म्हणजे काय तें त्यांना कळेना. त्यांना वाटलें अकरा महिन्यांचें आगाऊ भाडेंच ते मागताहेत. त्यांनी विचारलें ''तुम मतरीक है?'' ह्यांनीं त्यांना आपण बी.ए. असल्याचें सांगितलें. पण त्यांना बी.ए.चा अर्थ कळेना. पगडी, मिठाई वगैरे मुंबईचे प्रकार न करतां घर मिळालें व आम्हीं एक महिन्यांत पहिलें घर बदलून दुसऱ्या घरांत आलों.

परप्रान्तावर आम्हीं केलेल्या स्वारींत घरसंशोधनाच्या पहिल्या चकमकीत आम्ही यशस्वी झालों. हींत एकहि स्त्री आम्हांला आढळली नाहीं. सर्व पुरुषांचा कारभार. तरी कराचीचे पुरुष स्त्रियांशीं फारच अदबीनें वागणारे आहेत असा आम्हांला अनुभव आला. मुली बाजारांत जात तरी तेथेंहि सर्वजण त्यांना फार चांगल्या रीतीनें वागवीत. दुकानदारांना बहुतेक इंग्रजी कळतें व ह्या इंडियन गर्ल स्कूल मधील मास्तरणी ! इंडियन गर्ल स्कूल तेथें फार प्रसिद्ध आहे.

आमचें हें नवीन बिऱ्हाड चौथ्या मजल्यावर होतें, गोषापद्धतीला साजेल असेंच हेंहि घर होतें. चौथ्या मजल्यावर एकदां पुढचें दार बंद करून घेंतलें कीं आमचें घर अजिंक्य किल्ला बनायाचा. येथेंहि पहिल्याच घराप्रमाणें बहुतेक व्यवस्था होती. मात्र घर जरा अधिक ऐसपैस असून मागच्या गच्चीवर वर स्वर्ग बसविला नसून तेथून केवळ निरभ्र आकाश दिसे. रात्रीं चंद्र, चांदण्या व दिवसा सूर्य ह्यांची सोबत आम्हांला होती. विमानेंहि रोज आपल्या ह्या एवढ्याशा जगांतून आम्हांला दिसायाचीं. बाकी मात्र शेजारचें घरहि दिसायाची पंचाईत.

– ११ –

# कराचीतील वास्तव्य

आम्ही कराचीस पोंचल्यावर दहा पंधरा दिवसांनीं आम्ही जहाल मंजुळाबाईला बोलावून घेतलें. येथें आम्हांला नोकरमाणूसच मिळेना. पण मंजुळाबाईला आम्हीं नोकराप्रमाणें वागविले नाहीं. मुलांची तीहि एक तिसरी आजी होती.*

नवें घर फार चांगलें होतें. मात्र येथील स्वर्गसुख भोगायाला सहा जिने म्हणजे साठ पायऱ्या चढाव्या लागत. घराला मागल्या बाजूस लहानशी गच्ची असल्यानें मुलांना खेळायाला चांगली सोय झाली होती. शिवाय ऊन ह्या दुर्मिळ झालेल्या वस्तूचा खूपच अनुभव घेण्यास मिळे. पूर्वीच्या घरांत आमच्या डोक्यावर राहणारी माणसें खालीं पाणी फेंकीत. आम्ही तें सारें मुकाट्याने गिळीत होतों. (पाणी नव्हे.) इकडे आल्यावर एकदा आम्हींहि वरून असेंच-नकळत पाणी फेंकलें.

थोड्या वेळानें दारावर थाप ऐकूं आली. रूथने दार उघडलें. लहंगेवाली एक बाई आंत आली. दुसरी आली. तिसरी आली. चौथी आली. बरोबर कोणाच्या कडेवर मूल तर कोणाच्या लहंग्याला चिकटून मूल. कांहीं मुलें तशींच मागेंपुढे घोटाळत शिरलेलीं. आमची खोली अर्धी अधिक भरून गेली. आम्हांला मराठी येत होतें मुलींना इंग्रजी येत होतें. त्या बाया काय बडबड-कलकलाट करीत होत्या तें कळेना. पण आमच्या पाणी टाकण्याचा त्या बोलण्याशीं संबंध असावा असें त्यांच्या एकंदर हावभावावरून आम्हीं ओळखलें व त्यांनीं आम्हांला आमच्या पूर्वस्थितीची आठवण करून दिल्यावर मग मात्र आम्हीं कधीं खालीं पाणी टाकलें नाही. येथें माणसांचा वारा नव्हता व पक्ष्यांचा थारा नव्हता. माणूस पहायला जायचें झालें तर खाली रस्त्यावर जावें लागे. कारण खिडकी व गच्ची ह्या दोन्हीं उंच असल्यानें त्यांतून डोकावून पहाणेंहि अशक्य. त्या भुईकोट किल्ल्यांत आमच्या चौघींशिवाय दुसरें कोणी फारसें मुलांच्या दृष्टीसच पडत नसे. बाहेरची गम्मत म्हणजे विमानें घरघर एकूं येऊं लागली, कीं मंजुळाबाईनें ''विमान आलें ग पोरींनो विमान'' म्हणून आरोळी ठोकली की पोरांची गडबड उडायची. जवळजवळ चार पाच विमानें रोज घिरट्या घालायचीं. तीं दिसायाला लागल्यापासून दिसेनाशी होईपर्यंत मुलांनी वर डोकी वळवून पहात बसावें. किंवा अंगठ्या-चौड्यावर उभें राहून खिडकींतून खाली पहाण्याचा प्रयत्न करावा व खालचीं

* (मंजुळाबाईचे आमच्या घरी 'ममाआजी' असें नांव होतें )

डोकीं पागोटी दिसतील त्यांतच मजा मानून घ्यावी.

बाबूचे एक मित्र गुरुदयाळ मलिक कराचीस राहतात. त्या वेळी ते टागोरांच्या शान्तिनिकेतनांत शिकवीत असत. आम्ही गेल्यावर गुरुदयाळचे वडील आमचा शोध काढीत आले. बाबूनें गुरुदयाळला आमच्याबद्दल लिहिले होतें व त्यानें आपल्या वडिलांना लिहिलें होतें. त्यांनीं आम्हांला फार सहाय्य केलें. आणि माझ्या स्वभावाप्रमाणें मीं तें करून घेतलेंहि. दांतांमुळें मीरा आजारी पडूं लागली. मलिक आजोबांनी तिला डॉक्टरकडे नेलें. तिच्यासाठी औषध आणलें. नाना अशोकला ते फिरायाला घेऊन जात. त्यांचा एक मुलगा व ते व्यापार करीत. पण त्यांना फिजिकल कल्चरचा फार नाद. आपल्या दोन्हीं मुलांपेक्षां त्यांची प्रकृति कितीतरी पटीनें छान असे. ते कधीं औषध घेत नसत. मलिकांच्याच साह्यानें पहिल्या घरांतून दुसऱ्या घरांत एवढें मोठें सामान केवळ अडीच रुपयांत आम्हीं आणलें. त्यांची तीन माणसें त्यांनी त्या दिवशीं आमच्याकडे साह्यार्थ पाठविली होतीं. ती फारच उपयोगीं पडलीं.

मुलांना मलिक आजोबा फार आवडत. आमचें पहिलें घर त्यांच्या वाटेवर असल्यानें ते जवळजवळ रोज येत. पण नव्या घरीं आल्यावर त्यांचे येणें पुष्कळ कमी झालें. एक दिवस दार जोरानें खडखडलें. बाहेरून आजोबांचा आवाज आला-- ‘नाना’. मुलें दार उघडायाचें विसरुन आंतच दाराशीं आजोबा आले आजोबा आले करीत उभी राहिलीं व आंतूनच बंद दारांतून त्यांना हात जोडून नमस्कार करूं लागली. ते आंत येऊन बसल्यावर नानानें आपलीं सारी खेळणीं त्यांच्यापूढें आणून ठेवली. त्यांने आपली मोडकी ‘भगाई’ आणली, मग आपले बूट आणून ठेवले, मग एक खरकटें भांडें त्यांच्यापूढे ठेवले. मग केरांत पडलेली एक मनूक शोधून आणली व तो खाऊ त्यानें मलिक आजोबांना दिला. आजोबांनी ती मनूक डोळ्यांपूढें धरली. निरखून पाहिली. मग खिशांतून रुमाल काढून ती पुसली व मग तोंडांत टाकली !

मग नानानें त्यांना आपली ‘लाछी’ ‘बिछी’ (लॉसिंजर व बिस्किट) आणून दिलीं. ही खाल्यावर त्यांनी आनंदानें ढेकर दिला !

तिन्हीं मुलें एकाखालीं एक असल्यानें एकानें कांही केलें की दुसऱ्यानें तेच करावें मग तिसरीचें रडणें नाहींतर हुंकार सुरू व्हावें. नानानें खूप प्रश्न विचारावे. त्यांची समाधानकारक उत्तरें न मिळाली कीं रागावावें. प्रश्नांत आम्हांला घोटाळावें. एकदा नानांचे व त्याच्या आईचे खालील आशयाचे बोलणे झालें. पुढील दोन तीन संवाद त्या वेळीं लिहिलेल्या पत्रांतून घेतले आहेत. नाना आपल्या आईला प्रार्थनेबद्दल विचारीत होता.

**नाना :** आई निजण्यापूर्वी बापा केली पाहिजे का ?

**रूथ** : हो. देवबाप रागावेल नाहींतर —

**नाना** : आई देवबाप रोज बापा करतो का ? कोणाची करतो ?

**रूथ** : हं.

**नाना** : आई देवबाप तुझा कोण आहे ?

**रूथ** : माझा बाप आहे.

**नाना** : माझा कोण तो ?

**रूथ** : बाप आहे.

**नाना** : मुंबईत आहेत ते माझे कोण आहेत ?

**रूथ** : तुझे बाबा.

**नाना** : बाबा पण बाप आहेत. दोन दोन बाप आहेत मला ?

**रूथ** : नीज रे ! मला काम आहे.

**नाना** : देवबापाला किती बाप आहेत ?

**रूथ** : नीज रे !

**नाना** : आई, बाबा तुझे कोण आहेत ?

**रूथ** : तूं सांग !

**नाना** : तुझे बाबा माझे कोण ?

**रूथ** : आजोबा.

**नाना** : माझे बाबाहि तुझे आजोबा का ?

**रूथ** : नाहीं.

**नाना** : कां बरं ?

ह्यावर रूथ त्याच्यावर रागावली व तो निजला.

अशोक बोबडें बोलत असे. लठ्ठ आणि लांब लांब केंस रुळत आहेत, लुटू लुटू चालत आहे व तोंडाने सारखें बोबडें प्रश्न विचारीत आहे असे चित्र पुढें उभें धरून खालील संवाद वाचावा. रूथ शाळेचें काम घेऊन बसली आहे, अशोक जवळ लुडबूड करीत आहे. नाना व मीरा निजलीं आहेंत.

**अशोक:** आई मी पण लिहितों दे.

**रूथः** जा बाळ नीज आतां.

**अशोक**: जाऊं ? निजूं ?

**रूथः** हं.

**अशोक**: पयंगावर निजूं का खाली निजूं ?

**रूथः** कुठेंहि नीज जा. नाना ताई कशीं शहाणीं मुलें आहेत ?

**अशोक**: आई ? छानीं मुअं छानीं असतात का ?

**रूथः** हो बाळ.

**अशोक**: आई वेवी (वेडी) मुअं (मुलं) वेवी असतात का ?

**रूथः** होय रे ! अशोक मोठा छाना हं.

**अशोक**: मोठा छाना नाहीं न नान छाना अं अं अं.

**रूथः** बरं बरं, नान छाना आहे अशोक. जा आतां नीज.

**अशोक**: मी नाहीं निजत.

**रूथः** (रागानें) नको निजूं. नाच.

**अशोक**: नाचूं ? कुठें नाचूं ? इथेंच नाचूं का ?

रूथ व आम्ही हसतो (तालावर नाचतो.)

**अशोक**: आतां पुवें (पुरें) का ?

**रूथः** पुरें आतां नीज.

**अशोक**: मी तुझ्या हातांवर निजतों.

रूथ आपलें लिहावयाचें गुंडाळून ठेवते व अशोकला घेऊन निजते.

मीराला कराची चांगली मानवली. येथें आल्यावर तिला पटापट दांत निघूं लागले. दांत निघतो असें वाटलें, की रूथ तिला सिट्झ बाथ देण्यास सुरुवात करी, त्यामुळें दांताच्या वेळी मुलांना जो त्रास होतो तो तिला झाला नाहीं. अधून मधून थोडीशी तापे एवढेंच.

तिला मंजुळाबाई फार आवडे. आमच्या जवळून तिच्या अंगावर ती झेप टाकी.

अशोकचे बोबडें बोलणें फार गंमतीचें असे. मीराला तो 'मिया' म्हणे व ती बोलायाला लागली तों तिचा पहिला शब्द होता 'अल्ला'! अर्थात् 'मिया' 'अल्लाच' म्हणायाची !

मंजुळाबाईसमोर उभा राहून कमरेवर हात ठेऊन अशोक मोठ्या ऐटीत तिला म्हणे,

''चा पिवा (चहा प्या) पा खा (पान खा) चुना खा. दा कोवा (दांत कोरा), का कोवा (कान कोरा)'' खांद्यावर कपडा टाकून म्हणायाचा 'मी वावा जातो' (मी बाजाराला जातों.)

अशोक फार गमत्या. इतक्या लहान वयांत तो गमती गमती करून आम्हा सगळ्यांना खूप हसवायाचा, एखादे वेळेस रागानें त्याला म्हटलें गप बैस म्हणजे खाली दिलेला संवाद हटकून व्हायचा.

'' गप बैस का म्हणतेस ? ''

'' मग काय म्हणूं ? ''

'' चूप बैस म्हण ''

'' बरं चूप बैस. ''

'' चूप बैस का म्हणतेस ? ''

'' मग काय म्हणूं ? ''

'' गप्प बैस म्हण. ''

आमच्या करमणुकीला फोनोग्राफ नेला होता. त्याच्या रेकॉर्ड लावल्या म्हणजे त्यांच्या ठेक्यावर अशोक नाचे. एक प्लेट 'नका टाकून जाऊ' ही होती. एक दिवस मंजुळाबाई त्याच्यावर रागावल्या व त्याला मारण्याचा अविर्भाव करूं लागल्या तर कसें म्हणतो, ''नका टाकून जाऊं डावा डोळा पाण्यानें माझा भववा'' हें ऐकतांच त्या हंसायला लागल्या.

एकदा सिंहगड चित्रपट आला होता. आम्हीं मुलांना नेहमी महाराष्ट्रांतील गोष्टी सांगत असूं. हा चित्रपट आल्यावर आम्ही त्यांना घेऊन मुद्दाम सिनेमाला गेलों होतों. घरी आल्यावर त्यांच्या मनावर त्या चित्रपटाचा एवढा परिणाम झाल्याचे दिसलें की त्यांच्यांत संभाषण सुरू झालें.

**नाना :—** अशोक आपण किनाहीं महाराष्ट्रातील आहो बरं का ? सिंधी नाहीं. आपला गांव किती सुंदर आहे. मोठ्या मोठ्या नद्या आहेत. डोंगरावर मोठे मोठे किल्ले आहेत. इथें काय एकच मलकट कलकट नदी आहे. एक मातीचा किल्ला आहे. आपला महाराष्ट्र फार सुंदर गांव आहे. आपण जाऊं तिकडे बरं का.

**अशोकः**— आपण मालाल्ल लोक आहों. मालाल्ली लोक ललत नाहींत. सिंधी लोक, पंजाबी लोक लत्तात. बंगाली लोक पण लत्तात. मी तल तानाजी आहे. आई तानाजी ललत होता ? नाहीं.

**नानाः**—मीरा तूं रडूं नको. आपण मराठे लोक आहों बरं का ?

**मीराः**—अं अं.

पण हे शूर मराठे कोंबडीला भिऊन पळायाचे. त्यांनीं बाहेरचें जग फारसें पाहिलें नव्हतें. एखादे वेळेस मुलांना घेऊन कधीं खालीं उतरलें व रस्त्यानें कोंबडीं दिसली कीं त्यांनी ' आमली आमली ' म्हणून माझ्या पायांना बिलगावें.

एक दिवस आम्हीं बाहेरच्या खोलीत कांही करीत बसलों होतों. नाना अशोक व मीरा आंतमध्यें गच्चीवर उन्हांत खेळत होते. गच्ची व मागील दोन खोल्या व पुढची उठण्याबसण्याची खोली ह्यामधला दरवाजा बंद केला, कीं हीं दोन अलग होत. आम्ही इकडे बोलण्याच्या नादांत तर तिकडे मुलें खेळण्याच्या नादांत. खेळतां खेळतां नानानें मधलें दार लावलें व चवड्यावर उभे राहून दाराला तिकडून कडीहि घातली. झालें. मला मुलांना कांही सांगतां येईना कीं, खूण करतांही येईना. मुलांनाहि कांही समजेना'. मीरा लहान. तिचा रडण्याचा आवाज येई. आतां काय करावें ! शेवटी एक दोन घंटे श्रम केल्यावर नानाला कसेंतरी समजून कडी काढविली.

मला नानाचा फारच संताप आला. मी एक लाटणें घेऊन त्याला खोटी खोटी मारायाला निघालें. त्याला आपला अपराध कांहीं कळेना. तोहि माझ्यावर रागावला. पण आपला राग कसा व्यक्त करावा हें त्याला कळेना. शेवटीं लाल होऊन तो मोठ्यानें ओरडला,''ए छोकरे.'' मला इतकें हसूं आलें कीं लाटणें तेथेंच जमिनीवर टाकून मी हंसत बसलें.

बाबूचा मित्र गुरुदयाळ ह्याला आम्हीं पाहिलें नव्हतें. मलिक आजोबांकडून त्याच्यासंबंधीं नेहमीं ऐकायला मिळे. तो शान्तिनिकेतनांत असल्यानें प्रत्यक्ष परिचय झाला नव्हता. पण गुरुदयाळ येणार म्हणून ऐकूं येऊं लागलें आणि एक दिवस मलिक आजोबांबरोबर एक लहानसा माणूस आमच्या घरीं येऊन उभा राहिला. अंगांत बंगाली धर्तीचा खादीचा पोषाख, पायांत खडावा, डोक्यांत कांहीं नाहीं. डोळ्याला सोन्याच्या फ्रेमचा चष्मा. तोंडावर शुद्धतेची सरळतेची चमक असा गुरुदयाळ आमच्यापुढें येऊन उभा राहिला. मुलांची व त्याची क्षणांत मैत्री जमली. त्यानें नेहमीं येण्याचें कबूल केलें; पण एक अट घातली कीं, आम्हीं त्याला कांहीं खाण्याचा आग्रह करायाचा नाहीं, व कांहीं तरी सेवा करण्यास सांगायची.

पण अट कबूल करूनहि तो आमच्याकडे आला नाहीं. त्याचें कारण नंतर आमच्या ध्यानांत आलें. त्याचा स्वभाव फार संकोची व भिडस्त आहे.

मलिक आजोबांना दोन मुलगे. वडील ईश्वरदास व धाकटा गुरुदयाळ. ईश्वरदास मोठा

व्यापारी. मलिक आजोबा व ईश्वरदास ह्यांच्याच श्रमाचें फळ म्हणजे त्यांचा एवढा मोठा व्यापार. गुरुदयाळ ह्याच्या अगदी उलट. विद्वान, रसिक, सेवारत, धार्मिक अशी त्याची स्थिति. डॉ.टागोरचा तो अगदीं आवडता. गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणें त्याचे सारे बेत विचार ठरायचे. संसारांत किंवा जगांतल्या व्यवहारांत मुळींच लक्ष्य नाहीं. ठराविक कामें करून व तीं कर्तव्य म्हणून अगदीं व्यवस्थितपणें करून-उरलेला सारा वेळ लोकहितार्थ झटत राहणें व तसें करीत असतां स्वतःच्या देहाची सुद्धां काळजी न करणें हें त्याचें खरें सुख.

शरीरप्रकृति आजोबांची फार चांगली. हे दोघे मुलगे आपले असे तसेच. त्यांतल्या त्यांत गुरुदयाळ म्हणजे तर जरत्कारू. मलिक आजोबा मात्र फिजिकल कल्चरचे मोठे भोक्ते. डोक्यावरील केस व मिशा तेवढ्या म्हाताऱ्याच्या बाकी मुद्रा तरुण माणसाची अशी त्यांची स्थिति होती.

एकदा कांहीं शर्यती होत्या. म्हाताऱ्याकडे त्यांतील कांहीं व्यवस्था होती. शेवटीं गंमत म्हणून लोकांनीं एका पळण्याच्या शर्यतींत म्हाताऱ्यालाहि घातलें. त्यांत मुलगा गुरुदयाळहि होता. त्या शर्यतींत म्हातारा पहिला आला व गुरुदयाळ शेवटला आला !

मुलें नेहमीं गाणें म्हणत ''आनि मताला मनगत दावी तुझे हालपेल.'' गुरुदयाळकडे पाहिलें म्हणजे मात्र आपल्या मुलांची ही दर्पोक्ती खरी वाटे.

— १२ —

# मधला काळ *

**(देवदत्त नारायण टिळक)**

हा चित्रपट आतां पुष्कळच झरझर चालविला पाहिजे. चित्रपट-लेखिका गेल्यानें होतां होईल तों तिच्याच हातच्या लेखनाच्या तुकड्यांची जुळणी करण्यापलीकडे कांहीं करतां येणें माझ्या शक्तीच्या बाहेरचें आहे. पुढच्या प्रकरणांत स्मृतिचित्रें व ख्रिस्तायन हीं कशीं लिहिलीं गेलीं ह्याबद्दल आईनें लिहिलेला मजकूर दिला आहे. पण कराचीपासून स्मृतिचित्रें व ख्रिस्तायन ह्यांच्या लेखनकालापर्यंत दहाबारा वर्षांचा काळ निघून गेला होता. ह्या काळांतील कांहीं माहिती ह्या प्रकरणांत दिली आहे.

कराचीस असतांना आई फार आजारी पडली. ताप कांहीं केल्या हटेना. ह्या वेळेस रा.गुरुदयाळ मलिक नांवाच्या एका गृहस्थांची व आईची ओळख झाली. आई गुरुदयाळवर पुत्रवत् प्रेम करीत असें. ह्यांच्या श्रमानें व कळकळीनें ह्या स्त्रीमंडळाला फार धीर येत असे. पण कराचीस ह्या वेळेला सुद्धां गंमतींना तोटा नव्हता. मला आलेल्या पत्रांतील ह्या उताऱ्यांत तशी एक गंमत आहे:-

''आपल्या आईंना अजून कांहीं उठवत नाहीं; निजूनच असतात. थोडेसें बरें वाटूं लागलें होतें पण लवणानंद आले. त्यांनीं मीठ पाणी पिण्यास सांगितलें. त्या एक शेर पाणी प्याल्या व पुनः तापानें पडल्या. पुनः बरें वाटूं लागलें. परवां स्वामी पुन्हां आले होते. मग त्यांनीं पुनः मीठ पाणी पिण्यास सांगितलें कीं काय कोण जाणें-पुनः बरें वाटेनासें झालें.''

आईला बरें वाटूं लागल्यावर तिनें मुलांचें शिक्षण आपल्या अंगावर घेतलें. स्वतःला जेवढें येत असेल तेवढें दुसऱ्याला शिकवून टाकण्याची तिला नेहमींच घाई व्हायाची. मुळाक्षरें व एक बाराखडी इतकीच तिची शिक्षणखात्यांतील पुंजी होती. तरी ह्याच भांडवलावर तिनें लहानपणीं मला शिकविलें, नंतर बेबीला शिकविलें, नंतर शिकण्यास तयार असतील त्या परदेशीय माणसांना शिकविलें. एकदा नगरास आमच्या शेजारी एक मद्रासी कुटुंब आलें होतें. त्या बाईला मराठी, इंग्रजी, हिंदुस्थानी वगैरे कांहींच येत नव्हतें. आईला तिचा फार कळवला आला. आई तिच्या घरांत गेली. तिचा हात धरला व तिला तिनें आमच्या घरांत आणून बसविलें. ती बिचारी आईच्या तोंडाकडे भिटी भिटी पाहूं

* (या पुढील मजकूर श्री. देवदत्त नारायण टिळक यांनी लिहिलेला असून पुढील आवृत्तींत वगळलेल्या त्यांच्या पांच प्रकरणांचा संक्षेप या दोन प्रकरणांत दिलेला आहे. -अदे.)

लागली. ही बाई काय करते हें तिला समजेना. आईनें तिच्या पुढें पाटी पेन्सिल ठेवून तिला शिकविण्यास आरंभ केला. पाटा म्हणावें पुढें पाटा आणून ठेवावा पाटीवर पाटा शब्द लिहावा. केरसुणी म्हणावें, पुढें केरसुणी ठेवावी, पाटीवर केरसुणी लिहावें. अशा रीतीनें तिला पहिल्या दिवशी वीस पंचवीस शब्द तिनें शिकविलें. आणि पुढें आठदहा दिवसांत तिला मराठी साधारणपणे बोलतां लिहितां येऊं लागलें!

कराचीस मुलांना शिकवितांना स्वतः आईहि पुष्कळच लिहायला शिकली.

एक अक्षर झालें म्हणजें त्या अक्षराची पुरी ओळख व्हावी म्हणून तिनें निरनिराळे पाठ लिहून काढले. मुलें ते पाठ वाचीत. त्यांना एकच तेवढें अक्षर माहीत असायचे. त्यावरून त्यांनीं शब्द बसवायचे. पुढें दोन तीन चार अशीं अक्षरें मनांत बसल्यावर तर तीं बोलतां बोलतां वाचूं लागलीं. तिनें लिहिलेले दोनतीन पाठ खालीं दिले आहेत.

— २० —

**फ**ळाची **फा**क **फि**रून **फु**लांच्या परडीत ठेव. उगाच फिरत राहूं नको. त्यांतील एक **फू**ल मला दे. इकडे तिकडे **फें**कूं नको. **फै**टण आत्तां येईल. तयार रहा. **फो**टो काढायाचा आहे. मुलांची **फौ**ज आली वाटतें. **फं**म **फं**मं मोटार वाजली.

— २१ —

**ब**रें **बा**बा **बी**न वाजीव **बि**नचूक हं ! **बु**रा येऊन **बु**रसून गेलेलीं फळें खाऊं नको. तूं **बे**धडक पाहिजे तसा खातोस. **बै**लगाडींत **ब**सून **बो**लत **बो**लत **बें**जीमामाबरोबर **बौ**कर हॉलवरून **बं**गल्याकडे जा.

— २२ —

**भ**टानें **भा**टाचें सोंग आणलें. **भि**वया **भि**जवून त्यांवर **भु**इमुगाच्या शेंगा **भु**इवर जरा दाबून **भे**सूर दिसेल असें **भै**रवाचें सोंग आणलें व **भों**वऱ्यासारखें तोंड फिरवीत बसला. — **भ**णंगच तो.

वरील तीन उताऱ्यांवरून दिसून येईल कीं आईनें नुसत्या त्याच त्याच अक्षरांचे धडे बनविले असें नाहीं तर सबंध बाराखड्याहि त्यांत साधल्या.

त्याच वेळेस तिनें मुलांकरतां खूपशा कविताहि केल्या. ह्या संग्रहांत, घोडा, कुत्रा, उंट, मांजर, हत्ती, चिमणी, कावळा, पोपट, गाय, घार, गाढव, उंदीरमामा इतक्या कविता जनावरांवर आहेत.

हत्तीवरील कविता उदाहरणार्थ देतों.

**काय गडे — डोंगर चालत येत पुढें**
**त्यावरती — ना झाडी परि लव नुसती**
**पाय कसे — इमारतीचे खांब जसे**
**कानांचा — थाटमाट जणुं सुपल्यांचा**
**इवलाले — डोळे जणुं झोंपीं गेले**
**दांत कसे — शेतकऱ्याचे फाळ जसे**
**किती लांब — नाक जणूं कीं मलखांब**
**मानेचा — घाट असे तो तुळईचा**
**शेंपूट — अगदिंच ना शोभा देत**
**कां देवें — रुपडें ऐसें घडवावें?**
**खाद्य तरी — तोडून झाडें उदर भरी**
**सांग बरें — ह्या प्राण्यांचें नांव खरें.**

मुलासाठीं ह्याच वेळेस रचलेलें आंकड्यांचें गाणें बरेंच प्रसिद्ध झालें होतें. तें गाणें असें -

**चला गडे घेऊन पाट्या लिहुं अकडे**
**बघ इकडे-एकाचे मुख डाविकडे १**
**दोंन कसे? - अर्धा विंचु असाच दिसे २**
**तीन तरी - डाव्या बाजुस हात पसरी ३**
**चार कसे -? मांडी घालुन शांत बसे ४**
**पांचानें - आ पसरून वरती बघणें ५**
**सहा कसे?- तीनाच्या तो उलट दिसे ६**
**साताचा - तुकडा पडला जिलबीचा ७**
**आठाची - आंकडी प्रभुजी माळ्याची ८**
**नऊ कसे!- एकाच्या तो उलट दिसे ९**
**दहा पहा, एकावरती शून्य लिहा. १०**

हें गाणें एकीकडे म्हणायचें व तें म्हणत असतांना ते आंकडे लिहायाचे. अशा रीतीनें

बोलतां बोलतां तीं आंकडे शिकलीं. मुलांना महाराष्ट्राचा अभिमान वाटावा म्हणून ती त्यांना मराठी इतिहासांतील गोष्टी सांगे. मुलेंहि मोठमोठ्या ऐतिहासिक गप्पा ठोकीत. एकदा कराचीस सिंहगड चित्रपट लागला होता. तो पाहण्यास आई दोन वेळेस मुलांना घेऊन गेली. घरीं आल्यावर साऱ्या घरभर सिंहगड सर करण्याचा खेळ सुरू झाला. तो खेळ पाहून आईनें एक कविताहि केली.

कराचीस जाण्यासाठी जहाजांत पाय ठेवतांच परत महाराष्ट्रांत येण्याचे वेध लागलेले होते. व डॉ.ह्यूम ह्यांनी अमेरिकेंतून परत आल्यावर फारच खटपट केली. त्यांनींच माझ्या पत्नीला नगरास सरकारी शाळेंत काम लावून दिलें. त्याच वेळेला बेबीची (ताराबाईची) इंग्लंडला जाण्याची व्यवस्था झाली. ती इंग्लंडला गेली व मी सारी मंडळी परत घेऊन नगरास आलों. मी अजून एलएल.बी.पास झालों नव्हतों व पास होण्याचा रंगहि दिसेना. तेव्हां मी मुंबईस राहिलों. एलएल.बी. झाल्यावर नाशकास येऊन स्थायिक होण्याचें आमचें ठरलें होतें. व त्याप्रमाणेंहि घडून आलें. कारण नगरास चार सहा महिने होतात न होतात तों रूथची बदली नाशकास झाली व ती आईसह नाशकास मुलेंबाळें घेऊन आली.

येथें ती आली तों घराची अडचण दत्त म्हणून उभी राहिली. पाटणकरांच्या घरीं आई सुनेला घेऊन उतरली. पण तेथला पायखाना बाटूं लागला. तेव्हांचा आईचा अनुभव तिच्या स्वभावाचा एक महत्त्वाचा कप्पा दाखवितो म्हणून तो येथें देतों.

आम्हांला पाटणकरांचे घर सोडण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. अकरा वाजेपर्यंत कसातरी वेळ काढला. रूथ तशीच शाळेला गेली. आतां काय करावें सुचेना. आई म्हणाली ''दत्तू भिऊं नकोस रे. नाशीक आपलेंच आहे.'' आईचें आशावादित्व नेहमींच तिला व आम्हांला धीर देई. पण मला तर डोळ्यांपुढे सारा अंधार दिसत होता. पण तेवढ्यांतल्या तेवढ्यांत आम्हांला एका अंधानेंच धीर दिला व साह्य केलें !

आईला आपपर भाव कधीं वाटत नसे. तिचे नाशकास खंडीभर खरे नातलग होते तसेच तोंडमानलेले दीड खंडी नातलग होते. त्यांतच मटंगे नांवाचे एक तिचे बंधु होते. ह्यांचा अंध मुलगा [१] आईला आपली खरी खरी आत्या समजतो. आई आलेली त्याला कळतांच तो चांचपीत चांचपीत तिला भेटायाला आला. त्यांचें खालीं दिल्याप्रमाणे कांहीसें भाषण झालें.

''आत्या, तूं कांही काळजी करूं नको. माझा मोठा वाडा आहे. मी देतों तुला बिऱ्हाडाला जागा.''

१. काशीनाथ महादेव मटंगे

''पण बाबा मी ख्रिस्ती आहें हें तूं विसरतोस. आज आम्हांला येथें प्रातर्विधीसुद्धा उरकतां येत नाहीं. तुझे दुसरे भाडेकरी सारे जातील निघून.''

''आत्या दुसरे भाडेकरी भाडेकरी आहेत. तूं आत्या आहेस. ते गेले निघून तर गेले. त्यांची मला कांहीं पर्वा नाहीं.''

हें भाषण ऐकून मला मोठा धीर आला. त्या गृहस्थाचें कौतुक वाटलें. तो आईला सारखा आग्रह करूं लागला कीं ''चल आणि माझें घर पहा. मी तुम्हांला लागेल तो भाग देतों.'' आई नको नको म्हणत होती. पण तो हटूनच बसला. शेवटीं आईनें त्याच्या वाड्यांत बिऱ्हाड करण्याचें एका अटीवर कबूल केलें. ती अट म्हणजे दुसऱ्या भाडेकऱ्यांची संमति घ्यायची.

मटंग्यांनीं टांगा आणला. आई, मटंगे व मी टांग्यांत बसलों. त्याच्या वाड्यांत येऊन पोंचलों. त्यांनीं आपला सर्व वाडा दाखविला. आम्हांला कोणता भाग द्यायचा तें ठरविलें. परंतु आई म्हणे, ''अरे मटंगे कशाला इतके श्रम घेतोस? तुझ्या बिऱ्हाडकरूंना विचार आधी?'' तो म्हणे''आत्या तूं गप्प बैस. तुला कांहीं कळत नाहीं. कोण काय बोलतो तें मी पाहतों. मी सांगेन माझी आत्या आहे. काय करणार तुम्ही?''

त्या वाड्यांत एक वकील रहात होते. त्यांना आईनें मागल्या बाजूला बोलवणें पाठविलें. आम्ही तिघे जमिनीवर बसलों. वकीलसाहेब आमच्यापुढें उकीडवे बसले.

''हे पहा मटंगे. तूं फार शहाणा आहेस. तुला आम्हीं शिकवावें असें नाहीं. पण भलताच शहाणपणा करूं नको.''

''पण ती माझी आत्या आहे.''

''आत्याबाई तुम्हीच ह्याला दोन समजुतीच्या गोष्टी सांगा.''

ह्या सर्व बोलण्यावरून आणखी कांहीं स्पष्ट ऐकायचें राहिलें नव्हतें तरी मीं म्हटलें.

''तुमचें म्हणणें स्पष्टच ऐकूं द्याना.''

''मी विरुद्ध आहे.''

आम्ही आणखी कांहीं ऐकायला थांबलों नाहीं. आईनें मला घरीं म्हणजे पाटणकरांच्या बिऱ्हाडीं पाठविलें व ती मटंग्यांना घेऊन मिस हार्वे बाईकडे गेली.

आईला पाहून मिस हार्वेला फार आनंद वाटला. पण आईला औपचारिकपणा कांहीं ठाऊक नसल्यानें कुशल प्रश्न वगैरे सारें बाजूला ठेवून तिनें सरळ सरळ सवालास सुरवात

केली.

''आई, मी हिंदु असतांना तुम्ही टिळकांबरोबर जलालपुरास आलां होता आठवतें ना?''

आईला (मिस हार्वेला) तें चांगलें आठवत होतें. त्यांनीं आपली डायरी काढून तारीख सुद्धां सांगितली. *

''हं त्या वेळची एक आठवण देतें. मी नवऱ्याकडे आलें तर तुम्ही मला दहा रुपये महिना देणार होतां. आठवतें ना ! आतां मी तें कर्ज मागायाला आलें आहें. मला आतां दहा रुपये नकोत पण घर पाहिजे. मी भाडें देईन पण आत्तांच्या आत्तां मला घर पाहिजे.''

''पण लक्ष्मीबाई. माझ्या ताब्यांत तुम्हांला देण्यासारखें घर नाहीं''

''तें कांहीं मला ठाऊक नाही. नाहींतर मी येथेंच सारें बिऱ्हाड घेऊन येतें. मला तुम्ही घर देईपर्यंत येथून हालणार नाहीं.''

मिस हार्वे लोकांच्या अडीअडचणींना इतक्या उपयोगी पडत कीं नाशकांत त्यांची ''आई'' म्हणून प्रसिद्धी होती.

दोन्ही हातांनीं आपलें डोकें गच्च दाबून म्हातारी बसली. शेवटीं बऱ्याच वेळानें मान वर करून ती म्हणाली.

''लक्ष्मीबाई ! एक अगदीं लहानसें घर देतें मी तुम्हांला. पण तें भाड्यानें देण्याचा मला हक्क नाहीं. तुम्ही दुसऱ्या घराच्या शोधांत राहिलें पाहिजे. भाडें काय द्याल?''

''तुम्ही सांगाल तें.''

''दहा रुपये देतां येतील तुम्हांला?''

''हो अगदीं मोठ्या आनंदानें दहा रुपये देईन.''

''आई'' नें पोलवर्थ होममधील मेट्रनचें घर द्यायचें ठरविलें व किल्ली आईच्या स्वाधीन केली. घर पाहून संध्याकाळी काय तें कळवायाचें ठरवून आई मंटग्यासह तेथून निघाली. घरीं पोंचतांच तोच टांगा घेऊन मटंगे रूथच्या शाळेंत गेले व तिला घर पहाण्यासाठीं घेऊन आले. रूथनें आपल्या पसंतीचा शिक्कामोर्तब करून ती परत शाळेंत गेली.

इकडे आईनें दोन बैलगाड्या केल्या. त्यांत सारें सामान भरलें. पोरेंहि बैलगाड्यांत

* (ता. १५ डिसेंबर, १८९८ रोजी मिस हार्वे टिळकांसह जलालपुरास आल्या होत्या.)

बसविलीं. गाड्या पोलवर्थ होमकडे निघाल्या. पदराखाली मुलांचा पॉट घेऊन आई मागें चालूं लागली. गाडीवाले म्हणत, ''आजीबाई तुम्ही कां नाहीं बसत?'' आई म्हणे, ''अरे, मी सोंवळ्यांत आहे.'' रस्त्यानें कोणीं भेटले म्हणजे विचारीत, ''मनुमावशी, पदराखालीं काय आहे?'' ती म्हणे, ''आहे रे माझें सोंवळ्याचें.'' दुसरे कोणी विचारीत, ''मावशी, तुमच्यांतहि सोंवळें असतें?'' ती म्हणे, ''काय कडक सोंवळें आमचें !'' इकडे माझी हंसून हंसून मुरकुंड वळे.

अशा रीतीनें १९२४ सालीं आम्हांला त्या नाशकांत कोठें थारा मिळत नव्हता तो एकदाचा रक्तपित्यांच्या मुलींच्या बोर्डिंगमध्यें मिळाला.

पण पुढें सात आठ वर्षांत आमचा येथें चांगला जम बसून आईच्या डोळ्यांदेखत आमचें स्वतःचें घर झालें.*

घर बांधायच्या वर्ष दोन वर्षें आधीं एक दिवस आई मुलांना घेऊन आग्रारोडनें फिरायाला गेली. तेथें अतिशय गर्दी व गाडीघोडेहि त्या गर्दींत भरपूर. एक गाडी अशीच वाटतें जोरांत येत असतां नाना धावपळींत पडला. आई तेथेंच वडाच्या झाडाखाली मुलांना घेऊन बसली. तिच्या डोक्यांत विचार घोळत होते. येथेंच आपल्याला जागा मिळेल. दत्तूनें येथें जर घर बांधलें तर किती छान होईल. अर्थात् ही तिची कल्पना सत्यस्वरूप बनणें अशक्यच होते; कारण ती गोल्फ ग्राउंड होती. पण तिला आपलें तसें वाटलें. तिनें बसल्या बसल्या त्या ठिकाणीं घर असल्याची जागेपणाची स्वप्नें पाहिली व प्रार्थनाहि केली कीं ''देवा बापा त्या कल्पनेला मूर्त स्वरूप येऊं दे.''

ही गोष्ट आईनें घरीं आल्यावर आम्हांला सांगितली मग आम्ही ती सर्व विसरून गेलों.

पुढें आई मुंबईस गेली. नंतर वाईस जाऊन मिसेस ह्यूमजवळ राहिली. ती परत आल्यावर तिला जेव्हां घराची जागा दाखविली तेव्हां ती म्हणाली, ''अरे हीच ती जागा-येथेंच मीं बसून प्रार्थना केली होती !''

० ० ० ०

पुष्कळ दिवसांपासून वडिलांचें मराठींत चिरित्र लिहिण्याचें माझ्या मनांत होतें व त्याची हळूहळू मी तयारी करीत होतों. त्यांतच आईलाहि मीं आपल्या आठवणी लिहिण्यास सांगितलें होतें. मुंबईस गेल्यानंतर तिनें त्या लिहिण्यास सुरुवात केली. त्याच वेळी तिनें आपल्या कविताहि एकत्र करून ठेवल्या व पुष्कळशा नवीन कविता लिहिल्या. आम्ही

* (शांतिसदन, २९ मे १९३२)

महाबळेश्वराहून परत आल्यानंतर आईहि बेबीकडून परत आली. बरोबर तिनें आपल्या आयुष्यांतील बऱ्याच आठवणी लिहून आणल्या होत्या. त्या वाचून आम्हांला मोठा आनंद वाटे, पण त्या प्रसिद्ध करण्याची मात्र कोणालाच कल्पना सुचली नाहीं. माझे मित्र पाटणकर यांचें पहिलें कुटुंब भयंकर अपघाताला बळी पडल्यानंतर दुसऱ्या वर्षी त्यांचें दुसरें लग्न झालें. पाटणकरांचे श्वशुर प.वा.श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांची व आमची ओळख झाली. त्यांची आईची पुष्कळशा स्वभावसादृश्यामुळें बरीच गट्टी जमली. एक दिवस पाटणकरांनीं आपल्या काकूंचें कौतुक तात्यासाहेबांजवळ करतांना ही आठवणींची गोष्ट निघाली व तात्या साहेबांना आईच्या आठवणी वाचून दाखविण्यांत आल्या व त्यांच्याच सूचनेवरून व उत्तेजनानें त्या होत्या तशाच छापण्याचें ठरलें. अशा रीतीनें स्मृतिचित्रांचा जन्म झाला.

पपा ख्रिस्ती झाले त्या वेळीं आईवर जो प्रसंग आला होता तसाच पुन्हां एकदा आमच्यावर आला. तो प्रसंग म्हणजे बेबीचें लग्न. धर्मान्तराचा आमच्या मनाला कांहीं बाऊ वाटत नव्हता. आमचें दोघांचें अगदीं स्पष्ट मत होतें कीं, धर्माच्या बाबतींत प्रत्येकाला पूर्ण स्वातंत्र्य असावें व धर्मान्तरामुळें कोणी कोणाला परकें बनण्याचें कारण नाहीं. पण आमच्या नशिबीं निराळीच गोष्ट होती. आमच्यावर आलेल्या ह्या प्रसंगानें आमचे दोघांचे हातपाय लुळे पडल्यासारखे झाले. कित्येक दिवस दोघांच्याहि हातून कांहींच काम होत नव्हतें. पण परमेश्वरी योजना अगाध असतात. ह्याहि प्रसंगांतून जी एक घटना घडली तिचें वर्णन आईच्याच शब्दांत खालीं देत आहे.

''मनाचा खंबीरपणा व देवाचा आशीर्वाद. मीं स्मृतिचित्रें लिहिण्यास घेतलीं. त्याचे अर्धेमुर्धे दोन भाग लिहून होतात न होतात तोंच मजवर अकस्मात् एक आपत्ति आली. मी व दत्तू हतबुद्ध झालों. ती आपत्ति म्हणजे माझ्या मुलीनें दुसऱ्या समाजांत जाऊन लग्न केलें, त्याला कारण तिच्या नवऱ्याचें [१] पहिलें लग्न झालेलें होतें. ख्रिस्ती धर्मांत ज्याची बायको किंवा जिचा पहिला नवरा जिवंत असेल तर त्याचें किंवा तिचें पुन्हां लग्न लावण्यास कोणी तयार होत नाहीं. लग्न लावण्यास व तें लावणारास शिक्षा होते. त्या कारणानें ह्या गृहस्थानें दुसऱ्या समाजांत जाऊन आपला कार्यभाग उरकून घेतला. ही खबर जेव्हां वर्तमानपत्रद्वारें समजली त्या वेळेस आम्हीं दोघेंहि मनाच्या अस्वस्थतेनें किंकर्तव्य असे बनलों. मी तर जवळ जवळ दोन महिने तापानें पडलें. होतें. या वेळेस मी एकसारखी माडीवरच राही, माझीं सर्व आन्हिकें वरच उरकत, माझ्या सुनेनें व मुलानें जें जें मला लागें तें तें सर्व मला बसल्या जागीं पुरविलें. त्या वेळेस मला बरीच सुखासमाधानाचीं पत्रें आलीं. जीं जीं पत्रें येत तीं तीं दत्तू मला वाचून दाखवी. असेंच एक दिवस थोरातांचे [२] पत्र आलें. त्याचा आशय

१. हेमचंद्र जोशी २. रे.सु.ना.थोरात

असा होता कीं, ''टिळक म्हणत माझ्यामागे माझी मुलगी हें राहिलेले ख्रिस्तायन पुरें करील. तें हें मुलीने पुरें केले.'' तें पत्र दत्तूनें मला दिलें. तें वाचून मला मागच्या पुढच्या स्मृति झाल्या. त्यामुळें मन फारच व्यग्र झालें. काय करावे व काय बोलावे ते समजेना, वेड लागण्याची पाळी आली.

मनाचा धडा केला. आतां जीव जावो अथवा राहो. ख्रिस्तायन पुरें करावयाचे. गुडघे टेंकले. प्रार्थना केली. देवाला वचन दिलें. जे होईल तें होवो मी आजपासून कविता करणें, कोणाला पत्रें लिहिणें, इतर वाचन, कोणच्या भेटी घेणें, शरीराच्या रोगांचें चिंतन, मुलाची काळजी, वायफळ गोष्टी किंवा ही स्मृतिचित्रें * कांहीं कांही करणार नाहीं. देवा हा बघ टांक हातीं घेत आहें. तुला हवें तर तूं आपल्या गौरवाकरितां करून घे. नाहीतर माझा अंत ह्यांतच होऊं दे.''

मी प्रार्थना करून टिळकांनीं जें ख्रिस्तायन लिहिलें होतें व त्यांच्यामागें दत्तूनें जे साडे दहा अध्याय छापले होते ते वाचण्यास घेतले. त्यांचा राहिलेला अकरावा अध्याय मीं पुरा केला. दत्तूनें तो वाचला. तो त्याला आवडला. तो म्हणूं लागला, ''मीं हा ज्ञानोदयांत छापतो.'' नको. अजून माझ्या हातून हें होईल अशी खात्री नाहीं.''

आईचा ख्रिस्तायन लिहिण्याचा निश्चय पाहून मला समाधान वाटलें. आतां तिच्या मनाला थोडा विरंगुळा पडेल व तिला बरें वाटेल असें वाटलें. डॉ.ह्यूम अमेरिकेंत असतांना वारले. त्यांच्या अस्थि नगरच्या कबरस्थानांत आणून ठेवल्या. योगायोग असा कीं त्या टिळकांच्या जवळच ठेवण्यांत आल्या. डॉ.ह्यूमच्या पत्नी मिसेस केटीबाई ह्यूम ह्या आईला बहिणीप्रमाणें मानीत. त्यांना मी आईसंबंधानें पत्र लिहिलें त्यांत ख्रिस्तायनाचाहि उल्लेख होता. मिसेस ह्यूम वाईस आपल्या मुलाजवळ येऊन राहिल्या होत्या. त्यांनी आईला वाईला बोलावलें व तेथें तिची सर्व व्यवस्था करून दिली. एखाद्या आईनें आपल्या नादी मुलीची व्यवस्था ठेवावी तशी त्यांनी आईची व्यवस्था ठेवली होती. तेथें तिचें खूपच काम झालें. सकाळीं ती जी स्वतःला एका खोलीत बंद करून घेई ती दुपारी बाहेर पडे. मग पुन्हां जी बसे ती अगदी अंधार पडेपर्यंत. अशा रीतीनें तिनें आपल्या पतीचें अर्धवट राहिलेलें काम पुरें केलें. मिसेस ह्यूम तिला म्हणत, ''लक्ष्मीबाई तुम्ही लिहा, छापण्याविषयी अगदीं काळजी करू नका. परमेश्वर ती सारी व्यवस्था करील.'' आणि त्या माउलीनें मृत्यूपूर्वी आपल्या खाजगी पैशांतून बरीचशी रक्कम ख्रिस्तायनासाठीं देण्याची व्यवस्था करून ठेवली.

० ० ० ०

* (एक लहानशी चूक—त्या काळी 'स्मृतिचित्रें' हे नांव दिलेले नव्हतें लक्ष्मीबाई लिहीत होत्या त्या 'आठवणी')

नाशकास सन १९३३ साली डॉ.माधवराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखालीं कविसंमेलन भरविण्यांत आलें होतें. आईची कांहीं कांहीं मासिकांद्वारें कवयित्री म्हणून प्रसिद्धी होती. कांहीं कांहीं ख्रिस्ती सभांतून तिनें आपलें वक्तृत्व दाखविलेलें होतें. समाजसेविका म्हणून तिची प्रसिद्धी न बोलणाऱ्या जनतेनें आयुष्यभर केलेली होती. परंतु ह्या कोणत्याहि गोष्टींनी तिची प्रसिद्धी झाली नव्हती इतकी प्रसिद्धी ह्या कविसंमेलनांत केलेल्या स्वागताध्यक्षीय भाषणानें एकदम झाली. १९३३ साली झालेलें कविसंमेलन व त्यांतील ते भाषण, १९३४ सालचें नागपूरचें ख्रिस्ती साहित्यसंमेलनांतील भाषण, १९३५[×] सालांत प्रसिद्ध झालेले * स्मृतिचित्राचे भाग, १९३५ च्या शेवटीं झालेला तिचा सत्कार-समारंभ व १९३६ सालांतील तिचा आजार ह्यांनी तिच्या आयुंष्यांतील शेवटलीं चार वर्षे अत्यंत महत्त्वाचीं ठरतील.

कविसंमेलनांत ती जेव्हां आपलें अस्खलित भाषण करूं लागली तेव्हां नाशकांतील कितीतरी साहित्यिक आश्चर्यचकित होऊन गेले. भाषण संपल्यावर कित्येकांनी मुद्दाम येऊन माझें अभिनंदन केलें. मुलांनीं कांहीं पराक्रम गाजविला म्हणजे आई-बापांचे अभिनंदन करण्यांत आलेलें माहीत होतें. परंतु असा प्रसंग फारच थोड्या मुलांना अनुभवण्यास मिळाला असेल.

हें भाषण आपल्या वाङ्मय मासिकांत छापून नंतर ते पुस्तकरूपाने रा.निफाडकरांनी प्रसिद्ध केलें. तें फुकट वाटलें. त्या वेळीं '' तुम्हि कवी भिकारिण मी हो तुमच्या दारी असें म्हणणारीस '' ही टिळकांची कविता छापून शेवटी रा. निफाडकरांनी म्हटलें होतें,

''सदरची कविता म्हणजे एकप्रकारची, रे.टिळकांची भविष्यवाणीच ठरली. जळगांवच्या महाराष्ट्रकविसंमेलनांत, वरील मथळ्याची कविता, श्री.लक्ष्मीबाई टिळकांनीं पाठविली होती. तिचें उत्तर म्हणून नारायणरावजींनी ही जी कविता केली आहे, तींतली वाणी इतक्या वर्षांनंतर तंतोतंत खरी ठरलेली पाहून कोणास विस्मयानंद होणार नाहीं ?''

वरील भाषण आईनें कागद एकदाहि न उघडतां अस्खलितपणें कोठें स्त्रीवक्त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें तें पुळुपुळु किंवा हळूहळू नसून अगदीं खणखणीत होतें. व सर्वांना आश्र्चर्य वाटलें तें ह्याचेंच.

कविसंमेलनाचा शेवटला कार्यक्रम काव्यगायनाचा होता. थिएटर चिक्कार भरलें होतें. व हळूहळू लोक अतिशय गडबड करूं लागलें. अमूक एका कवीनेंच म्हणावें दुसऱ्यांनीं तोंडहि उघडूं नये असा लोकांनी आग्रह सुरू केला कार्यकारी मंडळानें होतां होईल तों प्रत्येक कवीला आपली एक एक कविता म्हणण्याचा प्रसंग द्यावयाचें ठरविलें होतें. एका

× (१९३४-३५)
* नागपूरचे ख्रिस्ती साहित्य संमेलन १९३३ डिसेंबर मध्यें झालें

हायस्कूलच्या मुलानेंहि १ त्यांत आपली वर्णी लावून घेतली होती. पण त्याचें कोणी ऐकून घेईना. मुलाचा आवाज कोता, त्यांत तो घाबरलेला. शेवटीं आईला राहवेना. ती स्टेजवर येऊन उभी राहिली. त्या एवढ्या मोठ्या श्रोतृसमूहापुढें, त्या साऱ्या गोंगाटाला मागें सारणाऱ्या खणखणीत आवाजांत तिनें जे चार शब्द सांगितले ते इतके परिणामकारी झाले, कीं नंतर शेवटपर्यंत टांचणी पडली असती तर तिचा आवाज स्पष्ट ऐकूं आला असता इतकी शान्तता राहिली. *

कविसंमेलनानंतर आईनें आपले लेखन व वाचन पुन्हां जोरांत सुरू केलें. तिचें बहुतेंक लक्ष आतां ख्रिस्तायनांत गुंतलें होतें व त्यांत होतां होईल तो व्यत्यय येऊं नये अशी तिची खटपट असे. इतक्यांत माझ्यापुढें अवघड प्रश्न येऊन पडला. निपाणीस ख्रिस्ती साहित्यसंमेलनाचा मी अध्यक्ष होतों. त्यानंतरचें संमेलन नागपूरच्या ख्रिस्ती लोकांनीं भरविण्याचें ठरविलें. पण त्यांना कोणी अध्यक्ष मिळेना-किंवा त्यांना मीच अध्यक्ष पाहिजे होतों. त्यांची पत्रांवर पत्रें व तारांवर तारा येऊं लागल्या, मला पुन्हां लागोपाठ दुसऱ्याच वर्षी तें अध्यक्षस्थान स्वीकारणें अशक्य होतें; तेव्हां मी आईला माझी अडचण सांगितली. पाटणकर नेहमीप्रमाणें आमच्या साहाय्याला ह्याहि वेळेस धांवून आले व त्यांनीं सुचविलें कीं, आईनेंच अध्यक्ष व्हावें. ही सूचना नागपूरच्या मंडळीला पसंत पडली व आईच्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणे तिला नाहीं म्हणणे कठीण असल्यानें संमेलनाचें अध्यक्षीय भाषण लिहिण्यास तिनें ताबडतोब सुरुवात केली. *

१. मल्हार गोविंद (नाना) मोडक

* (नवनवीन कविजनांना प्रोत्साहन देण्याचा आणखी एक प्रसंग म्हणजे, त्या काळच्या उगवत्या कवयित्री कु. संजीवनी मराठे यांचा लक्ष्मीबाईनी आपल्या स्वागताधयक्षीय आसनावरून उठून छोटेसे समयोचित भाषण करून व हार घालून सत्कार केला होता. -अदे.)

(१८९४ नंतर १९३३ मध्यें लक्ष्मीबाईंना नागपुरास भेट देण्याचा असा योग आला. भाषणांत त्यांनी म्हटलें—'' चाळीस वर्षापूर्वीची गोष्ट. टिळक ख्रिस्ती होण्यासाठीं नागपूर सोडून मुंबईला गेले. मी माझ्या मुलाला कांखोटीला मारून नागपूराहून निघून नाशीकचा रस्ता धरला. ह्या दीर्घ कलानंतर आज त्याच मुलांनें मला हात धरून नागपुंरास आणले आहे.'')

* परिशिष्ट २ पहा

— १३ —

# आई आणि आजी

आईला औरस पुत्र एकच असला तरी मानस-संतति अगणित होती व ह्या कन्यापुत्रांचे पुत्रपौत्रादिक सगळेच तिचे जवळचे नातेवाईक होते. कित्येक वेळेस तर तिच्या औरस पुत्रानेंहि केलें नाही इतकें कौतुक तिच्या मानसपुत्रांनीं व मानसकन्यांनीं केलें आहे.

शेवटीं शेवटीं तिला नाशकास कुंतीपद प्राप्त झाले होतें. येथील शेवटल्या पांच वर्षांतील पांच पुत्र येणेप्रमाणें होते. रावबहादूर बंडेकर[१] हे धर्मराज, ह्यांना आम्ही आमच्या बोलण्यांत व विशेषतः आईशीं बोलायचे झालें म्हणजे दादा म्हणत असूं दुसरा मी. तिसरे चिरंजीव पाटणकर, चौथे सोपानदेव चौधरी व पांचवे म्हातारपणचें तान्हें नि आक्राळविक्राळवाणे भाऊराव गायकवाड[२] भाऊराव येथील हरिजन पुढारी. राममंदिर सत्याग्रहांत पुढाकार सगळा त्यांचा. मार खाण्यांतहि त्यांना पुढारीपण लाभलेलें. आई त्यांना म्हणे, ''बाबा रे, तूं माझें म्हातारपणचें तान्हें नि आक्राळविक्राळवाणें आहेस.''

तिकडे मंदिर-सत्याग्रह चाले व इकडे आई घरांत काळजी करीत बसे.

दारावरून महारवाड्याकडे जाण्याचा रस्ता होता. तिकडून एखादी महारीण बाई जातांना दिसली, कीं आईनें तिला थांबवून हकिगत विचारावी. तिनें हटकून कांहींतरी भयंकर सांगावें कीं लागलीच आईची मान हालायला लागावी. मी म्हणे, ''आई, तूं घरांतल्या काळज्या करीत बसतेस तेवढ्या पुरें नाहींत का ? साऱ्या जगाच्या काळज्या करून असला काळजीचा डोंगर डोक्यावर घेतेस म्हणूनच हें तुझे डोके असे डगडग हालतें.'' पण माझ्या त्या बोलण्याचा कांहीं उपयोग होणें शक्यच नव्हतें. आईची 'सासूरवासी' म्हणून कविता आहे. तीत तिने आपल्या ह्या चिंतारूपी नणंदेचा व ममतारूपी सासूचा मोठा खुबीदार उल्लेख केला आहे.

( **चाल**—भक्ति ग वेणी )

**सासुरवासी । मी जन्मापासुन ऐशी-१**

**घोंर सासरा माझा भारी**

**घेउन बडगा बसला दारीं**

**निघूं देइना मज बाहेरी**

**सासुरवासी । मी जन्मापासुन ऐशी-१**

१. दिवाणबहादुर रामचंद्र विठ्ठल बंडेकर    २. खासदार पद्मश्री दादासाहेब गायकवाड

**ममता सासू मजला ठळिते**

**जागोंजागी मजला खिळिते**

**इकडुन तिकडे मी नच हलतें**

**माझ्यामागें ती येते वेगें वेगें**

०००० 

**नणंद माझी सानच बाई**

**मजला केव्हां सोडित नाहीं**

**किती जरी मी हकलुन देई**

**चिंता चतुर ! चालते कशी तुरतूर-५**

राममंदिर सत्यागहास पुढें पुढें उग्रतर स्वरूप यायला लागले. राममंदिर बंद झालें. आंतून कुलपें लागली. त्या वेळीं आईची खालील कविता 'पतित पावन' पत्रांत ७ मार्च १९३१ च्या अंकांत प्रसिद्ध झाली.

**रामासि बाट नाहीं**

खालीं दिलेली कविता एका अस्पृश्य भगिनीनें प्रसिद्धसाठी पाठविलेली आहे. तिला आम्ही मोठ्या आनंदानें प्रसिद्धी देतों.

.—सं. पतितपावन.

**वाल्ह्यास मुनि बनाया । लावीति रामराया ।**

**जिव्हाग्रीं राम राही । रामासि बाट नाहीं ।।**

**बैरीण कैकयी ती । मातेसमान मानी ।**

**घे राज्य तीस बाहीं । रामास बाट नाहीं ।।**

**सोडोनी आर्य बंधू । स्वीकार करि जगाचा ।**

**वनवास भोग देहीं । रामास बाट नाहीं ।।**

**बदरीफळांस चाखी । शबरी, प्रभूस अर्पी ।**

**सानंद तीहि खाई । रामास बाट नाहीं ।।**

**हनुमान तोहि खपला । का बाट मानवाला ।**

**तो राम सर्व देही । रामास बाट नाहीं ।।**

**लंकेश-गेहिं राही। सीतेस बाट नाहीं।**
**रामास बाट काई। रामास बाट नाहीं।।**
**जो जाहला जगाचा। त्या कासया छळीतां**
**कां टाकितां तयाला। बंदींत भक्त बोला।**
**बाटास वाट द्या रे। एकत्र होउं सारे।**
**स्वातंत्र्य भारतांत। द्या घ्या हातांत हात।।**

येथें अस्पृश्यांतील एक कवि **रोकडे**[१] **म्हणून** आहेत. ते लिहितात— ''मी माझ्या आईच्या प्रेमाला थोडक्याच दिवसांमागें आंचवलों होतों. पण हा खरा प्रेमाचा जिव्हाळा पाहून खरोखरच आनंद वाटे. एक दिवस मी माझा **नाशीक** सत्याग्रहाचा पोवाडा त्यांना म्हणून दाखवीत असतां तो प्रसंग त्यांच्या डोळ्यांपुढें उभा राहिला व त्या **म्हणाल्या, ''रोकडे** ज्या दिवशीं तुमची मिरवणूक आमच्या दारावरून गेली त्या वेळी ही असली अमोल रत्नें आज सनातन्यांच्या कसोटीकरतां जात आहेत; पण ह्यांचे काय होईल कांहीं कळत नाहीं असे वाटून मी बेचैन झालें व दिवसभर माझ्या डोळ्यांचे पाणी खळले नाहीं व जेवणसुद्धा गोड लागले **नाहीं.''** असें बोलतां बोलतां त्यांचे डोळे खरोखरच पाण्यानें भरून आलें. त्या गद्‌गदित अंतःकरणाने पुढें म्हणाल्या, ''तुम्हांला समान हक्क प्राप्त होतील तो दिवस हिंदुस्थानच्या भाग्याचा. तो दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा होईल. त्या रात्रीं मी भाऊला[२] विचारलें कीं काय हकीगत झालीं. त्यानें मला सर्व सांगितल्यावर मी तांगा करून सत्याग्रह आश्रमांत गेले. व तेथें जाऊन गायकवाड, डॉ.आंबेडकर वगैरे मंडळीला मीं जेव्हां डोळ्यांनी पाहिलें तेव्हां मला समाधान वाटलें.''

० ० ० ०

दादांचे माझे फारसें पटत नसे. ह्याचें कारण स्थानिक राजकारण. एकदा स्कूलबोर्डाच्या नॉमिनेशनची धावपळ चालली होती. मी नॉमिनेशनमध्यें खात्रीनें येणार असे मला वाटत होते. पण नॉमिनेशने आलीं व त्यांत मी व माझी मित्रमंडळी गळलेली आढळून आली. थोड्या वेळानें एक गृहस्थ येऊन सांगू लागले कीं, रावबहादुरांनी मिनिस्टरला तुमच्याविरुद्ध पुष्कळ कांहीं कांहीं सांगितलें. मी दादांवर खूप रागावलों होतों. पुढें ते खोटें असल्याचें रावबहादुरांनीं सांगितलें. पण त्या वेळीं त्यामुळें घरांत येऊन आईशींहि मी तंटा केला.

''हे पहा तुझे वडील चिरंजीव.''

१. दगडू गंगाराम रोकडे रा. नांदूर-वैद्य. शीघ्रकवि म्हणून यांची प्रसिद्धी होती.
२. दे.ना.टिळक

''अरे असें चालायचेंच, भावाभावांचें कुठें बनत असतें का ?''

मी कांही बोललों नाहीं पण आईचा मला फारच राग आला. हिला काय माहीत ह्या नॉमिनेशननें आमचें केवढें नुकसान झालें आहे ! त्या दिवशीं आईला बरें नव्हतें. रावबहादुरांचा माणूस आला. तो आला म्हणजे थेट खिडकीशीं जाऊन आईशीं बोले. तसा तो जाऊं लागला. मी त्याला परत लावला. म्हटलें, ''आई आजारी आहे. जाऊं नकों तिकडे.'' पण ही गडबड ऐकून ती बाहेर आली व त्याच्याशीं बोलूं लागली. रावबहादुरीणबाईनीं बोलावलें होतें. आई तशीच चालूं लागली. मला नुसती चीड आली. संध्याकाळीं बऱ्याच वेळानें ती परत आली. मी तिच्याशीं कांहीं बोललों नाहीं. तीहि माझ्याशीं बोलली नाहीं. रात्रीं अडीचच्या सुमाराला दाराशीं कोणी हांका मारूं लागले. मी माडीवर निजत असे. आई खाली निजे. मी वरून विचारलें, ''कोण आहे ?''

''मी रावबहादुरांचा ड्रायव्हर.''

मला फार घुस्सा आला.

''कशाला आलास ?''

''आजीबाईंना बोलवायला.''

माझा घुस्सा दसपट वाढला. हा माणूस मिनिस्टरला माझ्याबद्दल वेडेंवांकडें कांही सांगतो आणि इकडे आईला सत्तेनें वाटेल तेव्हां बोलावून नेतो म्हणजे काय? मीं ओरडून सांगितलें,''आई येत नाहीं.'' बत्ती विझवली व मी अंथरुणावर जाऊन पडलों, पण झोंप येईना. तसाच उठून खालीं आलों. म्हटलें आईला खूप बोलावें. पण खाली येऊन पहातों तों आई कोठें होती अंथरुणावर? ती येत नाहीं असें मीं सागतांच मी ज्या झटक्यानें आंत जाऊन पडलों होतों त्याच झटक्यानें ती उठून बाहेर रावबहादुरांच्या मोटारींत जाऊन बसली होती. माझें तोंड गोरेंमोरें झालें. सकाळीं उन्हें पडल्यावर आई दवाखान्यांतून आली.

''दत्तू ! बरं झालं मी गेलें. तेथें माझ्यावांचून दाद लागली नसती. मुलगी झाली ! मुलीची त्यांना हौस होती.''

माझें तणतणणें तिच्या जसें कांहीं ध्यानींमनींहि नव्हतें. आईच्या त्या बोलण्यानें मला माझ्या क्षुद्रवृत्तीबद्दल लाज वाटली. त्यानंतर मात्र मी तिला आमच्या दादांच्याबद्दल कधी कांहीं बोललों नाही.

* * *

आम्ही आमच्या सत्तेच्या घरांत येण्यापूर्वीं ज्या घरांत राहत होतों त्याच्या मागें थोड्या अंतरावर एक लहानसा मांगवाडा होता. ह्या लोकांच्या झोंपड्या अतिशय लहान, ओल

आलेल्या व दाट वस्तीच्या असत. त्यांना जवळ पायखाना नव्हता. त्यांची ती परिस्थिति पाहून आईचें मन फार कळवळे. ती त्यांच्या झोंपड्यांत जाई. तेथें त्यांना लिहायाला वाचायला शिकवी.

तेथें शिकवितां शिकवितां एखादे वेळेस तिचें पोट दुखूं लागे. हो पोटदुखीचा आजार माझ्या जन्मापासून तिला लागला होता. पोट दुखणें एखादे वेळेस असह्य होई. पण कधींहि तिला विचारलें कसें वाटतें तर ती बरें आहे आतां असें हटकून म्हणायची. मांगाच्या वस्तींत पोट दुखायाला लागलें कीं त्यांनी आपली खाट टाकून द्यावी, खालीं तव्यावर चार निखारे ठेवावें, व तिच्या खाटेभोंवती तिच्या वृद्ध तरुण विद्यार्थ्यांनीं बसून धडे घ्यावे. मांगाचीं लहान लहान मुलें तिला आजाबाया म्हणत. आजीबाई ह्याचें सन्मानार्थी आजाबाया हें रूप बनविण्यांत आलें होतें. ती रस्त्यानें कोठें दिसली कीं मुलांनीं आजाबाया म्हणून हांक मारून आपण जवळ असल्याची सूचना द्यावी व तिचे दोन शब्द कानी पडले म्हणजे मग मोठ्या आनंदानें पळत जावें.

आईसंबंधीं भाऊराव गायकवाड लिहितात—

''श्रीयुत टिळक वकील हे सार्वजनिक कार्यांत जसजसे अधिक पडूं लागले तसतसे त्यांच्या व माझ्यामधील संबंध अधिक जिव्हाळ्याचे होऊं लागले. त्याच वेळेस माझी व आईची अधिक ओळख झाली. अस्पृश्य मानलेल्या समाजाच्या उन्नतीविषयी काय करायाचें व कसें करायाचें याबाबत मी वारंवार आईचा सल्ला घेऊं लागलों. समाजसुधारणेबाबत माझी आई मला तासचे तास धडे देत असे. त्याच दरम्यान मी नाशीक म्युनिसिपालिटीमध्यें कौन्सिलर होतों. आई ज्या भागांत रहात असे त्याच भागांत मांग लोकांची वस्ती होती. ह्या लोकांकरतां संडासाची कांहींच सोय नव्हती. त्या प्रश्नास आईनें हात घातला. सर्व मांग लोकांच्या सह्यांचा अर्ज करून तो मजकडेस देऊन मांग लोकांच्या संडासाचें टुमणें तिनें माझ्या मागें लावलें. पण कांहीं केलें तरी म्युनिसिपालिटीची कामें हीं अत्यंत दिरंगाईनें व्हायचीं हे ठरलेलें.पण आई मला भेटेल तेथें मांग लोकांच्या संडासाचें काय केलेस म्हणून विचारी. शेवटीं शेवटीं टिळकांकडे कितीहि जरूरीचें काम असलें की आईचा हा प्रश्न डोळ्यापुढें उभा राही व त्यांच्याकडे जाण्याची मला भीति वाटे. जळीं स्थळीं काष्टीं आईनें माझ्या डोळ्यांपुढें मांग लोकांचा पायखाना उभा करून दिला. शेवटीं एकदाचा तो पायखाना तयार झाला तेव्हां तिचें समाधान झालें.

नंतर नाशीकच्या हरिजन सेवक संघाच्या कार्यांत आई पडली. सर्वांवर सारखेंच प्रेम करणाऱ्या आईला ह्या संघाच्या बाहेर राहणें शक्यच नव्हतें. हरिजन-दिनानिमित्त इतरांबरोबर मानीव अस्पृश्यांच्या वस्तींत जाऊन ती साफ करणें, मुलांमुलींना न्हाऊं घालणें हीं कामेंहि

तिनें केलीं, पण ती मला म्हणे,''हे पहा गायकवाड, अस्पृश्य मानलेल्या वर्गाच्या कल्याणाकरितां व त्यांची अस्पृश्यता निवारण्याकरितां वर्षांतून एकदां हे दिवे धुण्याचें काम करून भागायाचें नाहीं. हिंदु लोकांत दिव्याच्या आवसेला वर्षांतून एकदां, सांदीकोपऱ्यांत पडलेले दिवे शोधून काढायाचे व घासायाचे तसें नाहीं उपयोगी. वर्षभर हरिजनांकडे ढुंकून पाहायचें नाहीं व वर्षांतून एकदा सर्वांनी इकडें धांव घ्यायची हें नाहीं मला पसंत.

माझ्याकडे कोणी बडी माणसें फराळास येणार असलीं कीं आईनें पाहुण्यासारखे बाहेर बसून न राहतां घरांत जाऊन माझ्या कुटुंबाकडून फराळाचें करून घ्यावें.''

आईच्या दुसऱ्या दोन पुत्रांविषयीं म्हणजे माझ्याविषयीं व प्रो. पाटणकरांविषयीं स्मृतिचित्रांत जागजागीं इतका मजकूर आईच्याच लेखणींतून उतरला आहे कीं त्यांत आणखी भर घालण्याचें कांहीं अगत्य नाहीं.

* * *

आतां शेवटल्या पुत्रासंबंधी थोडें सांगितलें पाहिजे. हे पुत्र म्हणजे कवि सोपानदेव चौधरी. चौधरी आमच्या शेजारींच रहायाला आले असल्यानें आईचें त्यांच्याकडे नेहमीं जाणें येणें होत असे. तेथें त्यांच्याकडे पुष्कळ वेळेला निरनिराळ्या साहित्यिकांच्या व तिच्या गांठी पडत. एकदा असेच एक साहित्यिक-कवि आले होते, सोपानदेवांनीं कविता रेकॉर्ड कराव्या असें ह्यांना वाटत होतें. तेव्हां ते तसा कांहीं प्रोग्राम ठरवून आले. सोपानदेव धाकटे बंधु. तेव्हां ते मजकडे सल्ल्यासाठीं व आईकडे आशीर्वादासाठीं रात्रींचे ह्या कविवर्यांना घेऊन आले. दुसऱ्या दिवशीं पहाटें मुंबईस जाण्यासाठीं निघावयाचें होतें. कविवर्य माझ्याकडे येण्यास फारसे खूष नव्हतें. ते म्हणत,''सोपानदेवांनीं मोबदल्याची अपेक्षा करूं नये. पहिलीच वेळ आहे. त्यांची किंमत जगाला कळली म्हणजे मोबदला आपोआप चालून येऊं लागेल.'' पण कवींनीं आपली किंमत दाखववावयाची असली तर मोबदला घेतलाच पाहिजे असें माझें म्हणणें होतें. आईला कांहीं माझा कायदेबाजपणा पसंत नव्हता. पण ती सोपानदेवांना म्हणाली,''दत्तू सांगेल तसें कर.'' शेवटी ते पाहुणे कविवर्य गरम होऊं लागले. तसें मीं त्यांना विचारलें,''का हो कविता तरी कोणकोणत्या म्हणायच्या ठरविलें आहे?'' त्यांनी दिलेल्या उत्तरानें मी गारच झालों. मला इतका वेळ वाटत होतें कीं सोपानदेवांनीं स्वतःच्या कविता म्हणायच्या. पण कविवर्य आले होते दुसराच बेत ठरवून. कविता म्हणायच्या होत्या त्यांच्या ! एखादी मेहरबानीनें सोपानदेवांना स्वतःची कविता म्हणण्याची ते परवानगी देणार होते ! हें मात्र मी कबूल केलें नाहीं. ''सोपानदेवांनीं स्वतःच्या चार कविता म्हणाव्या. दुसऱ्या कोणाच्या म्हणणें झालेंच तर स्वतःपेक्षां श्रेष्ठ कवींच्या म्हणाव्या.'' पण माझ्या ह्या विचारसरणीनें कविवर्य इतके तापले कीं सकाळच्या

गाडीचीहि त्यांनीं वाट पाहिली नाहीं. ते ताबडतोब परतले.

सोपानदेवांनीं नंतर ठरवूनच टाकलें, कीं कोणाचीहि कविता म्हणायाची नाहीं. ह्या कवीच्या कविता एकदा अशाच म्हटल्या होत्या त्यामुळें त्यांनीं पुढें ही व्यवस्था केली. सोपानदेवांचा हा निश्चय ऐकून आई म्हणाली,

''म्हणजे तूं माझ्याहि कविता म्हणणार नाहींस तर?''

ह्यावर सोपानदेव म्हणाले,

''आई वा असें कसें म्हणतां? तुम्हांला जर श्रेष्ठ कवयित्री म्हणायचें नाहीं तर कोणाला? आणि नसलां तरी तुम्ही आई आहां ना ! मी तुमच्या कविता जरूर रेकॉर्ड करणार.''

आईच्या मृत्यूनंतर सोपानदेवांना ह्या बोलण्याची आठवण झाली व त्यांनी आपलें म्हणणें खरें करून दाखविण्याचें ठरविले.*

* * *

मनी, मनुताई, आई व आजी इतक्या नांवानीं.[१] आपल्या आयुष्यांतील चार अवस्थांत आई ओळखली गेली. व प्रत्येक नांवाला तिनें शोभा आणली. आपल्या आयुष्यांतील शेवटलीं दहा वर्षें नाशकास ती संपूर्ण आजीबाई झाली होती. आई आम्हांला सोडून गेल्यानंतर येथील कवि कुसुमाग्रज ह्यांनीं तिच्या संबंधीं अगदी यथार्थ कविता लिहून पाठविली.—

**फुलें ताटवा कडेकडेला या जीवितमार्गी**
**प्रवासी मजसंगें कोण?**
**सहकारी जो करील अधिकच पथ हा सुखदायी**
**हसोनी आणिक हंसवून**
**फुलांमधें फुलपांखरुं होइल, होइल कोकिल वा**

* (पुढें लक्ष्मीबाईंच्या निधनानंतर एका बाजूस टिळकांची ''माझी ताई'' व दुसऱ्या बाजूस लक्ष्मीबाईंची ''मी तुझी मावशी—'' या दोन कविता रेकॉर्ड करून सोपानदेव चौधरींनीं आपला शब्द पुरा केला. )

१ (मावशी हें पांचवें नांव.)

**अशा उत्फुल्ल वसंतांत**

**हास्याच्या लहरी उठवोनि भरवि रागदारी**

**जीवनीं हर्षगीत गात**

**आणिक सरुनी वसंत, होतां पुढें वाळवंट**

**तरीही येइल मजसंगें**

**दिव्य दृष्टिला दिसतिल ज्याच्या क्षितिजावर तारा**

**ढगांच्या आवरणामागें**

**थकलेल्या जीवास जपोनी हळूं चालवील**

**दाटतां अंधारांत दिशा**

**ओजस्वी वाणीनें आणिल जीव निर्जिवाला**

**फुलविल पलिकडल्या आशा**

**वसंत असुं द्या असो हिंवाळा असो पावसाळा**

**लाभतां असला सहकारी**

**कसली खंती? निरोप नंतर भेट पुन्हां आणी**

**व्हायची देवाच्या दारीं**

मुलगी, बहीण, आई व आजी ह्या नात्यांनी आयुष्यभर तिनें जे भेटतील त्यांची करतां येईल ती सेवा केली. ती करीत असतांना उच्चनीचभावाचा तर प्रश्न उरत नसे, पण तिला चुकून कधीं किळस देखील आली नाहीं. टिळकांनीं म्हटल्याप्रमाणे ''ह्या सृष्टींतिल दिव्यपण तेंच तेंच हें मनुजपण'' असा तिचा पक्का विश्वास होता व आपला असा विश्वास आहे म्हणून आपण असें वागतों हें तिला ठाऊकसुद्धां नव्हतें. तें वागणें हा तिचा एक स्वभावच बनून गेला होता.

एकादे दिवशीं सकाळींच आई बाहेर पडायाची. घरांतील प्रत्येकजण कामांत गुंतलेलें असल्यानें दिवसभर तिची आठवण होत नसे. पण संध्याकाळ झाली, मग रात्र झाली, म्हणजे काळजी वाटायला लागे. तिकडे आई कोणा मावशीकडे नाहींतर आत्याकडे तिच्या कोणा नातलगाची कोणी मैत्रीण असलेली असेल तेथें बसलेली असायाची नाहींतर घरीं येण्यास निघतां निघतां वाटेंतच कोणाला ताप आलेला कळून परत फिरलेली असायची. पण तिला घरची काळजी मात्र अतिशय. घरीं आम्ही ताटकळून काळजी करीत बसलों असूं हें तिला माहीत असे व तशा स्थितींत कोणाला तरी दादापुता करून तिनें घरीं पाठवावें व आपण अमूक अमूक ठिकाणीं आहों काळजी करूं नका असा निरोप धाडावा.

माधव मनोहर आपल्या आठवणींत लिहितातः-

''श्री. टिळकांच्या समोरच माझे स्नेही प्रो.जोगळेकर राहतात. गेल्या सालीं कशानेंशा सौ.कमलाबाई जोगळेकर खूप आजारी होत्या. कोणतेंहि परिचयाचें माणूस आजारी आहे अशी नुसती ओझरती वार्ता आईंना कळायचा अवकाश कीं मग आईंना कांहीं क्षणभर घरीं स्वस्थ बसवत नसे. मग ती वेळ कशी व कोणतीहि असो आणि त्या आजारी माणसाचें घर कितीहि दूर असो. आई लगेच तेथपर्यंत तशा वेळीं पायीं चालत जायला निघायच्या. आई घरीं नसल्या कीं त्या कोणाच्या तरी समाचारासाठीं गेलेल्या असायच्या आणि मग काळवेळाचीं, थंडीवाऱ्याची, आपल्या स्वतःच्या उतारवयांतल्या सदारुग्ण परिस्थितीची यत्किंचित्‌हि पर्वा न करतां त्यांनीं त्या आजारी माणसाच्या शुश्रुषेला प्रारम्भ करावा. मग त्या आजारी माणसांचा रुग्णशय्येशेजारचें आईचें आसन किती तास व किती दिवस स्थिरावेल हें कांहीं कुणाला सांगतां येत नसे. सौ. कमलाबाई जोगळेकर आजारी आहेत असें कळल्याबरोबर स्वतः आजारी असूनसुद्धां आई त्यांच्या समाचारासाठीं आपल्या खोकल्यासह आल्या आणि लगेच झाला त्यांच्या शुश्रुषेला प्रारम्भ !''

एकदा भर बारा वाजतां शरणपूरच्या रस्त्यावर एका झाडाखाली आई जरा विसांवा घेतं असलेली तिकडून येणाऱ्या एका गृहस्थांच्या दृष्टीस पडली. ओचे खोवलेले, पायांत वाहणा, खांद्यावर पदर, हातांत एक हिरव्या कागदाची घडी, अशी आई तेथें सावलीला उभी राहिली होती. गृहस्थांनी विचारले, ''आजीबाई, तुम्ही इतक्या उन्हाच्या कुठें निघाला?''

''ह्या हिच्याकडे जाऊन येते. तिला सिनेमाची जाहिरात मिळत नाहीं. आमच्याकडे हे लोक आणून टाकतात. तिकडे नेऊन टाक म्हटलें तर अळम्‌टळम्‌ करतात.''

गृहस्थांनी जातां जातां मला ही गोष्ट येऊन सांगितली व मीं आईला छत्री पाठविली.

नाशीकच्या श्री.सौ.ताईसाहेब विंचूरकर म्हणतात, ''माझें त्यांचे आजीनातीचें नातें होतें. बहुतेक ठिकाणीं त्या आजीबाई म्हणून ओळखल्या जात होत्या व आमच्या स्त्री-मंडळाच्या पण त्या आजी होत्या.

त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळें त्या सर्वांना हव्याशा होत्या. त्यांना कोठेंहि जावयास मज्जाव नसे. गरीब, श्रीमंत, लहान, तरुण व वृद्ध अशा सर्व मंडळींना त्या प्रिय असत व जेथें जातील तेथें त्यांचें स्वागत होत असे.

त्यांच्या उपदेशाची मला आतां पावलोंपावलीं आठवण होते. त्या नेहमीं म्हणत, ''अग, दुसरे कसेहि वागले तरी आपण नेहमी त्यांच्याशीं चांगलें वागावें.''

महिना पंधरा दिवसांतून एकदा आपल्या इष्टमित्रांच्या घरीं जाऊन समाचार घेऊन आल्याशिवाय त्यांना बरें वाटत नसे. त्यांना नाती, लेकी, सुना ह्यांचे फार कौतुक असे. कांहीं नवीन घातलें किंवा घरांत पाहिलें कीं त्यांना आनंद होई व अत्यंत आपलेपणानें त्या चौकशी करून समाधान व्यक्त करीत. दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची तर त्यांना भारी हौस. कोणाला औषध करून दे, तर कोणाच्या घरीं सोबत निजावयास जा, आजाऱ्याच्या सोबतीला जा, तर कोणाला बाई (नोकर) पाहून दे असे अनेक व्याप त्यांच्या मागें सदा असावयाचेच. ऊन, पाऊस, तहान, भूक सर्व बाजूला ठेवून दुसऱ्याचीं कामें त्या फार आस्थेनें करीत.

आमच्या स्त्री मंडळाच्या सभेला त्या नेहमीं हजर असावयाच्या. त्यांना आमचा फार अभिमान असे. एकदा दुसऱ्या गांवच्या एक वयस्क बाई मंडळांत भाषण करावयास आल्या होत्या, व त्यांनी बोलतांना आम्हां तरुण स्त्रियांवर बरेच कोरडे ओढले. त्यांचें भाषण संपतांच आमच्या आजीबाई उठल्या व आवेशानें त्यांनी आमच्यावरील आक्षेप खोडून व सर्व मुली (बायका) खऱ्या आर्य स्त्रिया असून अत्यंत सुशील आहेत असें प्रतिपादन केलें. आजीबाईंनीं आमची बाजू घेतली तेव्हां आम्हांला किती आनंद झाला असेल बरें ! खऱ्या आपलेपणानें वागत असतां त्या आम्हांला परक्या कशा वाटतील? आमचें कोठें चुकलें तर मात्र आम्हांला त्यांचीं बोलणीं पण खावीं लागत असत.

एकदा सभेंत एका प्रोफेसरसाहेबांना व्याख्यान देण्याकरितां विनंती करावयास मंडळाच्या सेक्रेटरी विसरल्या. आतां काय करावयाचें? आयत्या वेळीं प्रोफेसर साहेबांना विनंती करण्याचें धाडस आमच्यानें होईना-कारण अगदीं वेळेवर कोण हो म्हणणार? मग आम्ही आजीबाईना पुढें केलें. आमच्यासाठीं आजी उन्हांतून प्रोफेसरसाहेबांच्या घरीं जाऊन त्यांना बा बेटा करून लेक्चर देण्यास कबूल केलें. नाशकांतील बहुतेक प्रोफेसर मंडळी आजीबाईंची मुलें आहेत तेव्हां त्यांना आईचा शब्द मोडवेना व अशा रीतीनें आजींनीं नातींचा हट्ट पुरविला. एकदा मंडळांत आम्हीं त्यांना काव्यगायन करण्यास सांगितलें तेव्हां त्यांनीं तें एका अटीवर कबूल केलें, की प्रत्येकीनें तिच्या घरचें जुने व टाकाऊ कपडे आजीबाईंच्या घरीं पोहेंचते करावयाचे. २-३ दिवसांनी आजीबाई जुन्या कपड्यांचा गठ्ठा घेऊन भंगीवाड्याकडे जातांना दिसल्या.

एक दिवस सकाळीं ८॥ वाजतां आजीबाई माझ्याकडे आल्या व म्हणाल्या ''तुझ्या घरचे जुने, लहान होत असलेले कपडे दे पांहू ! आज दिव्याची आवस आहे तर वेळ गमावूं नको.'' मला कांहींच समजेना. मी म्हटलें,''हें काय आजीबाई? आज कोठली दिव्याची आवस? तुमचं आपलं कांहीं तरीच !''

तेव्हां त्या हंसल्या व म्हणाल्या, ''हें पहा आज हरिजन-दिन आहे. वर्षांतून एक दिवस त्या लोकांना आंघोळी, कपडे व खाऊं घालून कौतुक करावयाचें. दिव्याच्या आवसेला नाहीं का आपण ठेवणींतल्या समया काढून स्वच्छ करीत. अग असेंच हें आहे.''

आईला कोणतेंहि काम मनापासून करायाला आवडे. हरिजन-दिनाच्या मिरवणुकी व महार-मांगवाड्यांची त्या दिवसापुरती साफसफाई तिला अगदीं आवडत नसे. ती हरिजन-दिनाला दिव्याची आवस म्हणे. खरोखर प्रकाश पडायाला हवा तर दिवे रोज घासायाला पाहिजेत. ती हे दिवे रोज घासण्याचा प्रयत्न करी.

पतित स्त्रियांच्या बाबतींत तिला फार काळजी वाटे व १९०८-१९०९ पासून तिनें ह्या बाबतींत भाषणें करून व लेख लिहून लोकमत बनविण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता.*

एक पत्नी जिवंत असतां दुसरी करूं नये हें तिचें मत नुसतें स्वतःपुरतें नसून त्यासाठीं तिला अगदीं स्वतःच्या मुलांप्रमाणें प्रिय असलेल्या माणसाशीं तिनें तंटे केले. त्यांचे खरोखरच कान पिरगाळले. त्यांनींहि जरी करायाचें तेंच केलें आईच्या कानपकडीनें ते बुजून गेले नाहींत, तरी त्यांच्या मनांत तिच्याबद्दल असलेला आदर व प्रेम हीं तिच्या ह्या निस्पृहपणानें द्विगुणित झालीं असें मला खात्रीपूर्वक वाटतें.×

आईला मुलगे मुली नातवंडें तेव्हांच सांपडायाची. तसेंच सोपानदेव चौधरी यांचें झालें. त्यांत ते आमच्यासमोरच राहण्यास आले. तेव्हां ते पाचं पांडवांपैकीं एक बनलें.

एक दिवस आई सोपानदेवांकडे निजली होती. रात्री दोनच्या सुमाराला तेथें ती उठून लिहायाला बसली. लिहितां लिहितां तिला आठवण झाली की, आधल्या दिवशीं आपण आपल्या लिखाणाचें बाड शांतिसदनाच्या ओसरीवर टाकलें. ती तशीच उठली. त्यांच्या व आमच्या घरामधला रस्ता अगदीं झाडींतून व अंधारातून होता. पण आईला भीति ही कशी ठाऊकच नव्हती. ती तशीच घरीं आली व बाड घेऊन परतली. म्हातारी पदराखालीं कांहीं घेऊन जातें आहे हें दोघा चोरट्यांनी पाहिलें. ती झाडींत जातांच ते तिला आडवे झाले, पण आई दचकली नाहीं की भ्यायली नाहीं. तिनें त्यांनाच दरडावून विचारलें काय पाहिजे म्हणून. त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, ''कांहीं नाहीं आम्हांला वाटलें चोर आहे.'' आई म्हणाली, ''काय रे चांदण्या रात्रीं कोणी चोर असा उघड उघड चोरी करील का?'' ते दोघे

* (Day before she gave a full animated lecture on "what could be done for fallen womanhood of India" with the result that fifteen men stood and openly volunteered to do all they could to save these women.)

× परिशिष्ट ४, प्रपूरक ४, पृ.१३७-लक्ष्मीबाईंचे एक पत्र पहा.

ह्यानंतर निघून गेले. दुसऱ्या दिवशीं तिनें आम्हांला ही गोष्ट सांगितली.

सोपानदेवांकडे एक दिवस एक कविमित्र पाहुणे आले होते. ते मध्यरात्रीं जागे झालें, आंत चाललेलें संभाषण त्यांना स्पष्ट ऐकूं येत होतें. तेहि घाबरले पण सकाळपर्यंत कांहीं बोलले नाहींत.

''अरे सोपानदेव ऊठ बाबा. बन्याचें चिन्ह ठीक दिसत नाही. जरा ब्रँडी असली तर दे पांहू''

''आई तुम्ही केव्हां उठला?''

''अरे सारी रात्र मी जागीच आहे. बन्या माझ्या मांडीवरच आहे.''

बन्याला ब्रँडी पाजली. बन्या जगला.

सकाळी पाहुणे विचारतात,''कोण आजारी होते?''

सोपानदेवांनीं आजाऱ्याला त्यांच्यापुढें धरलें. तो बन्या बोका होता. आईचें प्राणीमात्रावरहि प्रेम होतें. स्मृतिचित्रांच्या तिसऱ्या भागांत ब्लॅकीचें व चंपीचें वर्णन आलें आहें. तसले प्रकार आमच्या घरांत नेहमी असायाचें.

सोपानदेवांच्या शेजारीं एक गृहस्थ रहात असत. त्यांचा पुतण्या वयानें अठरा वर्षांचा झाला होता पण बुद्धीनें तीनचार वर्षांचार राहिला होता. लहानपणीं टायफाईड होऊन त्याचा परिणाम त्याच्या मेंदूवर झालेला होता. आईला त्याची फार कींव येत असे. तिनें रोज सकाळीं त्याला फिरायला नेऊन शिक्षण देण्याचें ठरविलें. आईनें त्याला म्हणावें,

''हं बिन्दु हें झाड कसलें?''

''वडाचें.''

पण तें असायाचें पिंपळाचें. दुसरें झाड वडाचे असलें कीं बिंन्दूनें हटकून पिंपळाचें म्हणून उत्तर द्यावें.

एकदा सोपानदेव म्हणाले—''आई तुम्ही कशाला खटपट करतां? आबासाहेबांनीं करतां येईल तें सारें केलें आहे. कांहीं करायचें ठेवलें नाहीं. तुम्हीं वडाचें झाड दाखविलें, कीं तो पिंपळाचें म्हणतो नि तुम्हीं पिंपळ दाखविला कीं तो वड म्हणतो.''

ह्यावर आई म्हणाली,''अरे त्याचेंच काय घेऊन बसला आहेस? मोठमोठे लोक वडाची साल पिंपळाला लावतात नि पिंपळाची साल वडाला लावतात. हा तर बोलून चालून पोरच आहे.''

— १४ —

# सत्कार समारंभ

बाबूराव पाटणकर एक दिवस विचारूं लागले कीं, काकूंचा सत्कार करण्याचें कांहीं मंडळीच्या मनांत आहे त्यावर तुझें काय मत आहे ?

माझ्या डोळ्यांपुढें आईचें सर्व चरित्र उभे राहिलें. मनुष्य मेल्यानंतर त्याचे स्मृतिदिन पाळण्यांत येतात तें त्याच्या देखत पाळण्यांत आले किंवा माणसाला आपले मृत्युलेख वाचतां आले तर किती छान होईल असें मला आईच्या बाबतींत वाटे. असे विचार डोक्यांत आले कीं, मी ते घालवून देण्याचा प्रयत्न करी. पण ते आपोआपच येत. तो विचार आज पुन्हां पुढें उभा राहिला. मीं पाटणकरांना म्हटलें, ''ठीक आहें. आईचा सन्मान झालेला पाहून तिला खूप आनंद होईल. करूं या आपण तो,'' बापूराव कोलहटकरांच्याहि डोक्यांत तीच कलपना घोळत होती. ते म्हणाले, ''आपण तिसरा भाग त्याच समारंभांत प्रसिद्ध करूं. आणखी मी अत्र्यांना बोलावतों.''

इकडे नाशकांतील होत्या नव्हत्या त्या बहुतेक साऱ्या संस्थ ांतर्फे आईचा सत्कार करण्याचे ठरलें. रा.वा.श्री. पुरोहित, प्रो.र.श्री.जोगळेकर,रा.र.त्र्यं.भार्गवे व रा.वि.द.गोखले ह्यांच्या सह्यांच्या आमंत्रणपत्रिका गेल्या कीं ता.१५ डिसेंबर १९३५ रोजी सकाळी साडेआठ वाजतां नाशीक शहरांतील साहित्यविषयक कार्य करणाऱ्या कांहीं प्रमुख संस्थांनी श्रीमती लक्ष्मीबाई टिळक ह्यांच्या साहित्य सेवेबद्दल त्यांचा सत्कार करण्याचें योजिलें आहे. तरी त्या प्रसंगी आपण अवश्य यावें.

मीं व पाटणकरांनीं आमच्या लहानपणच्या दहा बारा सोबत्यांना खालील पत्र धाडलें,

सप्रेम नमस्कार वि.वि.

स्मृतिचित्रांचा तिसरा भाग १० तारखेच्या सुमारास प्रसिद्ध होणार असून त्या निमित्त नाशीकच्या सर्व वाङ्मयसंस्था आईच्या वाङ्मयसेवेबद्दल ता.१५ रोजीं जाहीर गौरव करणार आहेत. त्या सुमारास आपण आल्यास आपलें मित्रमंडळीचेंहि एक छोटेंसें संमेलन होईल. सर्वांच्या एकदम गांठीभेटी होतील व आपणां सर्वांचा एक फोटोहि आपण काढूं. आईंचें वय आतां फार झालें आहे हें लिहावयाला नकोच. तेव्हां या प्रसंगी आपण जरूर जरूर यावें.

आपले मित्र,<br>
दे.ना.टिळक<br>
भा.ल.पाटणकर

ह्या पत्रांत 'आईंचें वय आतां फार झालें आहे हें लिहावयाला नकोच.' हे वाक्य आम्हीं अगदीं सहज लिहिलें होतें. आमच्या सुप्तसंवेदनेनें तें आमच्याकडून लिहविलें होतें. पण त्याचा परिणाम असा झाला कीं १५ बालमित्रांपैकीं १० जण आले. दोघांना पत्रेंच मिळालीं नाहीत. एकाला रजा मिळेना व दोघांना इतर अडचणींमुळें येता आलें नाहीं.

आई म्हणाली, ''दत्तू, तुम्हीं पोरें माझ्या लग्नाला हजर नव्हता रे. म्हणून हा सोहोळा तुम्हीं करीत आहां.''

मीं म्हटलें, ''आई मीं आणि पाटणकर ह्यांत आहों तरी ? आम्हीं एक केलें कीं येणाऱ्या पाहुंण्यांची जेवणाखाण्याची व राहण्याची व्यवस्था केली आणि माझ्या लहानपणाच्या मित्रमंडळीला बोलावलें.''

'' ते मला नाहीं कांहीं समजत. पण तुम्हीच ह्याच्या बुडाशीं आहां.''

'' बरं बुवा तूंच असं म्हणायला लागलीस तर लोक म्हणतीलच. ''

पण हा सत्कारसमारंभ खरोखरच गांवांतील संस्थांनीं स्वयंस्फूर्तीनें केला होता. मी व पाटणकर त्यापासून अगदीं अलिप्त होतों. आणि सत्कार झाला तो तिच्या वाङ्मयसेवेपेक्षांहि तिच्या व्यक्तित्वाचा झाला असें मला वाटतें.

१६ सप्टेंबर १९३३ रोजीं नाशीक येथील कविसंमेलनांत आई खरी खरी प्रथम नाशीकच्या लोकांपुढें आली. ह्यानंतर जवळजवळ एक वर्षानें म्हणजे ता.१५ डिसेंबर १९३४ रोजी स्मृतिचित्रांचा पहिला भाग प्रसिद्ध झाला, व त्यानंतर बरोबर एक वर्षानें तिसऱ्या भागाची प्रसिद्धी व सत्कार-समारंभहीं झालीं. सत्कार-समारंभ ही आईच्या आयुष्यांतील एक फार मोठी गोष्ट होऊन गेली.

आमच्या शेजारचे घर मोकळे होतें. तें आम्हीं मागून घेतलें. आचारी ठेवला व पाहुण्यांची व्यवस्था केली. आईच्या विनोदबुद्धीनें त्या दोन दिवसांत अगदीं कमाल करून सोडली होती. अंगच्या विनोद व प्रेमळपणा ह्या दोन गुणांमुळें आमच्या पाहुणचारांत जो कांहीं उणेपणा उरला असेल तो कोणालाच दिसून आला नाहीं.

आधल्या दिवशी संध्याकाळपासून पाहुणे येऊं लागले. नागपूर मेलनें मुंबईचे पाहुणे आले. ते आपले सामान स्टेशनवर ठेवून आलें ! मोटार निघून गेल्यावर हें ध्यानांत आले. सारी धावपळ सुरू झाली. पाहुण्यारावळ्यासह आम्हीं हरवलेलें सामान शोधूं लागलों. त्या वेळांत आई आणि माझीं मुलें एवढीच मंडळी शेजारच्या घरी होतीं. रात्र बरीच झाली. तेथेंच मुलें आपल्या आजीबाईंजवळ निजलीं. एकीकडे सामानामागे गेलेल्या पाहुण्यांची मार्गप्रतीक्षा चालली होतीं व एकीकडे थट्टामस्करी चालली होती. मधला नातू आजीच्या गळ्यांत हात

घालून म्हणतो, '' आजीबाई काय हें तुमचे महत्त्व. काय लोक जात आहेत येत आहेत.'' आईनें आमच्याबरोबर केलेला विनोद कायम ठेवून म्हटलें, ''अरे, तुम्ही कनी माझ्या लग्नाला हजर नव्हता. म्हणून मुलांनी माझा हा सोहळा आरंभला आहे.''

'' आजीबाई मग वाजंत्र्यांचें रेकॉर्ड लावूं का ?''

'' आजीबाई आपण असें करूं. उद्या कनी पुढच्या तांग्यांत ठेवूं फोनोग्राफ आणि वाजंत्र्यांचे रेकॉर्ड लावूं व मागे चालेल तुमची मोटार. मग ही छान मिरवणूक निघेल.''

अशा तऱ्हेनें बोलणें चालता चालतां लग्नापासून निघालेल्या ह्या बोलण्यानें मरणापर्यंत मजल मारली. अगदी सहज एक मुलगा म्हणाला, '' आजीबाई तुम्हीं जर आतां मेलांत तर तो मृत्यु खरोखर फार महत्त्वाचा मृत्यु होईल नाही ?'' *

आईला तीहि गंमत आवडली. सगळी मंडळी खों खों हंसली. सत्कारसमारंभांत लग्नाच्या व मृत्यूच्या कल्पना मात्र फार वेळेस आल्या. मी व पाटणकरहि थोडें चमकलों. पण हें सारें अगदी नकळत अशा रीतीनें. आमच्याकडे पहात हंसत हंसत आई म्हणाली, '' पहा रे बाबांनो दृष्ट बिष्ट लागेल हं मला.''

रात्रींच्या पाहुण्यांत अत्रे आले नाहीत. पहाटें येतील असें वाटले. अत्रे नाहींत, कोल्हटकर नाहीत, समारंभ सकाळी साडेआठला होता. तेव्हां आई म्हणाली, ''अरे अत्रे नाहींत तर ह्या बेंजीलाच करा अन् सांगा हेच अत्रे म्हणून.''

'' पण तो तितका उंच नाहीं दिसत ना !''

'' थंडीने वाळलाहे म्हणून सांगा.''

'' आणि तो बालेणार काय तिथें ?''

'' घसा बसलाहे म्हणून सांगा.''

आम्हीं सगळें हसूं लागलों.

पण उजाडतांच अत्रे आले. बापूरावांनी स्मृतिचित्रांचे तिन्हीं भाग बांधलेले पुस्तक आईच्या हातांत देऊन म्हटलें, '' काकू, पहा हजार पानांचा ग्रंथराज तुम्हीं लिहिला.''

एवढें मोठें पुस्तक पाहून आईलाहि आश्चर्य वाटलें.

* हा प्रसंग मला चांगला आठवतो. माझ्या बोलण्याचा रोख हाच असला तरी शब्द निराळे होते. मी म्हणालो होतो, ''आजी, तुम्हीं आत्तां मेलांत तर मजा होईल.''

सत्कारसमारंभ म्हणजे खरोखरच सत्कारसमारंभ होता. तेथें जातांच आईच्या डोळ्यांना पाणी आलें. तिला टिळकांची आठवण झाली. टिळक असते तर त्यांना आपल्या पत्नीचा हा सत्कार पाहून केवढा आनंद झाला असता. सर्कल थिएटर अगदी गच्च भरलें होतें. एकहि खुर्ची किंवा जागा रिकामी नव्हती. बाहेरहि गर्दी उभी होती.

प्रथम आईच्या भावाबहिणींच्या मुलांतर्फे तिला हार व बक्षिसें अर्पण करण्यांत आली. नंतर नाशीकमधील एकएक, एकएक अशा वाङ्मय व वाङ्मयाशीं निगडित अशा संस्थांतर्फे तिला फुलांचे हार घालण्यांत आले. ह्या समारंभानिमित्त मुद्दाम काढण्यांत आलेल्या तिच्या एका फोटोचे एन्लार्जमेंटहि त्या चित्रकारानें त्या वेळीं तिला अर्पण केलें. *

दायसवर मधें अत्रे, त्यांच्या एका बाजूस आई, दुसरीकडे ह.भ.प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर व सभोंवतालीं आईला प्रिय वाटणारी इतर मंडळी बसली होती.

आरंभीं सत्कार-मंडळाचे अध्यक्ष रा.वा.श्री.पुरोहित ह्यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. रा. पुरोहित म्हणाले, ''निंदाखोर मनाला गुणग्रहणाकडे खेंचून नेणें वाटतें तितकें सोपें नाहीं. आजच्या या सत्कारप्रसंगीं आपण येथें एक प्रकारच्या उच्च आणि पवित्र वातावरणांत विहार करीत आहों. सत्कार कुणाचा करावा? आकाश फार उंच असलें तरी त्याची मिजास उतरविणारा मनोरा एखादा कुशल कारागीर यकःश्चित् तांदुळावरहि उभारतो. आतां त्याचा तांदुळाशीं संबंध येतो म्हणून तो साहित्यिक होऊं शकणार नाहीं कदाचित्. परंतु श्रीमती लक्ष्मीबाईंचा तांदुळाशीं-स्वयंपाकाशीं संबंध येत असूनहि त्यांनीं 'स्मृतिचित्रें' लिहून मराठी साहित्याशीं कधींहि न तुटणारा ऋणानुबंध जोडून ठेवला आहे.'' ह्यानंतर ह.भ.प.पांगारकरांनीं भाषण केलें त्यांत ते म्हणाले-''लक्ष्मीबाईंच्या आयुष्याचा पूर्वार्ध दारिद्र्य, दुःखांत व खडतर नशीबाशीं झगडण्यांत गेला असला, तरी उत्तरवय त्यांच्या कर्तव्यतत्पर व गुणी सत्पुत्राच्या संगतींत बरेच सुखांत जात आहे ही तरी मोठी भाग्याचीच गोष्ट होय! ह्या विश्रांतीमुळें त्यांच्या हातून वाङ्मयसेवा बरीच झाली. लक्ष्मीबाई कवयित्री आहेत व गद्यग्रंथकारहि आहेत. पतीची अपुरी राहिलेली इच्छा पूर्ण करण्यासाठीं त्यांनीं ६३ अध्यायांचें ख्रिस्तचरित्र गाइलें आहे. पण त्यांची स्मृति मराठी वाचकांस दीर्घ काल राहील ती त्यांच्या 'स्मृतिचित्रा'मुळें राहील. आपल्या आयुष्यांतल्या घडामोडीचीं स्मृतिचित्रें प्रायः साऱ्याच वृद्धांच्या मनःश्चक्षूंसमोर उभीं असतात, पण तीं शब्दसृष्टींत रंगविण्याची कुशलता फार थोड्यांच्या ठिकाणीं असते.

* नाशीक येथील म.वि.उर्फ बाळासाहेब काळे यांनी हे चित्र दिले होतें.

रमाबाई रानडे यांच्या 'आठवणी' पुष्कळांच्या पाहाण्यांत असतील, त्याहि फार चांगल्या आहेत, पण त्याहिपेक्षां लक्ष्मीबाईंचीं स्मृतिचित्रें अधिक मोहक आहेत असें मला वाटतें. ह्या स्मृतिचित्रांत भाषेचा साधेपणा व विचारांचा प्रांजलपणा हे दोन गुण अत्युत्कट आहेत. पतीच्या, स्वतःच्या व इतर संबंधीं माणसांच्या कृतीचें स्वभाववर्णन अगदीं हुबेहुब व यथार्थ केलें आहे. साधेपणाला सत्याची जोड आहे. त्यांचे हे ग्रंथ आपल्या सहजपणामुळें व सत्यत्वामुळें चिरकाल लोकप्रिय होऊन राहतील. मराठी वाङ्मयाला ते भूषणभूत झाले आहेत.

पहिले दोन्ही भाग मीं एकेक दिवसांत वाचले आहेत. पुस्तक हातीं घेतलें कीं पुरें केल्याशिवाय चैन पडत नाहीं इतकी आकर्षणशक्ति त्यांच्या लेखणींत आहे. ग्रंथ चरित्रपर असून कांदबरीपेक्षां मनोहर आहे. कला आणि सत्यता यांचें त्यांत गोड मिश्रण आहे. किंबहुना, सत्यतेलाच कलेचें सहजसौंदर्य प्राप्त झालें आहे. त्यांचा प्रामाणिकपणा, प्रांजळपणा हा मला अत्यंत आदरणीय वाटतो. टिळक व लक्ष्मीबाई यांच्या ऐन तारुण्यांतला भाग ह्या दोन्ही खंडांत आला असून, त्याला प्रणयाचा किंवा शृंगाराचा दूरचाहि स्पर्श नाहीं ही ह्या स्मृतिचित्रांची अपूर्वता आहे. आर्य स्त्रीचें स्वभावचित्र अगदीं यथातथ्य लक्ष्मीबाईंच्या चरित्रानें प्रगट होत आहे. त्यांची सोशिकता व सहनशीलपणा, त्यांची अपूर्व शांति व दयाबुद्धि ग्रंथांत सहजरीत्या प्रतिबिंबित झाली आहे. दयाशीलता व परोपकारबुद्धि या दोन्ही पतिपत्नींची एकरूपता आहे.

लक्ष्मीबाई एक नमुनेदार आर्य महिला आहेत.त्या प्रतिव्रता आहेत, त्यांचे मराठी वाङ्मयावर उपकार आहेत. आरोग्य, सुख व शांति या पुढील कालांत त्यांना पुरेपुर मिळो अशी देवाची प्रार्थना करून मी आपलें भाषण पुरें करितों.''

प्रो.जोगळेकर ह्यांचें भाषण अत्यंत मार्मिक झालें. त्यांतील कांहीं भाग असाः

''स्मृतिचित्रांचे दोन भाग प्रसिद्ध झाले आणि श्री. लक्ष्मीबाईंची खरी योग्यता महाराष्ट्रास कळली. यथातथ्य चरित्र लिहिणें म्हणजे तारेवरची कसरत आहे. लेखकाचा स्वभाव भिडस्त व संकोची असला तरी वर्ण्य व्यक्तीच्या गुणांस योग्य उठाव मिळत नाहीं व मिळमिळीत आणि फिक्कट अशी मूर्ति निर्माण होते. लेखक स्तुतिप्रिय असल्यास तो वर्ण्य व्यक्तीच्या दोषांस मुरड घालून तुरपून घेतो किंवा चुण्या पाडून टीप मारतो की छिद्रान्वेषी दृष्टीलाहि दोषांच्या ठिकाणीं गुणच प्रतीयमान व्हावेत. अशा रीतीनें अमानुष अवास्तव मूर्ति निर्माण होते. या दोनहि अंतिम टोकांच्या दोषांपासून स्मृतिचित्रें अलिप्त आहेत. निःसंकोच मनमोकळेपणानें श्री.लक्ष्मीबाईंनीं सर्व वृत्तांताचें चित्र रेखाटल्यामुळें रे. टिळकांचा स्वभाव, स्वतः लेखिकेची मनःस्थिति व तत्कालीन परिस्थिति यांचें आपणांस यथार्थ दर्शन होतें.

साधी घरगुती भाषा व सूक्ष्म मार्मिक विनोदाची जरतार यामुळें या ग्रंथास अव्याजमनोहर रूप प्राप्त झालें आहे. बाबा पदमनजींचा 'अरुणोदय' व कै. रमाबाई रानडे यांच्या 'माझ्या आयुष्यांतील आठवणी' यांत घराऊ, साधी भाषा असली तरी पहिल्यांत विनोद व चटकदारपणा नाहीं व दुसऱ्यांत तुलनेनें मनमोकळेपणा कमी आहे म्हणून 'स्मृतिचित्रां'ना मराठी वाङ्मयांत अनन्यसाधारण स्थान आहे.

स्मृतिचित्रांची प्रथाहि नवी नाहीं. श्रीरामचंद्रांनीं सीतेच्या विनोदनार्थ पूर्वघटनांचा चित्रपट तयार केल्याचें भवभूतीनें दाखविलें आहे व याचा हेतु ''प्राप्तानि दुःखान्यपि दंडकेषु संचित्यमानानि सुखान्यभूवन्'' असा कालिदासानें दिला आहे.

श्री.लक्ष्मीबाईंचा जीवनपटहि अघटित घटनांनीं व संकटपरंपरांनीं चित्रविचित्र झाल्यामुळें त्यांच्या संसाराला तुफानी सागराची उपमा साजेल. या वावटळींतून त्यांची जीवननौका सुरक्षित तडीला आल्यावर सिंहावलोकन करून, आपल्या रबरी चेंडूसारख्या खेळाडू वृत्तीनें त्यांनीं जें चित्र रेखाटलें आहे तें हृदयंगम उतरलें आहे.

त्या उपजत कवयित्री नसल्या तरी परिस्थितीनें त्यांना कवयित्री बनविलें. रे. टिळकांनीं धर्मान्तर केल्यावर त्यांची मनोभूमिका भाजून नांगरून निघत असतां, जनकाच्या हातीं सीता सांपडली त्याचप्रमाणें 'करुणासागर पतिविरहानें बळें जधीं मथिला! तधीं तयांतून लक्ष्मी आली साह्या मज लक्ष्मीला, असें त्यांनीं काव्यदेवीच्या साक्षात्काराचें वर्णन केलें आहे. यानंतर

''नवकाव्यांच्या गुंफून माला पतिला मीं धाडाव्या

फुलांबदलि मीं रत्नमालिका आल्या प्रेमें घ्यावा''

याप्रमांणें काव्यदूतीच्या हांतीं पतिपत्नींच्या भावना परस्परांस व्यक्त होत होत्या. पुढें लक्ष्मीबाईंनीं धर्मान्तर केल्यावर जेव्हां पतिपत्नींचे मीलन झालें तेव्हां कांहीं काळ काव्यदेवी गुप्त झाली. पण ती जेव्हां पुन्हां अवतीर्ण झाली तेव्हां विविध रुपानें नटून लोकांपुढें आली. त्यांनीं रे टिळकांनी अर्धवट लिहिलेलें ख्रिस्तायन पूर्णतेस नेलें.

त्यांच्या स्मृतिचित्रांकडे अगर काव्याकडे पाहिलें तर धन्योद्‌गार बाहेर पडतात. रणांगणांतून घायाळ परंतु विजयी होऊन परत आलेल्या वीराकडे पाहून त्याच्या अंगावरील जखमा मोजतांना स्वकीयांना जो आदर वाटतो तोच आदर 'स्मृतिचित्रें' वाचून श्री. लक्ष्मीबाईंबद्दल वाटतो. त्यांचें आतां रसिकांशीं एकच मागणें असणारः-

''काटे सुकले फांद्यांवरती भर त्यांची झाली राना

गुलाब देवा तुम्हां वाहिला गोड करूनि तो कां घ्या ना !''

रा. अत्र्यांचें भाषण म्हणजे त्या समारंभांतील विशेष होता. तें भाषण देतां येईल तेवढें खालीं दिलें आहे.

''आजचा प्रसंग नेत्रांत अश्रु व ओंठावर हसूं या दोन मिश्र भावनांचें प्रदर्शन करण्याचा आहे. मघां आपणांसमोर लक्ष्मीबाई येऊन बसल्या त्या वेळीं त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु झरत होते. आपणाला लांबून कदाचित् दिसत नसेल, पण मी त्यांच्याजवळ बसलेला असल्यामुळें, त्यांचे ओले डोळे पाहून मलाहि रडूं आलें. जो रडतो त्याला अंतःकरण असतें, जो हंसतो त्याला असतेंच असें नाहीं. हुंदका हा हृदयाचा हुंकार आहे. जो हुंदका मला मघां ऐकूं आला तो लक्ष्मीबाईंच्या हृदयाचा हुंकार होता. अशा तऱ्हेनें आनंदाचे अश्रु ढाळण्याचें भाग्य फार थोड्यांच्या वाट्याला येतें.वार्द्धक्याच्या काळांत आपल्या अपत्याचें बारसें करण्याचें भाग्य फार थोड्या स्त्रियांच्या वांट्यास येत असेल. पण अशा तऱ्हेचें अपूर्व भाग्य लक्ष्मीबाईंना लाभलें. त्यांनीं आपल्या देवदत्ताचें बारसें केलें त्याला फार वर्षे लोटलीं. त्या वेळीं त्यांना जो आनंद झाला असेल त्याच्या तिप्पट आनंद त्यांना आज त्यांच्या वाङ्मयापत्याच्या प्रकाशनाचे वेळीं होत असला पाहिजे.

तरुण मंडळी जुन्या मंडळीचें कौतुक करीत नाहीं अशी शंका कांही प्रदर्शित करतात. (वाक्य उच्चारतांना रा.अत्र्यांनी आपली दृष्टि रा. पागारकरांकडे वळविली तेव्हां रा. पांगारकरांसह सर्वच हंसूं लागले.) मी वृद्धहि नाहीं व तरुणहि नाहीं. म्हणून मी तरुणांच्या वतीनें असें सांगू शकतों कीं, आम्ही जुन्या मंडळीचें कौतुक करण्यांत मुळींच कसूर करीत नाहीं. पण आम्ही कोणत्या जुन्यांचें कौतुक करतों? तर ह्या अशा. (ह्या वेळेस त्यांनीं रा. पांगारकरांकडे पहात आईकडे अंगुलिनिर्देश केला. तेव्हांहि खूपच हंशा पिकला व रा. पांगारकरांनींहि त्या विनोदांत भाग घेतला. इतक्यांत पहिल्या रांगेंत बसलेल्या एका गृहस्थांच्या हातांतील काठी खालीं पडली. हे गृहस्थ [१] आज नाशकांतील तरुण आवेशयुक्त होऊन आपल्या हातांतल्या काठ्या खाली टाकून देऊन वृद्धांच्या चरणांवर आपले दोन्ही हात नम्रपणें ठेवायाला तयार आहेत, असें या समारंभावरून जाहीर होत आहे. (रा. अत्र्यांच्या समयसूचकतेमुळें तर श्रोत्यांची हंसून हंसून मुरकुंडी वळली.)

सर्वच जुन्या लोकांचा सत्कार करणें शक्य नाहीं ! कारण ते फार आहेत. ज्यांची साहित्यसेवा अजरामर होण्याच्या योग्यतेची आहे त्यांचा मात्र सत्कार करण्यास आम्ही तरुण मंडळी केव्हांहि तयार आहों.

१. गो. ह. देशपांडे (पुढें खासदार)

लक्ष्मीबाईंची ती एकसारखी हालणारी मान तरुणांना काय सांगते? मी तुमचें अंतःकरण जाणतें, जाणतें, जाणतें, असें ती मान आम्हांला बजावीत आहे. अशीं वृद्ध माणसें जर आमच्या डोक्यांवर असतील तर त्यांचे पाय आमच्या डोक्यावर धारण करायला आम्ही केव्हांहि तयार आहों.

आजचा हा सत्कार-समारंभ महाराष्ट्राला आदर्श आणि संस्मरणीय असा आहे. नाशीक म्हणजे सनातन धर्माचा बालेकिल्ला. अशा या सनातन धर्माच्या बालेकिल्ल्यांत बाह्यदृष्ट्या तरी परधर्मीय समजल्या जाणाऱ्या एका साहित्यसेविकेचा सत्कार करून, साहित्यक्षेत्रांत, शारदेच्या मंदिरांत, जातिभेद, धर्मभेद पंथभेद नाहींत, असें आज नाशीककरांनीं जाहीर केलें आहे. धर्मभेदाच्या अस्थि नाशिककरांनी आपल्या प्रेमाच्या गोदावरीच्या डोहांत टाकून दिल्या असें या सत्कार समारंभानें आज सिद्ध केलें आहे.'' *

लक्ष्मीबाईंचीं काव्यें प.वा.कविवर्य टिळकांकडे पोस्टानें रवाना होत. पुढें त्यांची व टिळकांची दिलजमाई ह्या काव्यांमुळें झाली ह्याबद्दल पोस्टखात्याचे आभार मानले पाहिजेत. असा विनोदी उल्लेख प्रो.जोगळेकरांनीं आजींच्या काव्यांचें रसग्रहण आपल्या भाषणांत करतांना केला व त्याबद्दल पोस्टखात्याचे आभार मानले. मला वाटतें ही काव्यपत्रें पोंचविणारा पोस्टमास्तर साहित्यिक नसला पाहिजे. तो जर साहित्यसेवक पोस्टमास्तर असता तर त्यानें ती काव्यें पळविलीं असतीं असें मी म्हणत नाहीं. पण स्वतःचें शहाणपण दाखविण्यासाठीं तीं त्यानें बदललीं असतीं खास.त्या आपत्तींतून बचावलेली काव्यसंपदा लक्ष्मीबाईंना उपकारक झाली व म्हणूनच त्यांना आपली 'स्मृतिचित्रें' मराठी वाङ्मयांत सुपूर्त करतां आली. या स्मृतिचित्रांची ओळख महाराष्ट्राला प्रथम करून देण्याचें श्रेय प्रो. पाटणकर, श्री.देवदत्तराव टिळक व साहित्याचार्य प.वा.कोल्हटकर या तिघांना आहे. स्मृतिचित्रांची महति फक्त त्याच एका साहित्याचार्याला पटली होती. आणि त्यानें हें वाङ्मय पुस्तकरूपानें अवश्य प्रसिद्ध केलें पाहिजे असा जो अभिप्राय आपल्या मित्रमंडळीजवळ प्रदर्शित केला तो त्यांच्या पुत्रानें चोरून ऐकला. त्यानें 'स्मृतिचित्रें' संजीवनींतून प्रसिद्ध करून आपला व सर्वांचा फायदा केला. चोरून केलेल्या कामाचा देखील जगाला कसा फायदा होतो हें या 'स्मृतिचित्रां'नीं उत्तम प्रकारें दाखविलें आहे. 'स्मृतिचित्रां'च्या लेखिका लक्ष्मीबाई या कुठल्याहि बिगारी यत्तेंत अगर कॉलेजांत शिकलेल्या नाहींत. त्यांच्या भाषेंत शिक्षणाचे रंगढंग नाहींत असा अभिप्राय पांगारकरांनींहि आपल्या भाषणांत सर्वांना ऐकविलाच आहे आणि तो खरा आहे. लक्ष्मीबाई जर एखाद्या पदवीधर असत्या तर त्यांची

* नाशीकच्या स्थानिक वृत्तपत्रांतून ह्यावर मात्र कडकडून टीका झाली.

भाषा इतकी सोपी, मार्मिक व सहृदय वठली नसती. त्यांच्या लेखनांतील प्रत्येक विचार, भावना, कल्पना हीं थेट अंतःकरणापर्यंत जाऊन पोंचतात. त्यांच्या सूक्ष्म अवलोकनशक्तीचा प्रत्यय तर या ग्रंथांत पदोपदीं येतो. त्या म्हणतात मला ड कोणता ढ कोणता हें ओळखूं येत नव्हतं. 'ढ' कोणता हें मीसुद्धां ओळखतों पण लक्ष्मीबाईंना बाराखड्यांतला ड व ढ मधील फरक कळत नसे.

सांगायाचा मुद्दा असा कीं, व्याकरणाची यत्किंचिंतहि माहिती नसतांना देखील त्या उत्कृष्ट वाङ्मय निर्माण करूं शकल्या. वाङ्मयगुण हे व्याकरणाच्या ज्ञानावर अवलंबून नसतात. उत्तम वाङ्मय निर्माण करायला व्याकरण आलेंच पाहिजे असें नाहीं.

इतकेंच काय, पण लक्ष्मीबाईंना टांक देखील वापरतां येत नाहीं! त्यांनीं आपलें पुष्कळसें लिखाण आगपेटीच्या काडीच्या टोकानें लिहिलेलें आहे. आपणांपैकी पुष्कळ साहित्यसेवक फाउंटन पेन वापरतात! पण त्यांना 'स्मृतिचित्रां' इतका हृदयंगम ग्रंथ निर्माण करतां आलेला नाहीं. ज्या काडीनें लक्ष्मीबाई लिहीत असत त्या काडीच्या टोकाशीं असलेली जळजळीत आग त्यांनीं आपल्या वाङ्मयांत ओतली आहे. इतर लेखक फाउंटन पेन वापरीत असले तरी त्यांच्या फाउंटन पेनच्या शाईंतून त्यांचें हृदय झरत नाहीं.

त्यांची विनोदवृत्ति अत्यंत तल्लख आहे. इतकी नाजूक आणि इतकी सूक्ष्म विनोदवृत्ति इतरांच्या लेखनांत क्वचितच आढळते. अशा तऱ्हेचा विनोद मराठींत कोणींहि निर्माण केलेला नाहीं, असें मीं विधान केलें तर तें अतिशयोक्तीचें मुळींच ठरणार नाहीं. स्मृतिचित्रांच्या प्रत्येक पानापानावर ही विनोदाची पखरण आपल्याला आढळेल. त्यांनीं आपल्या वडिलांविषयीं लिहिलें कीं, ''माझ्या वडिलांना सोंवळें लागलें हातें.'' त्या शब्दचित्रें इतक्या कौशल्यानें रंगवितात कीं ती वाचतांना त्या त्या व्यक्तींच्या साक्षात् मूर्ति आपल्यापुढें उभ्या राहतात. आगगाडींतून जातांना आपल्या डब्यांतील भाटिया बायांचें त्यांनीं अत्यंत मार्मिक वर्णन केलें आहे, ''त्या बायांचे दंड येवढे मोठमोठे गोरे व त्या लठ्ठ लठ्ठ बाया ! मी एखाद्या उंदराप्रमाणे त्यांच्यामध्यें अंग चोरून बसलें होतें.'' म्हणजे त्या भाट्या व या उंदीर ! असे अनेक विनोदी प्रसंग लक्ष्मीबाईंच्या ग्रंथांत ठिकठिकाणीं सांपडतात. टिळक लक्ष्मीबाईंना शिकवीत असत. फार गंभीर प्रसंग तो. ते विचारीत ''शब्द म्हणजे काय?'' या सांगत, 'शब्द म्हणजे शब्द.' एखाद्या शिक्षक पतीनें आपल्या अशिक्षित पत्नीला शिकविण्याच्या अट्टाहास करून विषुववृत्त अक्षांस रेखांश इत्यादि शब्दांचा अर्थ विचारावा तशांतलाच हा प्रकार, लक्ष्मीबाईंना टिळकांचें समजत नसे, ते खूप चिडत व लक्ष्मीबाई हंसत. टिळकांच्या उधळेपणाचें चित्र एका रुपयाचे तांदूळ आणण्याऐवजीं त्यांनीं दौत आणली त्या गोष्टीनें चांगलें रंगविलें आहे. टिळक रागीट होते हा वारसा त्यांनीं आपल्या वडिलांपासून उचलला होता. एकदां उपकरणीं घासली नाहींत म्हणून टिळकांचे वडील लक्ष्मीबाईंवर खूप रागावले.

त्या वेळीं त्यांनीं मामंजींजवळ केलेली खरें बोलण्याची प्रतिज्ञा पुढें स्मृतिचित्रांत लक्ष्मीबाईंनी तंतोतंत पाळली— स्मृतिचित्रांत त्यांनीं सत्य गोष्टी अत्यंत निर्भीडपणें कथन केल्या आहेत. अतिशयोक्ति मुळींच न करतां मी असें सांगूं शकतों की महात्मा गांधींनीं आपले सत्याचे प्रयोग लिहितांना जो मोकळेपणा व जी निर्भयता प्रगट केली आहे तो मोकळेपणा व ती निर्भयता लक्ष्मीबाईंच्या लेखनांतहि अत्यंत प्रकर्षानें आढळते.

रेवरेंड टिळकांनीं मरणापूर्वी असा आदेश केला होता की माझें चरित्र जसें घडलें तसें लिहा आणि हा आदेश लक्ष्मीबाईंनीं आपल्या स्मृतिचित्रांत भरपूर पाळला आहे. त्यांनीं आपल्याला टिळकांकडून मिळालेल्या मुष्टिमोदकांचेंहि वर्णन केलें आहे. त्यांना हंसायाचा फार नाद असें. त्या हसूं लागल्या की टिळक संतापत व एखादे वेळीं त्यांना मुष्टिमोदक देत. प.वा.विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचीहि अशीच गोष्ट सांगतात. एकदा एक विद्यार्थी त्यांच्या देखत हंसला तेव्हां त्यांनीं त्याच्या थोबाडांत भडकावून विचारलें ''गाढवा, प्रसंग काय येथें हंसण्याचा?''

लक्ष्मीबाईंनीं आपल्या ग्रंथांत टिळकांच्या हृदयाची उत्क्रान्ति कसकशी होत गेली याच्या निरनिराळ्या अवस्था वर्णन केल्या आहेत व हा या ग्रंथाचा एक अपूर्व विशेष आहे. टिळक ख्रिस्ती झाले म्हणून त्यांच्यावर अनेक टीकाकारांनीं अत्यंत अनुदार आक्षेप घेतले, पण ते सर्वथैव खोटे आहेत. टिळकांच्या मनांत हिंदुधर्म व ख्रिस्तीधर्म हा दोहोंचा झगडा चालू होता. या भावनाप्रधान अंतःकरणाची कशी स्थिती झाली याचें उत्कृष्ट रेकॉर्ड 'स्मृतिचित्रांत' आहे. दोन धर्मांपैकीं कोणता श्रेष्ठ याबद्दल टिळकांच्या आत्म्याला संशय पडल्यामुळें त्यांचे कसे हाल झाले, याचें सुंदर वर्णन या ग्रंथांत केलेलें आहे. टिळक जितके नम्र होते तितकाच त्यांचा आत्मविश्वास खंबीर होता. ते स्वतःला प्रेषित समजत. आपल्या कवितांना ते 'ईश्वरी स्फूर्तीची निःश्वसितें' मानीत. अशा पुरुषानें धर्मान्तर केलें तें तो धर्म आपल्या धर्मापेक्षां अधिक श्रेष्ठ असल्याची मानसिक व बौद्धिक खात्री करून घेऊन मगच केलें. ख्रिस्ती धर्माच्या श्रेष्ठपणावर त्यांच्या मनाचा विश्वास बसायाला बरीच वर्षे लागली. ख्रिस्ती झाल्यानंतर देखील त्यांचा हा मानसिक झगडा इतका तीव्रपणें चालला होता कीं, त्यामुळें ते इतर ख्रिस्ती लोकांच्या अनादराला पात्र झाले. गोऱ्या मिशनरींनीं आपल्या देशी ख्रिस्ती समाजाचे खरोखर हाल चालविले आहेत. या समाजाला आपला विकास करण्यास त्यांना मुळींच वाव न देण्याचें धोरण कसें चालविलें याचें प्रत्यंतर टिळकांच्या चरित्रावरून चांगलेंच पटतें. टिळक पैशासाठी ख्रिस्ती झाले नव्हते. ते मुळीं पैशासाठीं जगतच नसत. पैसा आला रे आला कीं, ते आपल्या दुःखित, पीडित, अपंगित बांधवांसाठीं खर्च करून टाकीत. टिळकांनी जें धर्मान्तर केलें, तें लोकसेवेसाठीं, जनसेवेसाठीं केलें आणि आजकालच्या व्यापक धर्मदृष्टीनें त्यांचे तें करणें बरोबरच ठरेल. मानवधर्माच्या दृष्टीनें पाहातां त्यांनीं त्यांत

कांहीं वावगें कलें असें मुळींच म्हणतां येणार नाहीं.

टिळकांच्या अंतःकरणांत सुरू झालेला धर्माचा झगडा हा मानसशास्त्राला अनुसरून होता. त्यांत स्वार्थ, खोटेंनाटें, वगैरे हीनवृत्तींना बिलकूल वाव नव्हता. खरें वाङ्मय नेहमीं मानवधर्मालाच अनुसरून लिहिलें जातें. आणि ह्या कसोटीला लक्ष्मीबाईंचीं 'स्मृतिचित्रें' टिळकांच्या मानसिक झगड्याचें रेकॉर्ड या दृष्टीनें तंतोतंत उतरतात.

खरें वाङ्मय झुंबरांतील लोलकाप्रमाणें शुद्ध असतें. आणि त्यांतून आयुष्याचें खरेंखुरें प्रतिबिंब वेगवेगळ्या रंगांनिशी दृष्टीस पडतें.

लक्ष्मीबाईंना टिळकांच्या मृत्युपत्रांत फार मोठें सर्टिफिकेट मिळालें आहे. त्यांनी आपल्याला आवडणाऱ्या माणसांची जी यादी दिली आहे तिचा आरंभ असा—मला आवडणारी माणसें १ माझी बायको - टिळकांच्या मनांत पत्नीबद्दल जी आस्था वसत होती तिचें यावरून प्रत्यंतर येतें. आपण प्रेषित आहें ही जी भावना आयुंष्याच्या आरंभीं टिळकांना होती ती शेवटीं शेवटीं नाहीशी होत चालली म्हणून ते आपल्या एका शेवटच्या अभंगांत म्हणतात -

पुष्कळ अजुनी उणा
प्रभू मी पुष्कळ अजुनी उणा- *

लक्ष्मीबाईनीं 'स्मृतिचित्रांत' आपल्याला भोगाव्या लागलेल्या सर्व दुःखाचें व अनुभवलेल्या सुखांचे वर्णन अतिशय कळवळ्यानें व जिव्हाळ्यांनें केलेलें आहे. त्या दृष्टीनें त्यांचा हा ग्रंथ मराठींत खरोखरच अपूर्व ठरतो. प.वा. न्यायमूर्ति रानडे यांच्या पत्नी रमाबाईसाहेब रानडे यांनीं अशा तऱ्हेचें आत्मवृत्त लिहिलेलें आहे खरें, व दोन ग्रंथांची तुलना करणें या प्रसंगीं विशेष इष्ट नसलें तरी, मी असे सांगूं शकतों, कीं 'स्मृतिचित्रां'ची सर रमाबाईंच्या आठवणींना येणार नाहीं.

'स्मृतिचित्रें' हें पुस्तक विश्वविद्यालयांमध्यें परीक्षेला लावण्याच्या योग्यतेचें खचित आहे आणि याचा तसा सत्कार जर युनिव्हर्सिटी करील तर जिला एकहि अक्षर धड लिहितां येत नाहीं व जी कोणत्याहि शाळेंत शिकलेली नाहीं अशा लेखिकेनें निर्माण केलेलें पुस्तक अभ्यासक्रमांत दाखल केल्याची अपूर्वं आणि कौतुकास्पद अशी घटना घडून येईल.

लक्ष्मीबाईंच्या या अपूर्व साहित्यसेवेबद्दल त्यांचा हा जो सत्कार होत आहे या प्रसंगी आतां मी सर्वांच्या वतीनें लक्ष्मीबाईंच्या पायांवर डोकें ठेवतों आणि शेवटी त्यांना अशी

* हे गीत शेवटी लिहिलेल्या कवितेतील नसून मृत्यूपूर्वी सुमारे वीस वर्षे आधा लिहिलेले

कळकळीची विनंती करतों कीं आपण आतां अधिक वाङ्मयसेवा करूं नका. हें पुस्तक लिहून आपण मराठी साहित्याची इतकी उदंड सेवा केली आहे कीं, आतां आणखी लिहा असें आम्हीं तुम्हांला सांगणें म्हणजे आम्हांला अंतःकरण नाहीं, आम्ही निर्दय, कठोर आहों असा त्याचा अर्थ होतो. आतां आपण आपल्या उतार वयांत पूर्ण विश्रांति घ्यावी. आपलें आयुष्य अत्यंत आनंदांत व विसाव्यांत जावो अशी मी प्रार्थना करतों.''

वरील भाषणांतील शेवटच्या विनंतीला आईनें एकच उत्तर दिलें कीं, ''ज्या दिवशीं मला पूर्णविराम मिळेल त्याच दिवशीं माझ्या स्मृतिचित्रांना पूर्णविराम मिळेल.'' नंतर तिनें रा. कोल्हटकरांना सांगितलें ''माझे भाऊ, नाती, नातवंडें इत्यादिकांचें हें सारें गोत येथें जमलें आहे. त्यांच्या मार्फत मी माझ्या प्रकाशकाला सांगतें कीं

**लक्ष्मीबाईचा फुलस्टॉप**

अजून झालेला नाहीं.''

— १५ —

# शेवट

आयुष्याची यात्रा आतां संपत आली होती.  दोन अडीच महिनेच राहिले होते. कित्येकांना आपला काळ आधींच कळतों तसें आईचें झालें होतें की काय न कळे. कारण तिनें आतां ख्रिस्तायनाचें काम फारच जोराने सुरू केलें. सूर्योदयाला तिचें काम सुरु व्हायचे व सूर्यास्ताला संपायचें. ह्या बारा तासांत ती स्वतः विसावा घेत नसे की दुसऱ्या कोणाला घेऊं देत नसे. बाराच्या बारा तास आपल्या पदरांत पडावे असें तिला वाटे.  आपली प्रतिज्ञा पुरी करण्याचा तिला ध्यास लागला होता. ख्रिस्तायनाचे टिळकांनीं केवळ अकरा अध्याय लिहिले होते.*  त्यानंतर आईनें शेवटपर्यंत ओवी वृत्तांत ६३ अध्याय बसून पुरे केले. आणि आतां त्यावरून हात फिरविण्याचें काम चालू होतें. तसें म्हटलें तर सत्कार समारंभापर्यंत तिचें काम पूर्ण झालें होतें. पण पुन्हां लिहून काढण्याचे व त्यावरून पुन्हां एकदा हात फिरविण्याचें काम राहिलें होतें. तें सारें काम आपल्या डोळ्यांदेखत आपल्याच हातून व्हावें अशी तिची फार इच्छा होती व तीहि तिची इच्छा जवळजवळ पूर्ण झाली होती. अर्धेअधिक काम तिनें तसें आटोपलें होतें. ह्या कामी तिला किती तरी लोकांची मदत होई. तसें कोणी भेटायाला जरी गेलें तरी ती त्याला कांहीं तरी विचारल्यावांचून राहात नसे. त्याकरतां अगदी सूक्ष्म रीतीनें तिनें बायबलचा अभ्यास केला.

माझ्याकडे माणसांची वर्दळ फार. दर घटकेला कोणी ना कोणी येत रहायचें तेव्हां शांतपणें काम करण्यासाठीं तिने आमच्या समोरच्या वैशंपायनाच्या बंगल्यांत एक खोली घेतली होती. ही खोली किंवा हॉल बंगल्याच्या मधोमध असून एका बाजूला सोपानदेव चौधरी राहत व दुसऱ्या बाजूस माईसाहेब बेदरकर रहात. माईसाहेब आईच्या बहीण झाल्या. व ह्या दोघी म्हातारपणच्या बहिणी संध्याकाळ झाली कीं बोलत बसूं लागल्या. माईसाहेबांना आई बहिणीबाई म्हणत व त्या आईला आजीबाई म्हणत. दिवसा मात्र दोन्हींकडचीं दारें बंद असायची. एकदा हीं कडीकपाटें बंद झालीं की सूर्य मावळल्यावरच उघडायाचीं.

एक दिवस मात्र माईसाहेबांकडचें दार उघडें होतें. मी दुपारी सहज गेलों तर आई इकडून तिकडे करीत होती. मला पाहतांच तिनें मला म्हटलें ''दत्तू, आजीबाई काल फार आजारी

* टिळकांनी ख्रिस्तायनाचे १० अध्याय पूर्ण करून ११व्याच्या १०६ ओव्या मात्र लिहिल्या होत्या

होत्या. मी रात्रभर त्यांच्याकडेच होतें. चल त्यांच्याशीं बोल थोडा वेळ.'' मी गेलों. मला नवीन माणसाशीं बोलण्याचा नेहमी संकोच वाटतो. मी अंगच चोरून कोपऱ्यांत बसलों होतों व दोन्ही आजीबाई एकीमेकींना माझ्याबद्दल सांगत होत्या. त्यानंतर मी माईसाहेबांकडे नेहमी जाऊं लागलों. आईला मोठा आनंद वाटे. एक दिवस पाहिलें तों पुन्हां मधला दरवाजा उघडा व आतां आई पलंगावर पडून कण्हते आहे व माईसाहेब तिच्याकडे खेपा घालीत आहेत.

त्या दिवशीं आईला फारच ताप आला होता. एकाएकीं रात्रीं ताप आला व ती कण्हूं लागली. ताप आला म्हणजे ती फार कण्हायाची व बडबडायची. तिला विचारलें तर म्हणायाची, ''अरे कण्हलें नि बडबडलें म्हणजे बरें वाटतें. जा हं. काळजी करूं नको. मी बरी आहें.''

आणि तिच्या ह्या 'मी बरी आहें' म्हणण्यानेच तिला खरोखर बरें वाटे. एखादें औषध घेतलें आणि त्यानें शेंकडा एक गुण आला की ताबडतोब ती त्या औषधाला शेंकडा नव्वद गुणांचें श्रेय द्यायची. मग त्या औषधाचें एवढें कोडकौतुक व्हायचें कीं, साऱ्या घरादारावर व शेजाऱ्यापाजाऱ्यावरहि त्याचे प्रयोग सुरू व्हायचे. आणि तो औषधाचा आग्रह एखाद्या गोडधोड खाऊइतकाच जोराचा असायाचा.

एकदा आई एक मोठी काढ्याची बाटली घेऊन पहाटें घरोघर जाऊन तो काढा ज्याला त्याला पाजूं लागली. सोपानदेवाच्या घरीं जाऊन तिनें सर्वांना चापटा मारमारून उठवून बसविले. 'हं बाबा तूं घे. बाई तूं घे. त्या पोरांना उठीव' असें करून सर्वांना अर्धा अर्धा कप काढा तिनें पाजला. पूढें हा रोजचा क्रम झाला, कारण गांवांत तापाची सांथ होती. सोपानदेवांनी घरच्या सर्वांना मारून मुटकून काढा पाजावा, पण स्वतःवर पाळी आली म्हणजे आईचा डोळा चुकवून तो खिडकीवाटे फेकून देऊन तोंड पुसावें. एक दिवस आईच्या तें ध्यानांत आले,

''काय रे बाबा घेतलास काढा ?''

'' हो आई. ''

''बघ माझा काढा, जमिनीवर ओतला तर जमिनीचीसुद्धा सर्दी निघून जाते.''

आईच्या बोलण्याची खोंच सोपानदेवांच्या लक्षांत येऊन दुसऱ्या दिवसापासून ते मुकाट्यानें काढा घेऊं लागले.

आई जेव्हां इतके जबरदस्त काम करूं लागली तेव्हां तिच्या मदतीला कारकून देण्याचें आमचे ठरले. कुमारी इन्दिराबाई त्रिभुवन यांचें अक्षर सुंदर, व त्यांना लेखनकलेची आवड

हें पाहून त्यांची या कामगिरीवर निवडणूक करण्यांत आली. मधुसूदन [१] ह्यानेंहि तिला ह्या कामी फार मदत केली. इंदिराबाई दिवाळीच्या सुटीत आल्या होत्या. तेवढ्या अवधीत त्यांच्याकडून होईल तितकें काम करून घेण्याचें आईनें ठरविलें. ह्या थोड्या सहवासाच्या आठवणी इंदिराबाईनींच दिल्या आहेत त्या खाली देतों.

‘‘ मी नाशकास मुद्दाम त्यांचें ख्रिस्तायन लिहून काढण्यासाठींच गेलें होते. आम्ही दोघी एकाच खोलींत रहात असल्यामुळें आईच्या प्रेमळ स्वभावाची मला खरी जाणीव झाली.

मी ज्या दिवशी नाशकास गेलें त्या दिवशी आई माझी वाटच पहात होत्या. मी गेल्याबरोबर माझा हात धरून त्यांनीं मला आंत नेलें व म्हटलें, ‘‘आलीस बाई ? हं. चल आतां लवकर हातपाय तोंडं धू अन् चहा घे. चहा घेतेस कीं दूध ?’’

‘‘ मी आधीं भाऊसाहेबांकडे गेले होतें तेथेंच चहा घेतला ’’ असें मी सांगितले. तरी ‘‘तें कांहीं नाहीं. मी चहा करून ठेवला आहे तो घेतलाच पाहिजे ’’ असे म्हणून त्यांनी आग्रहानें मला चहा घ्यायला लावलाच. त्या स्वतः चहा घेत नसत.

दुसरे दिवशी आई पहाटेस उठल्या. प्रवासाचा थकवा आल्यामुळें मी रात्री जी झोपलें ती सात सोडेसात झाले तरी मला शुद्धि नाही. तेव्हां आईनीं मला हालवून जागे केले. मी डोळे चोळीतच उठलें. तेव्हां त्या हंसून म्हणाल्या, ‘‘ अग तुंम्ही तरण्याताठ्या मुली सात सात आठ आठ वाजेपर्यंत कशा निजून रहातां. आम्ही म्हातारी माणसें पहा. म्हाताऱ्यांना आलं तरुणपण आणि तुम्हां तरुणांना आलंय म्हातारपण. ऊठ चहा तयार आहे. ’’ मला जरा लाजल्यासारखेंच वाटलें. मी उठून आपल्या कामाला लागलें.

आमचे जेवण १२ वाजतां होत असे. आईच्या बरोबर जेवायची मला मोठी भीति वाटे. कारण माझे नेहमीचं खाणं पाहून त्या मला रागे भरत व म्हणत, ‘‘तूं चिमणी आहेस की तरणी आहेस ? तरुण मुलींचे हे केवळ नखरे असतात. आम्ही बघा. तुम्हांपेक्षा चौपट खातों. म्हणून तर आतांपर्यंत जगलों. अशानें तर तूं दोन दिवसांतच मरशील. तें कांहीं नाहीं. माझ्याजवळ तसले नखरे नाहीं चालणार. मी वाढीन तेवढें तुला खाल्लेंच पाहिजे.’’

आईच्या भीतीनें मी जास्त खाण्याचा प्रयत्न करी. परंतु मला तें कधींच साधलें नाहीं.

एकदा त्यांनी मला माझ्या आईबापांविषयी विचारलें. मी माझ्या वडिलांची माहिती सांगितली. परंतु आईची हकिगत सांगतांना माझ्या डोळ्यांत पाणी आलें. त्यांच्या लक्षांत ती गोष्ट येतांच त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें, ‘‘वेडी ग वेडी-तुला काय

१. मधुसूदन गोखले. विष्णुकाकांचे चिरंजीव

वाटतं तुझी आई खरंच मेली ? बघ ह्या घरांत सभोंवार बघ म्हणजे तुझी आई तुला दिसेल.''

मला ह्या बोलण्यानें हसूं आलें. तेव्हां त्या पुनः म्हणाल्या, ''दिसली कां ?'' तरी मीं म्हटलें, ''नाहीं.''

तेव्हां त्यांनी माझा हात आपल्या हातांत घट्ट धरून म्हटलें, '' ही बघ तुझी आई. तुला नाहीं आई-नाहीं ना ? आपण दोघी मायलेकी.''

त्या वेळीं कृतज्ञतेनें माझें हृदय भरून आलें.

आईला लहान लेकरांची भारी आवड. एकदा आईंकडे कोणीतरी एक बाई आपल्या लहान मुलीला घेऊन आली. मी लिहिण्याचें काम करीत होतें. बाई घरांत येऊन आईबरोबर गप्पा गोष्टी करूं लागली. गप्पांच्या नादांत तिनें आपल्या लहान मुलीला खालीं खेळण्यास सोडलें. मुलगी खेळत खेळत माझ्या हातांतली कागद पेनसिल खेळायला आली. तिचे कपडे व एकंदर अवतार पाहून मला त्या मुलीची किळस आली. तिनें हातांत घेतलेला कागद मीं जोराने तिच्या हातून ओढून घेतला. कागदाचा आवाज ऐकतांच आई उठल्या; त्या मुलीला त्यांनी आपल्या पलंगावर बसविलें. व तिच्याशीं बोबड्या बोलानें बोलून खेळूं लागल्या. कांहीं वेळानें ती मुलगी रडूं लागतांच एका कपांत दूध साखर घालून त्यांनी आपल्या हाताने त्या घाणेरड्या मुलीला दूध पाजलें व तिचें खरकटें व घाणेरडें तोंड पुसून काढलें.

ख्रिस्तायन लिहितां लिहितां आईंना कांहीं नव्या ओव्या सुचत. त्या एका स्लेटपाटीवर त्या लिहून ठेवीत. तसें आईंना फारसें चांगले लिहितां येत नव्हतें. मला तर मुळींच त्यांची अक्षरें लागत नसत. मी रिकामी झालें म्हणजे पाटीवरची ओवी पहात असे. ती अक्षरें वाचून मला हंसायला येई; परंतु माझ्याहंसण्यानें आईचा उपमर्द होईल म्हणून मी कधींच तोंडावर हांसू दाखविलें नाहीं. ज्ञ आणि क्ष कसे लिहावे याचा त्यांना घोंटाळा पडे. एका ओवींत दुर्लक्ष असा शब्द त्यांनीं लिहिला. तो ' दुर्लज्ञ ' असा लिहिला होता. मला तें काय आहे हे वाचतांच येईला. तेव्हां मी हळूंच त्यांना ती ओवी म्हणण्यास सांगितलें. त्यांनी ' दुर्लक्ष ' म्हणतांच मी समजलें कीं तो शब्द 'दुर्लज्ञ ' नसून दुर्लक्ष आहे. असे किती तरी शब्द विचित्र रीतीनें लिहिले जात. एक दिवशीं स्लेट पेन्सिल कुठें सांपडेना. मी लिहीतच होतें. आईला एक ओवी सुचली. परंतु लिहायला पेन्सिल नाहीं ! तेव्हां बसायच्या पाटावर त्यांनीं कोळशानेंच एक ओवी लिहिली ! आईंनीं डोळ्यांजवळ पाट धरलेला पाहून मी मोठ्यानें हसूं लागलें व '' काय करतां ?'' म्हणून विचारलें. तों आईहि हसूं लागल्या. व म्हणाल्या, '' मला एक ओवी सुचली ती लिहीत आहे.'' आम्हीं दोघीहि खूप हंसलों. शेवटी आईनें शब्द सांगितले व मीं एका कागदावर ते उतरून घेतले.

एकदा लिहिण्याच्या कामाला लागलें की आईंना दुसऱ्या कशाचीच शुद्ध राहत नसे. दिवसभर स्वतः त्याच कामांत डोकें घालतील व दुसऱ्यांनाहि कंटाळा येईपर्यंत काम करायला लावतील. पहिले चार पांच दिवस दिवसाच्या चोवीस तासांपैकीं तेरा चौदा तास मी लिहिण्यांचें काम करी. ही गोष्ट भाऊसाहेबांना कळली; त्यांनी आईला कामाचा वेळ ठरवून काम करावें अशी सूचना दिली. आईला वाटलें मीच भाऊसाहेबांजवळ कुरकूर केली. रात्रीं निजल्यावर आई माझ्या बिछान्यावर बसल्या व माझी पाठ दाबूं लागल्या; मी म्हणालें ''माझी पाठ नाही दुखत.'' तशा त्या म्हणाल्या '' दुखत नाहीं तर दत्तूला कशाला सांगितलेंस ? '' मी तर आश्चर्यचकितच झालें. '' माझी आणि भाऊसाहेबांची गांठ आज चार दिवस पडली नाहीं. आणि आम्ही एकमेकांशी कामापलीकडे जास्त कांहींच बोलत नाहीं.'' त्यावर आई म्हणाल्या,'' तुला काम जास्त पडतें ही गोष्ट खरी. पण मजसाठीं सोस बाई तेवढं. माझ्या डोळ्यांदेखत हें लिहून झालें कीं मला समाधान वाटेल. मग तें केव्हां कां छापून निघेना. त्यासाठी मी रात्रीचा दिवस करून काम करायला तयार आहे.'' बोलतां बोलतां माझी पाठ चांगलीच रगडून काढली. त्या प्रेमळ स्पर्शानें माझा शीण आपोआपच नाहींसा झाला.

ते दिवाळीचे दिवस असल्यामुळें आईला कुठून ना कुठून तरी फराळाचें आमंत्रण येई परंतु कामामुळें व माझ्यामुळें त्या कोठेंच जात नसत. एकदा असेंच कुणाच्या तरी घरून आईला फार निकडीचें बोलावणें आलें व त्यांना न्यायला मोटारहि आली. तेव्हां त्यांना जावेंच लागलें. आई गेल्या खऱ्या, परंतु दहा पंधरा मिनिटांतच त्या पुनः आल्या. येतांना त्यांनी एका कागदांत एक लाडू गुंडाळून आणला होता, तो त्यांनीं माझ्या हातांत दिला; परंतु मीं तसाच तो कपाटांत ठेवून दिला. तो उघडूनहि पाहिला नाहीं. आईंनीं ते पाहिलें होतें.जेवणाच्या वेळीं त्यांनी पुनः तो गुंडाळलेला पुडा माझ्यापुढें ठेवला. परंतु त्याहि वेळेला मीं तो उघडला नाहीं. जेवण होतांच मी उठलें व पुनः आवरा-आवर करून तो पुडा कपाटांत ठेवला. तेहि आईंनी पाहिलें. नंतर दुंपारच्या चहाच्या वेळी पुनः तो पुडा पुढें आला. लाडू मला आवडत नसल्यामुळें मी त्याहि वेळेला तो उघडला नाहीं. मीं पुन्हां तो कपाटांत ठेवला. रात्रीच्या जेवणाच्या वेळीं पुनः तो पुढें आला. त्या वेळीहि मीं तो उघडला नाहीं. तेव्हां आई म्हणाल्या '' जोपर्यंत तूं हा लाडू खाणार नाहींस तोपर्यंत तो असाच पुढें येईल. देवानें दिलेल्या अन्नाला असा नकार देऊं नयें.'' शेवटीं आईंनी तो लाडू मला खायला लावलाच.

'एकदा एक बाई आईला भेटायला आली. मी लिहीत बसलें होतें. मला पहातांच तिने आईला विचारलें ''ही बाई कोण ?''

आईने सांगितले, ''माझी मुलगी,'' त्या बाईला आश्चर्य वाटलें.

एवढें दिवस ही मुलगी कुठें गुप्त झाली होती असें तिच्या तोंडावरून तिच्या मनांत आलें असावे असें दिसलें. परंतु **''माझी मुलगी''** या आईच्या शब्दानें माझें हृदय मात्र कृतज्ञतेनें भरून आले. ''माझी आई.'' आई हा प्रेमळ शब्द मला पुनः लाभला. परंतु दुर्दैवाने तो पुनः काढून घेऊन मला पुनः मातृहीन केलें...''

आई ख्रिस्तायन लिही व तें वाचूनहि दाखवीं. कोणीं ख्रिस्तायन वाचून दाखवायला बोलावले की ती कावरीबावरी होई. ख्रिस्तायन वाचून दाखविल्याने दोन गोष्टी होत. एक ते लोकांना कसें काय आवडतें कळे व दुसरे कांहीं चूक राहिली असेल तर ती लक्ष्यांत येई. ह्या वाचनामुळें तिला आणखी एक कन्या प्राप्त झाली होती. त्या कन्या म्हणजे भुसावळच्या डॉ.पद्माबाई शिंदे.[१] ह्या कन्या आपल्या आईला आजी म्हणत ! त्यांचे पति डॉ. शिंदे[२] तिला आई म्हणत ! ती त्यांना लिहिलेल्या पत्राखालीं नवऱ्याची आई व बायकोची आजी अशी सही करी ! व लोकांना मात्र सांगे की पद्माबाई माझी मुलगी आहे.

एकदा पद्माबाईंनी भुसावळला तेथील मातृसंघातर्फे आईला ख्रिस्तायन वाचण्यास बोलाविलें. संघांतील स्त्रियांनी तिच्या स्वागताची जोराची तयारी चालविली होती. पण लेंकूरवाळया बायकांना त्रास होऊं नयें म्हणून आई मध्यरात्री तेथें अचानक जाऊन पोंचली आणि मग हमाल आणि ती बसली पद्माबाईंचे घर शोधीत.

तेथें असतांनाची एक आठवण पद्माबाई सांगतात—

''एकदा रविवारीं दुपारी तीन वाजतां एक उघडानागडा मनुष्य धापा टाकीत दाराशीं येऊन उभा राहिला. आजी दरवाजांतच आरामखुर्चीवर पडल्या होत्या. मी घरांत कांहींतरी कामांत होतें आजी कोणाशीं तरी बोलत असलेल्या मी ऐकल्या. मला वाटलें कीं, ' आलें असेल कोणी तरी आजीला भेटावयास.' इतक्यांत आजीनें मला हांक मारली 'अग पद्माताई, हे बघ कोण तुला भेटावयास आलेत; चल जेवणाचें आमंत्रण आहे.' मला वाटलें खरेंच. डोकावून बघतें तो हा विचित्र मनुष्य उभा. तो रडून आजीस कांहीतरी सांगत होता. आजीनें त्याला मोटार आणावयास सांगितलें. तो मनुष्य गाडी आणण्यास गेल्यावर त्या मला म्हणाल्या की, 'चल खाडेमोंड येथें आपल्याला जावयाचें आहे. त्या माणसाची बहीण अडलेली आहे. आज तीन दिवस झाले पसारा पडलेला आहे. अग मी मिरजेची नर्स तुझ्याबरोबर आहे ना ?' मी म्हणाले 'आजी हा मनुष्य विलक्षण दिसतो. बरं त्या

१. डॉ.पद्माबाई शेवटी प्रेतक्रियेच्या वेळी आपल्या मुलीसह आल्या तेव्हां लोकांना वाटले कीं ताराबाईच आल्या व तरी कांही पत्रांतून प्रसिद्धहि झाले होतें.)

२. डॉ.भास्करराव सदानंद शिंदे

खाड्यामोंड्यांवर मोटारचा रस्ता नाहीं; जाणार कसें ? आणि तुमच्या सोबतीची मला कशी काय मदत होणार ?'

इकडे त्या मनुष्यास मोटार कोणी देईना. जाण्यायेण्याचें भाडें बारा रुपये मागूं लागले. तो मनुष्य गयावया करीत सगळीकडे हिंडूं लागला पण मोटारवाले सांगूं लागले कीं तिकडे मोटारचा रस्ता नाहीं, आम्ही आमचा जीव धोक्यांत कां घालावा? हो-ना करतां करतां दहा रुपयास मोटार ठरली. मला तर मनांतून त्या गांवांत जाण्याची भीति वाटूं लागली, पण आजींचा निश्चय पाहून मलाहि धैर्य आलें व आम्ही मोटारमध्यें जाऊन बसलों. आजी तर माझ्याहि आधीं गरम पाण्याचा तांब्या घेऊन जाऊन बसल्या. भुसावळ पासून दोन मैल पुढें गेल्यावर शेतामधून मोटार धक्के खात खात जाऊं लागली. तो बिचारा मनुष्य मोटारचे पुढें धांवून समोर असलेले काटे दगड एकीकडे सारून मोटारला रस्ता करीत होता. आजी मला म्हणाल्या,'पद्माताई ही सारी माया बरं ! बिचारा बहिणीच्या जिवासाठीं धडपड करीत आहे.' एके ठिकाणीं तर बाभळीच्या कांट्यांचा मोठा ढीग आडवा आला, तेव्हां आम्ही दोघीहि खालीं उतरून कांटे झाडूं लागलों. तों तो मनुष्य आम्हांस म्हणूं लागला 'कुऱ्ह्यावरून चांगला रस्ती मी दाखवू देईन. तुम्ही कांहीं काळजी करूं नका.'

शेवटीं एकदाचें आम्हीं त्या गांवीं जाऊन पोहोचलों. बाळंतिणीची सुटका सुखरूप झाली. सर्व व्यवस्थित झालें. घराच्या बाहेर येऊन पहातों तों तो मनुष्य अदृश्य! आम्ही गप्प झालों. पण आजी उठल्या व इकडे तिकडे हिंडून त्या माणसाला त्यांनीं हुडकून काढलें. हो ना करतां करतां त्या मोटारवाल्याच्या हातावर त्यानें दहा ऐवजीं पांच रुपये टाकले, व म्हणाला,'जा आतां आल्या रस्त्यानें.' 'गरज सरो आणि वैद्य मरो' या म्हणीचा प्रत्यक्ष अनुभव आम्हांला आला. आजी म्हणाल्या,'पद्माताई माझ्या तरुणपणाच्या दिवसांत हा अनुभव मला पदोपदीं आलेला आहे. अग मीं फुकट बाळंतपणें करून वर बाळंतविडे माझ्या पदरचे वाटलेले आहेत चल लवकर आपणांस दिवे लागणीच्या आंत घरीं पोंहचले पाहिजे. आतां एक अक्षर बोलूं नकोस.' मला मोठी मौज वाटली. आणि आम्ही गेल्या वाटेनें घरीं सुखरूप पोंहचलो. वाटेंत आजीनें अनेक गंमतीच्या गोष्टी सांगून मला व मोटार ड्रायव्हरला खूप हंसविलें.''

फेब्रुवारी महिना उगवला. माझ्या पत्नीची प्रकृति अतिशय बिघडली. ऑपरेशन केलें पाहिजे असे डॉक्टर सांगूं लागले. तिला साधें औषध घ्यायला लावणें कठीण तेथें ऑपरेशनची बात कशी काढायची? मी मोठ्या फिकीरींत पडलों. पण आम्हीं आईला कांहीं सांगितलें नाहीं. तिचा स्वभाव असा होता कीं कांहीं काळजी करण्यासारखें आलें कीं

मग तिला कांहीं सुचत नसे. पण हें आमच्या घरच्या इतर माणसांबद्दल. मात्र स्वतःच्या बाबतींत ती भयंकर खंबीर होती.

जळगांवच्या फडणीसांचे [१] चिरंजीव वारले होते. एवढा मोठा कर्तासवरता मुलगा वारलेला ऐकून आई फारच हळहळली होती. त्याचें पत्र आलें कीं नातवाची मुंज आहे तरी तुम्हीं जरूर मुंजीला यावे. ती मला म्हणाली, ''दत्त, मुंजीला मला जरूर गेलें पाहिजे.'' मी कसा मोड घालूं? मीं म्हटलें, ''जा.'' तिनें ताबडतोब तयारी केली व मीं तिला स्टेशनवर पोंचविली.

इकडे पाटणकर, माझी पत्नी व मी तिच्या ऑपरेशनचें काय करायचें ह्याबद्दल फिकीरींत व विचारांत पडलों. शेवटीं ठरलें कीं अकोल्याला बापू साहेब फडक्यांकडे [२] जाऊन त्यांची ट्रीटमेंट घ्यावयाची. बापूसाहेबांनीहि चटकन् या म्हणून म्हटलें व आम्ही तिघे अकोल्याला गेलों. अकोल्यास बातमी कळली कीं आई, माईसाहेब कोल्हटकरांना भेटायाला खामगांवला जाणार असून अकोल्याला सुद्धां येणार ! ही बातमी ऐकून मी अगदीं आश्चर्यचकित झालों. ख्रिस्तायनाचें काम विसरून ही व्हिजिटिंग टूर काढण्याचें आईनें काय मधेंच काढलें मला कळेना. तिच्यासाठीं आम्ही एक दिवस आणखी अकोल्याला काढला. आई कांहीं आली नाहीं. तिच्या मनानें सर्व माणसांना भेटून घ्यावयाचें घेतलें होतें. जळगांवास ती सर्व माणसांना भेटली होती. पुढें खामगांवला जाऊन मुद्दाम माईसाहेबांना भेटावयाचें होतें. कारण तात्यासाहेब वारल्यानंतर त्यांची तिची भेट झाली नव्हती.

पण आईची ती इच्छा राहिली. कारण जळगांवास तिला एन्फ्लुएंझा झाला. डॉ.पद्माबाई त्यासंबंधीं लिहितात-

''आजी गेल्या फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत जळगांवला नानासाहेब फडणीसांच्या घरीं मुंजीला आल्या असतांना सौ. आनंदीबाई शिर्के यांचें मला पत्र आलें कीं ''आजी जळगांवला आल्या आहेत. सवड झाल्यास भेटून जा.'' त्यांच्या पत्राप्रमाणें मी जळगांवला गेलें. आजींच्याच शब्दांत सांगायचें म्हणजे त्यांची लोळणफुगडी चालली होती. आनंदीबाईचें अंथरूण एका बाजूला व आजींचे दुसऱ्या बाजूला. दोघीहि एन्फ्लुएंझानें आजारी. मीं आजींना म्हटलें की ''भुसावळला घरीं चला. दोन पेशंट एके ठिकाणीं नकोत.'' आम्ही दोघी घरीं आलों. आजी सारख्या रात्रीं कण्हत होत्या. मीं विचारलें, ''आजी, कां कण्हतां?'' तों म्हातारी जोरांत म्हणते ''कांहीं नाहीं. कण्हलें म्हणजे बरं वाटतं.'' मी

१. काव्यरत्नावाली-कर्ते नारायण नरसिंह फडणीस यांचे चिरंजीव लक्ष्मणराव. हे जळगांवास वकील होते.)
२. (नारायण खंडेराव उर्फ बापूसाहेब फडके.)

म्हटलें, ''आजी हातपाय चेंपू का'' तों ''नको नको, आतां कांहीं दुखत नाहीं'' असें ताबडतोब त्या म्हणाल्या. मला रात्री बाळंतपण करण्याकरितां कोठेंतरी बाहेरचें बोलावणें आलें होतें. मी रात्रीं अकरा वाजतां घरीं आलें. पहातें तों मोलकरीण आजींचे पाय चेपीत बसलेली. मीं म्हटले ''आजी हें काय? तुम्ही मला म्हणालां कीं, कांहीं दुखत नाहीं.' तो आजी म्हणाल्या 'तुला माझ्याकरतां फार त्रास पडतो.''

जरा बरें वाटल्यावर खामगांवास जाऊन प.वा.श्री.कृ कोल्हटकर यांच्या पत्नींची भेट घेण्याची त्यांची फार इच्छा होती. त्यांची आठवण झाल्यामुळें त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. पण त्यांच्या अत्यंत अशक्तपणामुळें मला त्यांना खामगांवास जाऊं देतां येईना.दत्तोपंतदादांचेंहि पत्र आलें कीं, आईला घरीं धाडून द्या.त्याप्रमाणें मी त्यांची घरीं जाण्याची तयारी केली, पण नको नको म्हणत असतांना त्या वाटेंत उतरल्याच. 'सगळ्यांना भेटावसं वाटतं, परत केव्हां येतें, कुणाला ठाऊक' असें म्हणून जळगांवला उतरून प्रत्येक ओळखीच्या माणसास भेटून मरणापूर्वी केवळ आठच दिवस त्या घरीं गेल्या.''

जळगांवास असतांना सौ. आनंदीबाई शिर्क्यांकडे ती कांहीं दिवस होती. त्यासंबंधीं आनंदीबाई लिहितातः-

''काकू म्हणत ख्रिस्तायन लिहिण्यापूर्वी पुष्कळदां मनांत येई कीं, ख्रिस्ती होऊन मीं कोणतें कार्य केलें? माझी स्वतःची आध्यात्मिक उन्नति, माझें स्वतःचें बरें, ह्या पलीकडे काय झालें? पण जेव्हां ख्रिस्तायन लिहायला घेतलं अन् पुरं केलं तेव्हां माझं तें कोडं सुटलं. माझ्या हातून हें कार्य व्हायचं होतं म्हणून मला ख्रिस्ती होण्याची प्रेरणा झाली. आतां मला वाटूं लागलं कीं माझं ख्रिस्ती होणं सार्थकीं लागलं.''

''येथें असतांना काकू सांगत होत्या 'डॉ. आंबेडकरांच्या घोषणेनंतर माझ्याकडे कांहीं हरिजन मंडळी येऊन म्हणाली कीं, ''आई, आतां आम्ही ख्रिस्ती होणार आहोंत !''

''खरं? कशाला रे बाबांनो तुम्हीं ख्रिस्ती होणार?''

''हिंदूंची खोड मोडायला!''

''अस्सं? मग माझं ऐका, तुम्हीं ख्रिस्ती होऊं नका. कारण ख्रिस्ती झाल्यावर तुम्हांला सूड, द्वेष असलं कांहीं करतां येणार नाही. ख्रिस्ताची ती शिकवण नाहीं. दया, प्रेम व त्याग ही ख्रिस्ताची शिकवण आहे.''

त्यांच्या सत्कार-समारंभाच्या वेळीं एक बाई म्हणाल्या—

''काकू तुम्हीं ख्रिस्ती झालांत म्हणून तुमच्या आंगच्या गुणांचा विकास व्हायला एवढा

वाव मिळाला नी या योग्यतेला तुम्ही आलांत. हिंदूच राहिलां असतां तर केरपोतरें नी सोवळंओवळं करण्यांत जन्म गेला असता.''

काकू म्हणाल्या,—''खरं आहे, ख्रिस्ती समाजाच्या कमालीच्या दाक्षिण्यामुळं आणि शान्तवृत्तीमुळं माझ्या अंगी सभाधीटपणा बरीक आला''

माझ्याकडे असतांना दररोज त्यांना कोणी ना कोणी भेटायला येत. मंडळी उठून गेल्यावर त्या विचारीत—''काय ग ? बोलतांना माझं काहीं चुकलं तर नाहीं?''

असें कां विचारतां म्हणून प्रश्न करतां त्या म्हणाल्या,

''मला कमळा [१] नेहमीं म्हणते—काकू, तुम्ही अघळपघळ बोलत जाऊं नका. थोर साहित्यिक लोकांसारखं मोजकं बोलत जा. पण मला तें साधतच नाहीं ग. अन् नकोच साधायला!''

एके दिवशी असेंच मंडळींत बोलतांना त्या म्हणाल्या,

''जरासं कुठं आंग तापलं.तर आज कित्ती मंडळी मला पहायला आली ! पुष्कळ लोक मला पाह्यला येतात ग; पण मी कोणाला पसंतच पडत नाहीं !''

सर्व मंडळी गेल्यावर मी म्हटलें,''काकू, कमलाबाई म्हणतात तें खरं. तुम्ही मघांशीं बोललांत तें बोलायला नको होतं. लोक काय म्हणतील?''

''काय म्हणतील? म्हणतील जिला आपण कोणी मोठी अलौकिक व्यक्ति समजत होतों ती आहे आपली एक साधारण म्हातारी, एवढंच ना?''

नंतर आपला हात हालवीत त्या म्हणाल्या,''अग माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की, इतके लोक मला भेटायला येतात, पण ज्याची वाट पाहतें, तो मात्र येत नाहीं. पहातेस काय अशी ! मृत्यु ! मी आतां त्याची वाट पाहत आहे.''

अगदीं हंसतहंसत त्या बोलत होत्या. मीं म्हटलें,''कांहींतरीच काय बोलतां? चांगले दांत बसवले आहेत-आतां तुम्ही पुष्कळ वर्ष जगाल''

''अग ह्या कुंदकळ्या म्हणजे शोभेचा दागिना आहे. दांत नवे असले तरी पण पोट जुंन आहे ना? दातांनी फुटाणे सुद्धां चावतां येतील, पण पोटाला सोसलं पाहिजे ना? तसं म्हटलं तर आतां जगण्याचं कारणच नाहीं. स्मृतिचित्रं झालीं. प्रतिज्ञा केली होती कीं ख्रिस्तायन पुरं करीन तेव्हां लेखणी खालीं ठेवीन त्याप्रमाणं ख्रिस्तायन पुरं झालं. आतां कांहीं राहिलं नाहीं.''

१. प्राचार्य भा.ल.पाटणकर यांच्या पत्नी कमलाबाई.

## — १६ —

# विसांवा

आठ दिवस राहिले.

इतिहासाची पुनरावृत्ति होते म्हणतात तसें झालें. अठरा * वर्षांपूर्वींची गोष्ट. आठच दिवस राहिले होते. आमच्या घरांत मी फार आजारी होतों. पपा × पुण्याहून मुंबईस आले. माझी पत्नी आजारी होती, आई जळगांवाहून आली होती व मी साधारण आजारी होतों एवढाच फरक.

आईला इन्फ्लुएन्झा झाला हें डॉ. पद्माबाईंच्या पत्रावरून कळलें व तिचा खामगांवला जाण्याचा बेत अकोल्यापर्यंत कुजबुजला गेला तो तेथें ऐकूं आला. पत्नीला अकोल्याला ठेवून मी नाशकास परत आल्यावर मला चैन पडेना. मीं नानाला जळगांवला पाठविलें. तो दुसऱ्या दिवशीं आईला घेऊन आला.ती बरी दिसली. आजारी होती असें डॉ. पद्माबाईंचे पत्र पाहून मीं जी कल्पना केली होती तशी ती मुळींच दिसली नाहीं. आल्याबरोबर भेटतां येईल तेवढ्यांना ती भेटून आली. मीं म्हटलें, ''आई आतां तूं दमली आहेस. नुकतीच तापांतून उठली आहेस. तेव्हां आतां कांहीं दिवस ख्रिस्तायन राहूं दे. इकडेच रहा,'' तिनें माझे म्हणणें कबूल केलें. पण इतक्यांत सोपानदेव रेकॉर्डिंगसाठीं मुंबईला जायला निघाले व त्यांच्या पत्नींना [१] सोबत म्हणून आई त्यांच्याकडे निजायला गेली. आजीबाईंबरोबर मुलेंहि गप्पा मारायला गेलीं. साडेआठ नवाच्या सुमाराला मुलें येऊन सांगूं लागलीं आजीबाई धर्मात्मा पहायाला निघाल्या.

मी नानाला पळत जाऊन तिला थांबवावयाला सांगितले. पण नाना परत येऊन सांगूं लागला कीं त्या गेल्या.

मला आईचा मोठा राग आला. नुकतीच आजारांतून उठलेली. थंडीचे दिवस. नवाच्या शोला गांवांत सिनेमाला जाऊन रात्रीं बारा एकला परत यायचें. पण तिच्या उत्साहाला कधीं सीमाच नव्हत्या.

पपा वारल्यावर आई म्हणे,''टिळकांनी आपलें मरण ओढवून घेतलें. स्वर्गांत त्यांची

* १७ वर्षांपूर्वींची × पा.टिळक. १. लीलादेवी सोपानदेव चौधरी

गांठ पडली म्हणजे मीं त्यांच्याशीं आधीं सप्पाटून भांडेन.'' आईला जसें पपांशीं भांडावेसें वाटलें तसें आज मला तिच्याशीं भांडावेसें वाटतें. दुसऱ्या दिवशीं बोललों नाहीं पण तिसऱ्या दिवशीं बोललों. तो ती म्हणाली, ''अरे परवा गेलें अन् कालहि पुन्हां गेलें होतें!'' मी अगदीं हतबुद्धच झालों. तिला म्हटलें, ''आई आतां तें कांहीं चालायाचें नाही तूं आतां इकडे निजायला ये पाहूं कशी आजपासून.'' तेव्हां तिनें कबूल केलें कीं आतां जपेन व सोपानदेव परत येतांच घरीं येईन.

पण तो योग आला नाहीं. त्याच रात्रीं दोन तीनच्या सुमाराला लीलाबाई घाबऱ्या घाबऱ्या येऊन हांका मारूं लागल्या. नाना व मी खालींच निजलों होतों. लीलाबाई सांगू लागल्या, ''आई फार घाबरल्या आहेत, चला. त्यांना फार थंडी वाजते आहे.'' मी पुढें धांवत गेलों. नानानें व अशोकनें मागाहून गरम पाणी करून रबरी पिशव्या, औषधें वगैरे आणलीं. आईला इतकी कमालीची थंडी वाजून आली होती कीं सारीं पांघरुे घातलीं. वर अशोक व नाना निजले. आंत गरम पाण्याच्या पिशव्या ठेवल्या तरी ती थडथड थडथड उडत होती. सोपानदेवांच्या घरी कोणी पुरुषमाणूस नव्हतें. दोन लहान लहान मुलें व लीलाबाई. नाना, अशोक व मी पहाटपर्यंत बसून राहिलों. पहाटे तिला ताप भरला.

मला त्या दिवशी नांदगांवला काम होतें व दुसऱ्या दिवशीं जळगांवला काम होतें. जळगांवचें काम दुसऱ्या दिवशीं सकाळींच करून परत तापाच्या पाळीपर्यंत येतां येण्यासारखें होतें. पण पाय निघेना. आई सारखी म्हणत होती की, तूं कामाला जा. तिचे प्रेमळ शब्द अजून माझ्या कानांत घुमतात.

''बाळ्या जा बरं. मी बरी आहे. काळजी करूं नको. जा बरं बाळ्या.''

ती मला कधीं बाळ्या म्हणत नसे. पण मी जाईपर्यंत आपल्या अत्यंत प्रेमळ स्वरानें तिचें एकसारखें हेंच चाललें होतें. हाताला ताप लागत नव्हता. पण अंगांत बराच ताप असला पाहिजे किंवा तिच्या मानानें तो ताप बराच असला पाहिजे. मी डॉक्टरला आणलें व त्यांनीं मलेरिया आहे अशी खात्री दिल्यावर मी निघालों. जातांना तिच्या जवळ जाऊन उभा राहिलों. तिचे डोळे मिटलेले हाते. झोंप लागली असावी असें मला वाटलें. पण मी जवळ जातांच ''बाळ्या जा बरं मी बरी आहे. काळजी करूं नको'' असें ती म्हणाली. मला कसेंतरी वाटलें. पण मी तसाच निघालों. नांदगांवला कसेंतरी काम आटोपून तसाच रात्रींच्या गाडीनें जळगांवास पोंचलों. मध्यरात्र टळून गेली होती. स्टेशनांत गाडी शिरतांच फ्लॅटफॉर्मवर रा. फडणीस [१] दिसले. त्यांना पाहतांच पोटांत धस्स झालें.

१. रामकृष्ण नारायण फडणीस, काव्यरत्नावलीकारांचे ज्येष्ठ चिरंजीव.

''चला घरीं चलतां? पण मला वाटतें तुम्ही आतांच परत जावें. आतां गाडी आहे. पाटणकरांची तार आली आहे.''

मीं तार वाचली. तारेंत मला परत बोलावलें होतें. पण कां हें कांहीं नव्हतें. त्यामुळें मी अगदींच घाबरून गेलों. आपण नाशीक सोडल्यावर कांहीं कमजास्त झालें कीं काय कळेना. सारी रात्र बसून पहाटें नाशकास उतरलों. आतां काय झालें आहे समजायचें कसें? घरीं येतांच आधीं समोर सोपानदेवांच्या घराकडे नजर फेंकली. बाहेर एक कंदील जळत होता. इकडे आमच्या घरांतहि सामसूम दिसत होती. पुन्हां घाबरलों. नानानें दार उघडतांच आजीबाईंचें कसें आहे म्हणून विचारलें. तो म्हणाला आजीबाई बऱ्या आहेत. तेव्हां जिवांत जीव आला.

पाटणकरांना रात्री डॉ.वर्टींनीं [२] सांगितलें होतें कीं हार्टला अतिशय अशक्तता आलेली आहे. तें ऐकून पाटणकरांनी मला ती तार केली होती. कांहींहि असलें तरी ती बरी आहे हें ऐकून आनंद वाटला.

त्या दिवशीं तिला भेंटायला खूप माणसें आली. ताप आला नाहीं. मात्र विनोदाला व प्रेमळपणाला भरतें आलें.

कांहीं स्त्रिया भेंटायला आल्या तेव्हां आई त्यांना म्हणाली,''अग तुम्ही माझा सत्कार-समारंभ केलांत ना? तेव्हां मला लागली आहे दृष्ट. थोड्याशा मीठमोहोऱ्या ओवाळून टाका माझ्यावरून.''

सर्वांना मोठी गंमत वाटली व त्या हंसूं लागल्या. तिचें पोट आतां अतिशय दुखूं लागलें. तरी ती दुसऱ्यांना हंसवीत होती व त्यामुळें आम्हांला सर्वांना मोठा धीर येत होता. पांगारकरबुवा भेंटायला आले. त्यांना ती म्हणाली,''या बुवासाहेब! आत्मा व कुडी ह्यांचा झगडा चालला आहे. पाहूं या आतां कोण जिंकतें तें.''

संध्याकाळीं डॉ.वर्टी म्हणाले, हें पहा पोटांत असें मधेंच टेंगळासारखें कांहींतरी दिसतें आहे. मला वाटतें तुम्ही दुसऱ्या एखाद्या डॉक्टरला कन्सल्टिंगकरतां आणा. डॉ.वाबळे [३] ह्यांनीं कानडा हॉस्पिटलच्या डॉ.रॉबिनसनला आणलें. त्या तिघांनीं मिळून बराच विचार केल्यावर डॉ.वाबळे व डॉ.रॉबिनसन ह्यांनीं सर्जन मेजर ग्रे ह्यांना आणलें.

२. डॉ.वामनराव अंबाजी वर्टी)

३. डॉ.भास्कर बापूराव वाबळे, हेल्थ ऑफिसर, ना.म्यु.

इकडे ही गडबड चालली आहे तों जहाल मंजुळाबाईंची मुलगी तुळसाबाई[४] येऊन दाखल झाली. त्यांना आई आजारी असल्याची गंधवार्ताहि नव्हती. तुळसाबाईंना पाहून आईला आनंद वाटला.

डॉक्टर लोकांनीं चिकित्सा करून ठरविलें कीं, इन्टेस्टाईनल ऑबस्ट्रक्शन आहे व त्यांचे ऑपरेशन झालें पाहिजे. त्यांचें बोलणें इंग्रजींत चाललें होतें. पण आईला तें सारें कळत होतें. मला एका बाजूला घेऊन डॉ.रॉबिनसननें विचारलें,''ऑपरेशन करायाला पाहिजे. तुमचें काय म्हणणें आहे?'' मीं म्हटलें,''मी तिला विचारतों.'' इतक्यांत लीलाबाई आईला सांगू लागल्या,''आई, तुम्ही भिऊं नका. ऑपरेशन करणार नाहींत कांहीं.'' पण आई त्यांना हंसून म्हणाली,''अग, ऑपरेशन करायाचेंच असलें तर केलेंच पाहिजे. मला ऑपरेशनचें कांहीं भय वाटत नाहीं.''

आईचे हे धीराचे शब्द ऐकून मी म्हणालों,''आई! ऑपरेशन करायाचे आहे. तुझ्या मनाची तयारी आहे ना?'' ती म्हणाली,''मी अगदीं तयार आहे.''

''वीक हार्ट' म्हणून मला तार आली होती ! तेथें असलेल्या आमच्यापैकीं एकाचेंहि 'हार्ट' तिच्याइतकें सशक्त नव्हतें.

आईला डॉ.वाबळेंच्या मोटारमध्यें निजविल्यावर निघतां निघतां आई म्हणाली,''अग, माझ्या बहिणीला सांगा मी परत येईन काळजी करूं नको. माईसाहेब  बेदरकर बिचाऱ्या आजारी होत्या. पण त्या तशाच उठून काठी टेंकीत टेंकीत बाहेर आल्या व त्यांनी आईला भेंटून घेतलें. रात्रभर दवाखान्यांत ऑपरेशवांचून जे करतां येण्यासारखें होतें तें सारें मेजर ग्रेनी करून पाहिलें. पण कांहीं उपयोग झाला नाही. सकाळींच आठ वाजतां ऑपरेशन करण्याचे ठरलें.

तिच्या खोलींतून बाहेर जाण्याच्या आधी नर्सबाईंनी तिचे केस विंचरून दोन वेण्या घातल्या. मी ध्रुवाला घेऊन तिच्याकडे गेलों तिर ती त्याला म्हणाली, ''बघ ध्रुवा, कसे लहान पोरीसारखे माझे सोपस्कार करताहेत.''

स्ट्रेचरवर घालून तिला ऑपरेशनरूममध्यें नेतांना तोंडावर ऊन येत होतें म्हणून

४. तुळसाबाई धोंडिबा सूर्यवंशी.

तुळसाबाईंचे चिरंजीव जयसिंग सांगतात,''आईला लक्ष्मीबाईंचें पत्र आले होतें, मी आजारी आहे. फार काळ राहीन असे वाटत नाहीं. तूं आलीस तर मला आनंद वाटेल. म्हणून आई ताबडतोब नाशीकला गेली.'' ही  हकीकत देनाटि ना माहीत नसावी.)

डॉ.शेखबाईंनीं [१] तिच्या तोंडावर चादर घातली. ती दूर सरकवूंन त्यांना आई म्हणाली, ''अग, मला कां तूं भित्री समजतेस ?''

ऑपरेशनरूमच्या बाहेर आम्ही सगळे चिंताग्रस्त मनानें उभे होतों. आईला आंत नेल्यावर एक घंटाभर तरी तिचें बोलणें ऐकूं येत होतें. मला वाटे ऑपरेशन रहीत झालें बरें का. तेवढेंच समाधान वाटलें. इतक्यांत एक नर्स कशालाशी बाहेर आली. तिला विचारतां ऑपरेशन चालू असल्याचें तिनें सांगितलें. आई डॉक्टरांशीं गप्पा मारीत होती व तेथेंहि थट्टा विनोद चालला होता ! शेवटीं मेजर ग्रेनींच तिला बोलूं नका म्हणून सांगितलें. आधीं आधीं ऑपरेशन स्पायनल इंजेक्शनवर झालें. शेवटी थोडा क्लोरोफार्म दिला. एकंदर अडीच तास ऑपरेशन चालून तें अगदीं यशस्वी झालें.

मेजर ग्रेनी मला तेथेंच एक खोली दिली होती. त्यामुळें मला आईंजवळ राहतां आलें. तुळसाबाई तर एकसारखी बसूनच होती.

ऑपरेशन संपलयावर अर्ध्या पाऊण तासानें आई शुद्धीवर आली. व मला म्हणाली,

''दत्तू, ध्रुव आला होता ना रे ? त्याची माया आहे रे मजवर. तो बिचारा बाहेर डोकावून जातो.''

मीं ध्रुवाला आणून तिच्यापुढें उभा केला. त्याच्या पाठीवर हात फिरविल्यावर तिला फार समाधान झालें, नाना तिच्याजवळ उभा राहिला होता. त्याची मॅट्रिकची परीक्षा जवळ आली होती. त्याला तिनें आग्रहानें परत पाठवून दिलें. माझ्या पत्नीला मी झाल्या हकिगतीचें पत्र टाकलें व कळविलें कीं, येण्याची घाई करूं नका, कारण घरांत दोन आजारी माणसांचे करणे फार कठीण जाईल. पण आपण येथील सामानसुमानाचीं बांधाबांधी आटोपतांच नाशकास येत असल्याचें तिचें पत्र आलें ! मी येऊं नको म्हणून तिला तार केली. इकडेअशी तार केल्याचें मी आईला सांगितलें असूनहि तिनें ''दोनतीन वेळेस रूथ आली का ?'' म्हणून विचारलें. तेव्हां मला मोठें चमत्कारीक झालें. तार नसती केली तर बरें झालें असतें असे मला वाटूं लागले. पण माझ्या तारेचा कांहीं उपयोग झाला नाही. रूथ आली व आईच्या उशाशी जाऊन उभी राहिली. तेव्हां आम्हां तिघांनाहि समाधान झालें. ऑपरेशन उत्तम झालें. तिसऱ्या दिवशीं आईनें मला सांगितलें आतां एकच टांका काढायाचा राहिला. मला आनंद वाटला. पण आतां तिला खोकला येऊं लागला व छाती भरूं लागली. आतां दोन दिवस राहिले होते. ह्या दोन दिवसांत तिनें जें धैर्य दाखविलें, जी उदारवृत्ति दाखविली, जी उमेद दाखविली ती खरोखर अवर्णनीय होती. रोगी अतिशय अशक्त झाला असल्यानें भेटायाला कोणाला येऊं

१ (डॉ.मिसेस हजराबी शमसुंद्दीन शेख)

देऊं नका असे डॉक्टरांनी मला बजावून सांगितलें होतें. तरी दिवसभर सर्व दर्जाचे स्त्रीपुरुष एकसारखे येत. त्यांची समजून करतां करतां आमची पुरेवाट होत होती. इकडे पुढल्या दारानें मी माणसें लावून द्यावीं तर मागल्या दारानें माणसें आंत येऊन बसत. आणि ह्यांत तिच्या मांग विद्यार्थी-विद्यार्थिनींपासून तो विद्वान मित्रमंडळीपर्यंत सर्वच तऱ्हेच्या श्रीमंतांचा व गरिबांचा भरणा होता.

ह्या दोन दिवसांत तेथें घडलेल्या बारीकसारीक गोष्टींची माहिती नंतर सोपानदेवांनी मिळवून जें लिहिलें आहे त्यांतून कांहीं आज खाली देता आहे.

''असल्या तऱ्हेच्या पोटाच्या ऑपरेशनचे रोगी सांभाळणें नर्सेसना फार अवघड होतें, कित्येक वेळेस त्यांचे हातपाय देखील बांधून ठेवावे लागतात. परंतु आमच्या आईचें नांव हास्पिटलमधील सर्व लोक घेत आहेत, कीं त्यांनी औषध घेण्याचे बाबतींत, इंजेक्शनचे बाबतींत किंवा इतर दुसऱ्या कोणत्याहि बाबतीत यत्किंचितहि त्रास दिला नाही. हॉस्पिटलमधील तीन दिवसांत एकदाच मात्र चिकनसूपचा चमचा घेतांना त्यांनी वांकडें तोंड केलें. कारण त्यांनी जन्मांत कधीहि मांस खाल्लें नव्हतें. तरी नापसंतीदर्शक शब्द तोंडांतून काढला नाहीं. आपल्याला वेदना होतात असें त्यांनी नर्सला केव्हांहि भासूं दिलें नाहीं त्यांच्या जवळ असलेल्या तुंळसाबाई श्री. भाऊसाहेबांना बाहेर येऊन दोनदां तीनदां सांगून गेल्या कीं आई म्हणतात, '' प्रायमस स्टोव्ह येथून काढ व वातीची चूल आणून ठेव.'' भाऊसाहेबांना वाटलें आईंनीं अशक्तपणामुळें हा असा नाद घेतला असावा, परंतु त्यांना आईंनीं जवळ बोलावून सांगितलें, ''या नर्सेस मोठ्या अचपळ असतात. एखादी पदर-बिदर जाळून घेईल. म्हणून हा स्टोव्ह काढून वातीची चूल ठेव.'' स्वतः दुःखांत असतांनाहि दुसऱ्याची काळजी घेण्याची त्यांची वृत्ति पाहून परिचारिकांना आश्चर्य वाटलें असेल.

बिछान्यावर आणल्यावर त्यांच्या अंगाला एक कुसळ टोंचलें ते चांचपून त्यांनी हातांत घेतले. व जवळच्या परिचारिकेला दाखवून म्हटलें, '' हीच कां ग तुमची व्यवस्था ? माझ्या जागीं एखादी लेंकूरवाळी बाई असती तर लेंकराला किती त्रास झाला असता ! यापुढें चादरी चांगल्या तपासून घेत चला.'' ही गोष्ट सांगतांना परिचारिका श्री. दुंर्गाबाई पिंगळे डोळ्यांत पाणी आणून म्हणाल्या, '' असा आपलेपणानें आम्हांला कोणीं उपदेश केला नव्हता.''

एका खासगी परिचारिकेचें थर्मामिटर फुटलेलें आईने पाहिलें. त्यांनी लागलींच भाऊसाहेबांना आपलेजवळ बोलावून सांगितले, ''बिचारीच थर्मामिटर फुटला आहे तो

तिला विकत घेऊन दे. तुला खर्चाला पैसे हवे असतील तर माझ्या कपाटामध्यें डेली लाईट * पुस्तकाच्या पोटांत पैसे आहेत ते घे.''

० ० ० ०

आपल्या कांही आशा अपुऱ्या राहिल्या आहेत असें त्यांनी मुळीच दाखविलें नाहीं. मरणाचें त्यांना भय वाटत नव्हतें. मात्र आपलें थोडेसे काम व्हायचे उरलें आहे असें त्यांना वाटत असावें. कारण त्या एका परिचारिकेला म्हणाल्या '' माझी भाकर तव्यावर भाजून झाली. आतां फक्त विस्तवावर शेकायची राहिली आहे. याकरितां ती शेकावीशी वाटते. लेंकरांना ती बाधायला नको.'' स्मृतिचित्रांचा चवथा अर्धवट राहिलेला भाग व ख्रिस्तायनाचे शेवटचे अध्याय तपासावयाचे राहिले आहेत ते संपवून मग आपली जीवितयात्रा संपवावी असा त्यांचा मानस असावा.''

तेवीस तारीख. रात्री पाटणकर दवाखान्यांतून परत गेले. त्यांनीं मला सांगितलें, ''डॉक्टर म्हणतात आतां बरें आहे. तेव्हां तूं नीज. तुळसाबाई तुला उठवितील.'' मला तें खरें वाटलें. पाटणकरांची रात्री तेथेंच आईजवळ राहण्याची इच्छा होती. पण इतिहासाची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून मुद्दाम तें गेले. पपांच्या मृत्यूच्या आदल्या रात्री पाटणकरच त्यांच्याजवळ होते व ह्या वेळेस मुद्दाम जाणूनबुजून तो प्रसंग टाळला म्हणून नाहींतर ह्याहि वेळेस तेच आईजवळ रात्रींचे बसले असते.

मला मोठें समाधान वाटलें. मी समाधानानें जाऊन निजलों. पाटणकर व रूथ मी निजल्यावर केव्हां गेलीं कोणास ठाऊक. पण फार वेळ झाला नसेल. मध्यरात्र टळून गेल्यावर तुळसाबाईंनीं येऊन मला उठविलें.

''भाऊ, चला आई बोलावतात.''

बारा वाजून पन्नास मिनिटें झाली होतीं. आईनें मजकडे पाहिलें नाहीं. कोणाकडेच पाहिलें नाहीं. तिला झोंप लागत होती. तिचे डोळे मिटलेले होते. तोंडावर समाधान पूर्णपणे विलसलेलें होतें. मृत्युच्छायेच्या खिंडींतून ती चालली होती तरी मृत्यु तिच्यावर परिणाम करीत असलेला दिसत नव्हता.

तुळसाबाई हंबरडा फोडण्याच्या बेतांत होत्या. मीं त्यांना बाहेर लोटलें. इतक्या समाधानानें चाललेल्या प्रवाशाला आपल्या रडण्याओरडण्यानें दुःखाची झळ मला लागूं द्यायची नव्हती. मला रडूं आवरेना. पण तो प्रसंग अत्यंत धैर्यानें व आईच्या स्वतःच्या

* डेली लाईट हे इंग्लिश पुस्तकांचे नांव नव्हें. रोजच्या वाचनाच्या मराठी पुस्तकाचाच बाईंनी हा निर्देश केलेला आह

वृत्तीला शोभेल अशा रीतीनें पार पाडावयाचा होता. मीं परमेश्वराची व आईची मनांतल्या मनांत प्रार्थना केली व परमेश्वराच्या कृपेनें व आईच्या शीलप्रभावानें त्या प्रसंगाला तिला शोभण्यासारखें मला वागता आलें.*

अठरा तासांनी तिचें शरीर स्मशानभूमीकडे नेंलें. प्रेतयात्रेच्या वेळेपर्यंत तिच्या चेहऱ्यावरील स्मित व समाधान हीं नाहीशीं झाली नाहींत ! प्रेतयात्रेस सर्व धर्मांचे, सर्व तऱ्हेचे, सर्व विचारांचे युरोपियन व हिंदी स्त्री-पुरुष नाशकाहून व परगांवाहून आले होते.

आईच्या चरित्राकडे व शेवटच्या घटकेकडे पाहिल्यावर मला त्या दिवशीं टिळकांची एक कविता एकसारखी आठवत होती. शेवटीं शवपेटिका स्मशानभूमीकडे × नेतांना कोणते गीत म्हणावें म्हणून मला भजनीं मंडळीनें विचारलें, व मीं तेच गीत सांगितलें.

**जिंकुन मरणाला मरणाला**
**जीव कुडींतुन गेला**
**अक्षयतेचा अधिकारी हा**
**इकडुन तिकडे झाला**
**विश्वासाचा जिना चढोनी**
**दिव्य मंदिरीं शिरला**
**मेला नाहीं निजला क्षणभर**
**पुन्हां सुखानें उठला**
**प्रभुनें ह्याला किती दयेनें**
**अजरामर हो केला.**

* (डॉ. पद्माबाई शिंदे लिहितात— (आनंदी हळव्या वृत्तीचा हा माणूस प्रसंगी केवढा कणखर बनतो ते पाहण्याचे भाग्य ज्यांना लाभलें असेल त्या भाग्यवंतांपैकी मी एक आहें... आई वारल्याचें कळतांच मी पहिल्याच गाडीनें भुसावळ सोडलें. नाशकास पोचलें त्या वेळपर्यंत मी स्वतःच दुःखाने हबकून गेलें होतें. भाऊची स्थिति कशी झाली असेल ह्याची कल्पनाच करवत नव्हती. पण तेथे जाऊन पाहतें तर तो साऱ्या प्रसंगाला विलक्षण तोंड देतांना आढळला.

× (स्मशानभूमि म्हणजे दहनभूमि नव्हें; ख्रिस्ती लोकांचे कबरस्तान)